# ल्युसी२.०



प्रकाश कार्येकर

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# ल्युसी २.०

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**मग**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

### आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# ल्युसी २.०

(कथासंग्रह)

लेखक

## प्रकाश कार्येकर

# ल्युसी २.० (कथासंग्रह)

## लेखक: प्रकाश कार्येकर

प्रकाश भालचंद्र कार्येकर

९०१ / ५, एकोलेड सोसायटी , लुईस वाडी, ठाणे ४००६०४

फोन - ९८१९८४७५६८

ईमेल: p_karyekar@yahoo.co.in

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक  :ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity.in

www. esahity. com

esahity@gmail. com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

**प्रकाशन : २३ जानेवारी २०२१**

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

जन्मदात्री आणि जगद्धात्री

ज्यांनी मला घडवले,

त्यांना

सादर अर्पण

# ओळख



मी एक मध्यम वर्गीय, सामान्य माणूस आहे. मी अज्ञ आहे, तज्ञ नाही. सगळ्या विषयात रस-रुची-आवड-निवड-जाणीव असणारा, संवेदनशील सामान्य माणूस. सामान्य माणसाची दिवसाची सुरुवात वर्तमान पत्राने होते. माझी सुद्धा सकाळ चहा आणि वर्तमान पत्रानेच होत होती.

नंतर दूरदर्शनमुळे बातम्या जास्त रंगीत, आकर्षक झाल्या. तेव्हढ्याच त्या सवंग, बाजारू झाल्या. सत्तेच्या आधीन झाल्या. सत्तेचे आणि स्वतःचे हित जपणाऱ्या झाल्या.

तेंव्हा नुकतेच संगणक युगाची, इंटरनेटची, सुरुवात झाली होती. त्यावर बातम्या बघण्याचा, माहिती शोधण्याचा, एक विरंगुळा मिळाला. जसजसे प्रत्येक बातमीचा स्त्रोत, त्यावर चारी बाजूने मिळणारी माहिती आणि विश्लेषण - ह्यांचा ओघ वाढला, तसतसे भारतीय प्रसार माध्यमाची विश्वसनीयता कमी होत गेली. शून्यवत झाली. सामाजिक माध्यमाची गरज जाणवू लागली. आता रोजचे सकाळचे वर्तमान पत्र चिडवणारे, चीड आणणारे, खोटे, अपूर्ण, एकांगी आणि दुष्ट वाटू लागले.

आणखी एक स्पष्टपणे कळले, हिंदू जन मानसाची मोठ्या प्रमाणावर घुसमट होत आहे. जाणीवपूर्वक केली जात आहे. प्रसार माध्यमे, सत्ताधीश आणि त्यांचे बुद्धिवादी हस्तक, त्यांनी पेरलेले आणि वेचलेले साहित्यिक, त्यांनीच नेमलेले अधिकारी - सगळे मिळून हिंदू माणसाला आणि त्याच्या प्रिय संस्कृतीला घेरून, मिळेल त्या विषयावर बदनाम करता आहेत. हिंदू माणसाला बोलता येत नाही, सहन होत नाही, विरोध करणे दूरच राहिले. अशी परिस्थिती निर्माण केली गेली. अशा वेळी सत्याचा आधार मिळाला तो सामाजिक माध्यमातून.

आपल्या स्वातंत्र्यावर हा उघड हल्ला आहे आणि लोकांना त्याची पुसटशी सुद्धा जाणीव नाही, ह्यामुळे जास्त वाईट वाटले.

मनाचा हा एकलकोंडा, अगतिक प्रवास गेल्या दोन दशकांचा आहे. तो उथळ आणि तात्पुरता नाही. भारतीय स्वातंत्र्य आणि लोकशाही ह्यांचा चौथा आधारस्तंभ मानला गेलेला प्रसार माध्यम व्यवसाय फक्त स्वार्थ आणि फायद्यासाठी काम करतो, त्यासाठी देशाच्या हिताचा बळी देतो, ही वेदना खोल आणि तीव्र आहे.

त्या मनाच्या स्थितीत 'पहाटेपूर्वीचा काळोख - एक अरण्य रुदन' आणि 'जोकोतीना - स्वातंत्र्य समर तिसरे' लिहिले गेले. लिहिल्यामुळे मनात कोंडलेल्या विचारांना वाट मिळाली. आणि मग असच काही

बाही लिहित राहिलो. जोकोतीना म्हणजे भविष्यात घडाव्या अशा अनेकविध घटनांची - दिवास्वप्नाची, सूचक नांदी होती.

मी इतिहास लेखक किंवा इतिहासाचा अभ्यासक नाही. विचारवंत / तत्वज्ञ मुळीच नाही. साहित्यिक नाही. साहित्याचा अभ्यासक नाही. मी खूप काही वाचले आहे, असा माझा दावा नाही. मला कळते, समजते असा माझा अभिनिवेश नाही.

सामान्य, सुशिक्षित, सुजाण माणसाला जे दुखते, खुपते, पटते, ओढ लावते, अस्वस्थ करते, किंवा ज्याची टिंगल करावी असे वाटते, ते ते मी निस्वार्थ, निरागसतेने, हक्काने केले आहे. वाचकांनी ते मानून घ्यावे, समजून घ्यावे ही एकच विनंती.

बहुतेक कथा ह्या काल्पनिक चित्रावली (Fantasy) प्रकारात मोडतात. त्यात भारतीय अध्यात्मिक विचार गृहीत आहेत. तसेच आजचे आघाडीचे विज्ञान सुद्धा गृहीत आहे. रामानुजन सारखा महान गणिती असे म्हणतो "An equation for me has no meaning unless it represents a thought of God." तशी गणित आणि श्रद्धा हि सुद्धा ह्या कथांची पार्श्वभूमी आहे.

खरे तर हे सगळे स्वान्तः सुखाय असेच होते. पण मग वाटले ALL THAT IS NOT SHARED IS LOST. ह्या भीतीतून हा लिहून ठेवण्याचा आणि प्रकाशनाचा प्रपंच घडला.

प्रकाश कार्येकर (०७-०७-२०१८)

## लेखकाचे मनोगत : भविष्यात डोकावताना ...

सामान्य माणसाला भविष्याची फार ओढ असते. आणि ते जाणून घेण्यासाठी तो उत्सुक असतो, बरीच धडपड करतो आणि त्यासाठी कोठलाही मार्ग त्याला वर्ज्य नसतो. लाखो प्रकाश वर्षे दूर असलेले ग्रह, तारे आणि नक्षत्र ह्यांचा मेळ घालून, जन्म पत्रिका बघून, भविष्य सांगितले जाते. भविष्य – ज्यात घटनाही असतात आणि स्वभावाचे निरनिराळे सूक्ष्म पैलू ही सांगितलेले असतात. त्यावर तो विश्वास ठेवतो. तर दुसरे काही विज्ञानवादी त्याला थोतांड समजून वैज्ञानिक संशोधन आणि निष्कर्ष ह्याच्या आधारे पुढे काय घडेल / घडू शकते ह्याचे अंदाज आणि आडाखे बांधतात.

पण आता परिस्थिती किती बदलती आहे.

विज्ञानाची दमछाक झाली आहे. आणि अध्यात्म गरुड भरारी घेत आहे. अध्यात्माला मानवाच्या उत्क्रांतीच्या पुढच्या पायरीवर काय घडणार आहे ह्याची कल्पना आली आहे आणि त्याची सर्वांगीण तयारी सुद्धा सुरु केली आहे. श्री योगी अरविंद आणि त्यांच्या सहकारी श्री माताजी ह्यांनी त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवातून ह्यावर भरपूर प्रकाश टाकलेला आहे.

विज्ञान आता चैतन्य – स्थिती (studies in consciousness) ह्यावर अभ्यास करत आहे. Artificial intelligence चा अभ्यास करताना computation vs. awareness - गणना करणे आणि जाणीव / भान ठेवणे ह्यामधील फरक – जमीन आणि आकाश एव्हढा फरक – लक्षात येतो आहे. विज्ञान आता अति सूक्ष्म अनुभवाच्या प्रदेशात प्रवेश करत आहे. आणि म्हणून प्रस्थापित शास्त्रीय पद्धतीची आणि संकल्पनांची दमछाक होते आहे.

पुंज-भौतिकी चा (quantum physics) अभ्यास करताना त्याचे जीवनावर होत असलेले परिणाम पाहून अवाक झाले आहे. “उत्क्रांतीवादाचा सिद्धान्त अपूर्ण / अविकसित वाटतो आणि पुंज – भौतिकीचे सतत बदलणारे गणित देखील सांत्वन आणि सुरक्षा देत नाहीत.” विज्ञानाला अजूनही मनाचा थांगपत्ता लागलेला नाही. पण विज्ञानाला observer effect माहित आहे. ह्याचे दैनंदिन जीवनातील उदाहरण म्हणजे गाडीच्या चाकातील टायर मधील हवेचा दाब पाहणे. टायर मधील हवा कमी जास्त केल्याशिवाय त्यातील हवेचा दाब बघता येत नाही.

An especially unusual version of the observer effect occurs in quantum mechanics, as best

demonstrated by the double-slit experiment. Physicists have found that even passive observation of quantum phenomena (by changing the test apparatus and passively "ruling out" all but one possibility) can actually change the measured result. A particularly famous example is the 1998 Weizmann experiment.

Information technology मधील “माहितीचे” अचूक आणि पूर्ण स्वरूप ह्यावर सैद्धांतिक संशोधन चालू आहे. कारण observer effect – दृश्य, द्रष्टा आणि दृष्टी ह्यांची एकरूपता / भिन्नता, ज्याची आजपर्यंत हेटाळणी / उपहास करण्यात धन्यता मानली जात होती.

विज्ञान आणि अध्यात्म - दोघानाही एक सामायिक जाण आहे आणि ती म्हणजे उर्जा / शक्ती चे महत्व. अध्यात्माने हजारो वर्ष पूर्वीच “प्राण” आणि “आकाश” ह्यांच्या अन्योन्य संबंध बद्दल लिहिले आणि सांगितले आहे. स्वामी विवेकानंदानी त्या ज्ञानाची ठिणगी श्री टेसला आणि त्याच्या कडून पाशिमात्त्य जगाला दिली. बाकी E = MC2 हा इतिहास आहे. अध्यात्म हे एक science of

consciousness आहे आणि भारत हा अध्यात्मामुळे जगत गुरु आहे.

माणसाचे मन हाच सर्वात मोठा शक्ती स्त्रोत आहे. त्याचे स्वरूप, त्याच्या काम करण्याच्या खास पद्धती, मनाचे धागे दोरे आणि कंगोरे, त्याच्या उलट्या – सुलट्या आणि नागमोडी चाली, त्याची शरीरावर असणारी / नसणारी हुकुमत, त्याचे विश्व रूप आणि अमर्याद शक्ती, अध्यात्माला पूर्ण माहिती आहे. पण विज्ञानाला अजून त्याची पुसटशी सुद्धा ओळख झाली नाही. ती ओळख जशी वाढेल तसे विज्ञानाला अध्यात्माचे महत्व कळेल. स्थूलातून सूक्ष्मात शिरताना मनापेक्षा आणखी सूक्ष्म काय आहे, कोण आहे.

भविष्यात डोकावताना जगाला बहुतेक पुन्हा प्राचीन भारतीय संस्कृती आणि सभ्यता भेटेल, पण त्यासाठी केव्हढे मोठे दुर्दैवी आणि दुःखद वळण भारतालाही आणि जगालाही घ्यावे लागले आहे.

प्रकाश कार्येकर

०७-१२-२०२०

कथानुक्रम

१. क्वम गतं? केन नीतं? -१६

२. एक मुलाखत - ३८

३. ल्युसी २.० - ६६

४. अवतार - १२०

५. ब्राह्मण- १३८

या कथासंग्रहातील सर्व कथा काल्पनिक आहेत. त्यांतील व्यक्ती, स्थळ, प्रसंग हे सर्व काल्पनिक असून वास्तवातील कोणा व्यक्ती वा स्थळाशी त्यांचे साम्य आढळून आल्यास तो निव्वळ योगायोग ठरेल.

# क्वम गतं? केन नीतं?

*("एक तरी ओवी अनुभवावी." असे संत म्हणतात. आकाशाने विजेचे बोट पकडून, पहाटे पडलेल्या दवाच्या कुशीत शिरून, निद्रिस्त बीजाला स्पर्श करावा, तसा परम शक्तीचा क्षणभराचा सुद्धा अनुभव, माणसाचे मनोविश्व आमुलाग्र बदलून टाकतो.)*

---

आशुतोष आज खूप आनंदात होता. अमेरिकेतील येल विद्यापीठाने त्याचा उच्च शिक्षणाचा अर्ज स्वीकारला होता. एव्हढेच नाही तर त्याला शिष्यवृत्ती सुद्धा मंजूर केली होती. शिक्षणाचा काहीच खर्च येणार नव्हता. तिथला राहण्याचा खाण्याचा खर्च, तिथेच विद्यापीठात जी मिळेल ती नोकरी करून तो भागवू शकणार होता. त्यच्या वडिलांची तशी अटच होती. घराच्या आर्थिक परिस्थितीत ते स्वाभाविकच होते. पण त्यावर मात करून तो आता जाणार होता. उद्या तो अमेरिकेला जायला निघणार होता. म्हणून आज घरी एक प्रकारे उदास वातावरण होते. पण त्याच्या मित्रांनी त्याच्यासाठी ही निरोपाची संध्याकाळ राखून ठेवली होती. सगळे जमले होते. आई व ताईने दिवसभर स्वयंपाक घरात काम करून खूप काही गोड तिखट पदार्थ बनवले होते

त्याच्या आवडीचे, त्याच्यासाठी, त्याच्या मित्रांसाठी. आता दोन वर्षे हे काहीही दिसणार सुद्धा नव्हते. पण त्याचा हट्ट होता, एक तरी पदार्थ तो त्याच्या कमाईतून, बचतीतून आणणार होता. म्हणून मग तो बाहेर पडला, आईसक्रीम आणण्यासाठी.

पावसाळ्याचे दिवस होते. रस्त्यावर छोटी छोटी डबकी साचली होती आणि घसरडे झाले होते ठीक ठिकाणी. त्यात परत पाणी उडवत भरधाव जाणारी वाहने. पण आशुतोषने आज सर्वांना माफ केले. तो विचारात इतका गढला होता की एका ठिकाणी डबके ओलांडताना अचानक त्याचा पाय घसरला आणि काही कळायच्या आत तो उताणा पडला. डोक्याला मुका मार बसला. डोळ्यांपुढे अंधारी आली. पण हे काय? समोरचा रस्ता, रहदारी, रस्त्यावरची माणसे, वाहने, इमारती, हातगाड्या, आवाज, गोंधळ, सगळे काही वेगात वावटळीसारखे गरगर फिरून जणू शून्यात अदृश्य होऊ लागले. अगदी दुरचा डोंगरही त्या शून्यात प्रचंड वेगाने ओढला जाऊन नाहीसा झाला. समोरचे क्षितीज, वरचे आकाश, पायाखालची धरती, जे जे दिसत होते त्याला त्या विराट शून्याने ग्रासून, गिळून टाकले. त्याला वाटले, तो अधांतरी तरंगतो आहे, पण त्याचे हात – पाय कोठे गेले, शरीरही दिसेना. एक अनाहत नाद उरला, तो त्यात विरून गेला, एकरूप झाला, शेवटी त्याची मीपणाची जाणीवही त्या शून्यात वाहून गेली. कोठुनशी, खोलवर,

प्राणातून, अंतरात्म्यातून, एक आर्ष वाणी ऐकू आली, जणू हलकेच तरंगत मनःपटलावर उमटली. ‘क्वम गतं? केन नीतं?’ ‘क्वम गतं? केन नीतं?’. त्या धीर – गंभीर, शांत, स्तब्ध शब्दांनी त्या शून्याची जागा घेतली. असा काही वेळ गेला असेल, सर्व घटना मग त्याच वेगाने उलट प्रतिष्टीत झाली. तो भानावर आला. जवळच्या माणसाने त्याला हात देऊन उठवले, उभे केले, कपडे चिखलाने माखले, तिकडे दुर्लक्ष करून आईस्क्रीम घेऊन तो घरी परतला.

जे काय, कसे आणि का घडले – क्षणभंगुर स्वप्न जसे – तेही तो नंतर विसरून गेला. फक्त ती घटना त्या शब्दरुपाने त्याच्या मनावर जणू कोरली गेली.

***********

बघता बघता दोन वर्षे सरली. आशुतोष अमेरिकेत रुळला. त्याला उच्च शिक्षणाची पदवी मिळाली. त्याची बुद्धीमत्ता आणि कष्टाळू वृत्ती बघून त्याच्या प्राध्यापकांनी त्याला त्याच विषयात फेलोशिप साठी मार्गदर्शन करण्याची स्वीकृती दिली. त्याची पुढील प्रगती निश्चित होती. त्याच्या पदवीदान सोहोळ्याला त्याने आई, बाबा आणि ताई सगळ्यांना स्व खर्चाने बोलावले. ते अमेरिकेत त्याच्या घरी एकत्र जमले होते तो त्याच्या आयुष्यातला सर्वात आनंदाचा दिवस होता. पदवीदान समारंभ विद्यापीठात मोठ्या प्रांगणात, हिरवळीवर सुरु होता. एका प्रशस्त मंचावर त्याचे

प्राध्यापक, विद्यापीठाचे अधिकारी, इतर प्राध्यापकवर्ग आणि समारंभाचे पाहुणे बसले होते. त्याच्या नावाची घोषणा होताच तो लगबगीने मंचाकडे निघाला आणि वाटेत तुषार सिंचनाच्या नलिकेला अडखळून तोंडावर पडला. काही कळलेच नाही. तो समारंभ, लांब रुंद मंच, खुर्च्यांची रांग, माणसे, मित्र मैत्रिणी, प्राध्यापक, विद्यापीठाची भव्य इमारत, ती हिरवळ, दिव्यांच्या रांगा आणि प्रकाशझोत, सरत्या उन्हाने उजळलेले आकाश, त्याच्यासकट, सर्व आसमंत शून्यवत झाला. एकूण एक वस्तुमात्र त्या शून्यात गरगर फिरत वेगाने नाहीसे झाले. शरीराची जाणीव हरपली, संज्ञा रेषेच्या सीमेशी तो क्षणभर अडला आणि मग नेणीवही हरपली. एक अनाहत नाद भरून राहिला, पुन्हा एकदा त्या धीर गंभीर आवाजात तेच शब्द ऐकू आले. ‘क्वम गतं? केन नीतं?’ ‘क्वम गतं? केन नीतं?’. त्या शब्दा पाठोपाठ एक सौम्य, निरागस, नितळ, अर्धोन्मीलित डोळे, शांत चेहरा तेजाने झळकत दिसेनासा झाला. आकाशात विजेची तिरीप येऊन जावी तसा. त्या शब्दांचे साद – पडसाद, ध्वनी – प्रतिध्वनी एखाद्या महाकाय घन्टानादासारखे किंवा शंख ध्वनी सारखे दुमदुमले, वातावरणात भरून राहिले. सागराच्या तळाशी असलेली गूढ नादमय शांतता किंवा विश्वाच्या हिरण्य गर्भातील तेजस्विता त्या शब्दांमध्ये होती. ‘क्वम गतं? केन नीतं?’. त्या शब्दा पाठोपाठ, आनंद व प्रकाशाच्या

एकामागून एक उसळत्या लाटांवर तरंगत हळूहळू तो नेणिवेच्या पलीकडे, त्या शून्यात ओढला गेला.

तो जागा झाला तेंव्हा सकाळच्या सोनेरी किरणांनी त्याची खोली उजळून निघाली होती. तो बाहेर आला, सर्व काही रोजच्या सारखे सुरळीत चालू होते. त्याला असे ताजेतवाने, आनंदी बघून आई, बाबा आणि ताई, एव्हढेच काय त्याचे प्राध्यापक सुद्धा अगदी हरखून गेले.

तो तीन दिवस असा अज्ञातात राहून परत आला होता. मागच्या वेळेस आणि ह्या वेळी सुद्धा त्याच्या अत्युच्च आनंदाच्या क्षणी त्याला असे अज्ञाताने गाठले होते.

*************

ती घटना सर्वांनी एक अपघात म्हणून मागे टाकली. आशुतोष बरोबर त्यांनी अमेरिकेत दोन महिने राहून आणि फिरून खूप मजा केली. त्या सुखद आठवणी घेऊन ते भारतात परत गेले. आशुतोशचाही पुढचा अभ्यास सुरु झाला.

पण त्या घटनेने आशुतोषच्या अंतर्मनाला एकाच वेळी जणू परीस स्पर्श झाला, भूकंप झाला, वीज कोसळली किंवा वादळाच्या वारूवर आरूढ होऊन नव्या विश्वात त्याचे पदार्पण झाले.

सर्व प्रथम सूक्ष्म बदल झाले, जे त्याच्या ध्यानात आले नाहीत. त्याचा मानसिक आलेख, पूर्वी जो एका सरळ रेशेसारखा होता, तो आता एका असंतुलित, वक्र रेशेसारखा झाला, आणि आलेख पत्राच्या चारी कोपरयातून कसाही, कधीही उधळू लागला.

त्याच्या सवयी बदलल्या. सोच बदलली. आनंदाची प्रत्यक्ष उराउरी भेट गाठ झाल्यावर आनंदाच्या माध्यमांकडे बघण्याची नजर बदलली. चित्रपट, साहित्य आणि कला यांच्यापाठीमागे जायची इच्छा कमी झाली. पुस्तके खरेदी, कला प्रदर्शने, चर्चा, सत्संग, F1 शर्यती, पूजा-पाठ, नवीन पाक-कृती करणे, फुटबालचे / टेनिसचे सामने बघणे, सगळे थांबले.

सौंदर्याची आसक्ती राहिली नाही. जीवनाची लालसा कमी झाली. धावाधाव कमी झाली. समांतर चालणे संपले. पूर्वी तुटलेल्या मोत्यांच्या हारातील बिखरलेले मोती दिसले, तरी वेचावेसे काही वाटले नाही. तो जास्त मनोमय आणि उदासीन राहू लागला.

चांगले दिसणे, चेहऱ्याची उठाठेव नव्हतीच. पण आताशा अगदीच दुर्लक्ष होत असे. पोशाख परिधान नियमावली जारी केली असेल तरच तो व्यवस्थितपणे समोर जाई. कपडे, घर, खाणे पिणे मोजकेच. जरुरीपुरतेच. तो विद्यार्थी दशेत राहत होता त्याच एकाच

खोलीत आजही राहत होता, घर बदलण्याची त्याने कधी आस धरली नाही. एक मोठा ८ – १० खोल्यांचा बंगला घेण्यची त्याची आता ऐपत होती. पण त्याचे उत्तर ठरलेले, कोणासाठी, बघू पुढे, माझे काही अडत नाही.

कधी कधी एकाकीपणा अंगावर येई. मनावरील ताण असह्य होऊन विकाराचे आणि वैराग्याचे झटके येत. असहिष्णुतेचे, तीव्र असमंजसपणाचे, झटके येत, त्यामुळे तो छिन्न भिन्न होऊन जाई. हताश, निराश होऊन जाई. कधी अस्वस्थ करणारी निष्क्रियता आणि वांझोटी क्रियाशीलता अशा दोन टोकांमध्ये लटकत राही. असा श्रांत क्लांत आशुतोष त्या शब्दांना शरण जाई. तो अनुभव सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणे त्याच्या मनावरील मळभ दूर करत असे. मग मनात निर्मितीचे घुमारे फुटत, नवीन संकल्पनांचे अंकुर फुटत, नवीन विचार, नवीन संरचना, नवीन कथाबीज, ह्यात तो बुडून जाई, स्वतःच निर्मितीचा एक आविष्कार होई.

कर्म-कांड संपले. विज्ञान असो कि धर्म असो, शिक्षण असो कि खेळ असो, त्यातला नित्य क्रम नकोसा झाला. नित्य क्रमाला पर्याय निर्मितीचा. तेंव्हा त्याला जाणवले कि, निर्मितीच्या भाव-विश्वात अगदी थोडा वेळ सुद्धा आरूढ होणे अवघड आहे, ती

उत्कटता टिकणे आणि त्यातून सही सलामत बाहेर पडणे ह्या साठी खूप सामर्थ्य लागते. दोनही, मनाचे आणि शरीराचे.

आता तो अभ्यास करताना, काम करताना, संगीत, विशेषतः भारतीय अभिजात संगीत, जरूर ऐकू लागला. त्याचे संगीतावरचे प्रेम विशेष वाढले. कधी कधी तो त्यात बुडून जाऊ लागला. त्याने कोणाला सांगितले नाही, पण जरा मन एकाग्र केले कि तो मधुर अनाहत नाद, तंबोरा किंवा सारंगीच्या पार्श्वागायनाप्रमाणे, त्याला कोठेही ऐकू येई. तो आवाज ऐकला कि एका अनामिक शांत वृत्तीने मन भरून जाई, आणि त्या पाठोपाठ येई व्याकुळता, ओढ, कशाची ते सांगता येत नसे. पण मन कातर होऊन जाई आणि सगळे व्यर्थ वाटू लागे. निष्क्रियता आणि निरर्थकता ह्यांनी तो वेढला जाई.

अशा वेळी त्याला आईची तीव्र आठवण येई, ताई बरोबरच्या लहानपणाच्या आठवणी जाग्या होत, बाबांनी वेळोवेळी केलेल्या मदतीची आणि त्यांनी केलेल्या संस्कारांची आठवण येऊन त्यांचा अभिमान वाटे. तो जरा जास्तच हळवा, भावनाप्रधान, ‘होमसिक’ झाला होता का? घरी, भारतात परत जावे असे वाटे. पण ते शक्य नव्हते. मग त्यांच्याशी बोलले म्हणजे बरे वाटे, त्याच्या अशांत चित्ताला आधार सापडे. माणसात आल्यासारखे वाटे.

त्याचे विचार जसे बदलत चालले तसे त्याचे मन पार्ट्या, कट्टा, दंगा मस्ती, आठवडा अखेरीच्या सहली, ह्यातून उडाले. मित्र तुटले, अनावश्यक संपर्क कमी झाला. कोणाच्याही सहवासाचा तिटकारा येई. तो एकाकी झाला. जास्त जास्त तटस्थ निरीक्षक, परीक्षक होऊन माणसांचे बारकाईने अवलोकन करू लागला. स्वतःला सुद्धा तटस्थ पणे बघू लागला. त्याला माणसांच्या मनो व्यवहारांचे कुतूहल वाटे, मनाच्या खेळाचे आश्चर्य वाटे. तळयाच्या काठावर पाण्यात पाय सोडून बसलेल्या माणसासारखे तो स्वतःच्या आणि इतरांच्या मनातील खेचाखेच, ओढाताण आणि मनाच्या हालचाली बघू लागला. माणसाची देह बोली, भाषा, शब्द, उच्चार, आणि माणूस जे बोलतो आणि जे बोलत नसतो तेही त्याच्याबद्दल बरेच काही सांगून टाकतात. ह्या सगळ्या गोष्टी कशा आपोआप जुळून येतात. आपसात, एकमेकात चपखल बसतात. सूक्ष्मपणे पहिले तर एक मनच वावरत असते, शरीर म्हणजे मनाची सावली असते.

मन म्हणजे काय? मनाचे स्वरूप कोणते, मनाला उर्जा कोण देते? मन शरीराला चालवते, तर मनाला कोण चालवते, मनाला कोण नियंत्रित करते? इच्छा, आकांक्षा, भाव भावना, बुद्धी, तर्क – वितर्क, ज्ञान आणि माहितीचे भांडार, वेदना, मनात का आणि कशा असतात, आणि ह्या सगळ्या बद्दल आप पार भाव किंवा आवड –

निवड असणे - हे कोठून येते, का येते, आणि ह्या सगळ्या क्रिया – प्रतिक्रियांची संरचना परत एकजीव, एकसंध, आणि एकमेव अद्वितीय असते. एव्हढे असूनही परत मन आणि शरीर ह्यात विसंवाद कसा होतो. अभियांत्रिकी इतकेच हे सुद्धा खूप लक्षणीय आहे, अभ्यासनीय आहे आणि विचार करायला लावणारे आहे.

त्याच्या मनातील अनामिक भीती कमी होऊन तो हळू हळू निर्भय बनत चालला होता. वंशभेद, वर्णभेद, कोणताही अन्याय त्याला सहन होत नसे. जेंव्हा त्याच्या सहकाऱ्यांना नोकरीवरून काढून टाकण्यात आले, तेंव्हा तो थेट अध्यक्षांकडे त्यांच्या वतीने तक्रार घेऊन गेला. त्याने त्यांची बाजू मांडली आणि त्यांना नोकरीत परत घ्यावे लागले, त्याची नोकरी गेली पण त्याला त्याचे सुख दुःख नव्हते. त्यामुळे त्याला थोडा आर्थिक त्रास सहन करावा लागल तो त्याने आनंदाने सहन केला. त्याला स्वतःचे असे अमेरिकेत कोणी नव्हते, इथले आयुष्य तसे निरुद्देश होते. आयुष्यात जसा तो निर्भय बनत चालला तसाच तो बेफिकीर, फकीर होत चालला.

निर्भय झाल्यामुळे तो साहसी खेळांमध्ये ओढला गेला, भाग घेऊ लागला. त्यात त्याला सर्वात आवडला गिर्यारोहणाचा खेळ आणि छंद. त्यातील निसर्गाची जवळीक आणि साहसाची मोकळीक त्याच्या मनाला आकाशाच्या जवळ घेऊन गेली. त्यात

स्पर्धा नव्हती. स्वतःला आजमावण्याची संधी होती. जेंव्हा जमेल तसे तो पर्वतात आणि रानावनात भटकू लागला. प्रस्तर आरोहणात त्याच्या एकाकी मनाला एकाग्रतेची सवय लागली आणि तो शरीराने सुद्धा जास्त तंदुरुस्त झाला. त्याच्या अव्यक्त मनाचा व्यक्त जगाशी हा एक नवीन धागा जुळला. पण व्यावसायिक गिर्यारोहक होण्याची त्याला कधी इच्छा झाली नाही. त्याच्या मनोविश्वात जे वादळ उठले होते त्याला समजून घेण्याचा हा एक अनवट मार्ग होता.

त्याला वाटे त्याच्याकडे एक अक्षय आनंद निधान आहे, जरी त्याची किल्ली त्याच्याकडे नव्हती. सर्व वेळ सर्व सुखांची, सर्व प्रकारच्या अनुभवांची तुलना तो त्या एकाच अनुभवाशी करत असे आणि मग सगळेच कमी, अपूर्ण असे, नको वाटे. ते अमृतानुभवाचे तीन दिवस. उलट सुलट विचारांनी त्याचा गोंधळ होई आणि मन वाट फुटेल तिकडे पळत असे. कधी गिर्यारोहण तर कधी देमार चित्रपट तर कधी अनावश्यक बाझारहाट. अशा मानसिक हेलकाव्या नंतर अचानक त्या अज्ञाताची हाक मनात उमटत असे आणि तो हळू हळू पुन्हा स्थिरचित्त होऊन अभियांत्रिकीच्या अभ्यासात मन रमवत असे. जोमाने अभ्यास करून लवकर डॉक्टरेट मिळवायची आणि भारतात परत जायचे ही एक इच्छा त्याला पुढे पुढे ढकलत असे.

आणखीही काही गोष्टी बदलल्या. त्याला कल्पनेची भरारी मिळाली. दार्शनिकाची दृष्टी मिळाली. रोजच्या जीवनातील प्रसंगांना गुढतेची किनार दिसून येई.

एक माकडवाला माकडाचे खेळ करून दाखवत आहे. तो माकडवाला त्यच्या माकडाशी बोलण्यात, ते माकड त्या करामती करण्यात आणि ते दोघे डमरूच्या आवाजात पूर्ण बुडून गेले आहेत. तिथे त्यांच्या शिवाय कोणी, काही आहे हे सुद्धा ते विसरले आहेत. तो डमरूचा आवाज, माकडाची उडी आणि माकडवाल्याची हळी .....

काळात कोरलेले, गोठलेले एक क्षण शिल्प. किंवा जणू एक साधे, सरळ जिवंत वाक्य. विश्वाच्या अनेकोविध, अनामिक, अनंत, गतीविधी आणि गोष्टीशी पूर्णपणे अनभिज्ञ.

...............

हरीशचंद्र गडाच्या कोकण कड्यावरुन दूरवर क्षितिजा पर्यंत आकाशाचा आणि अवकाशाचा पसारा आवाक्यात येतो आहे. आकाशात ढग येत आहेत, जात आहेत. स्वच्छ सुंदरसे उन्ह आसमंतात व्यापून उरले आहे. बघता, बघता मन एकदम आकाश रूप विशाल, विराट होते. आता तेच चित्र स्पष्ट जाणवते आहे एखाद्या चलत चित्रा सारखे. एकेक विचार - त्यातील हाव भाव, आकार -उकार, रेखाकृती, उक्ती व्यक्तींसह, - मनावकाशात उमटतो

आहे, पुसला जातो आहे, फिरून नवीन विचार, तोही आकार घेतो आहे, विरून जातो आहे. ये – जा. अखंड, अविरत, अविश्राम, ये – जा. किती वेळ मनावकाशात अशा घडामोडी घडत आहेत. पण मन आहे स्वाधीन, अलिप्त, निरालंब आकाशासारखे. जसे ढग कधी आकाशाला स्पर्श करतात?

पण ही ये – जा थांबत नाही आहे. अचानक आकाश आणि अवकाश विरून जात आहेत, वळवाच्या पावसाप्रमाणे, ती आर्ष वाणी ऐकू येत आहे – क्वम गतं, केन नीतं. तोच आत्मलीनमग्न चेहरा किंचित डोळे उघडून त्याच्या कडे स्नेहार्द्र नजरेने बघत आहे. मन अवाक, तरी निश्चल आहे.

हळू हळू कालांतराने सर्व विराम पावते आहे, कोकण कड्यावर चंद्रकोर उगवली आहे.

..........

माध्यान्हीची वेळ, डांबरी रस्ता, डोंबारी खेळ करून दाखवत आहेत. तो पोटतीडीकेने ढोलके वाजवत आहे, त्याची बायको जमलेल्या गर्दीसमोर थाळी फिरवत आहे, छोटे पोरगे उगाच उलट सुलट कोलांट्या उड्या मारत आहे, हातावर चालून दाखवत आहे. तो लोकांना गोळा करण्यासाठी, त्याच्या खेळात गुंतवून ठेवण्यासाठी आकर्षक हालचाली, हाका, आरडा ओरडा, बोलाचाली, मौज मजा, कसरती करतो आहे. खेळ रंगात आला

आहे. आगीच्या वर्तुळातून त्याच्या पोराने सूर मारताना, जमलेल्या बाया बापड्या, काळजीने उगा काही चित्कार करत आहेत. शेवटचा खेळ सुरु झाला. दोन बाजूला बांबूच्या तीकाटन्या उभ्या करून दोर ताणून लावून झाला. त्याने लेकीला हाक मारली, लेक चपळाईने बांबूवर चढून एका टोकाला उभी राहिली. सज्ज झाली. वातावरणात आता उत्कंठा जाणवते आहे. अंतर बरेच ४० – ५० फुट असावे, उंचीही १५ फुट असावी. डोंबारी तिच्या हातात एक लांब बांबू देतो, दोरीवरून चालताना तोल सावरण्यासाठी. त्याने आता ढोलक्यावर चांगला ठेका धरला आहे. ती मुलगी आता बांबूच्या मदतीने तोल सावरीत, सावधपणे एकेक पाय पुढे टाकत आहे. अचानक समोर दिसतो आहे एक असहाय, केविलवाणा जीव, तोल जाऊन पडण्याची भीतीने घाबरलेला. त्यात भर, दोन बाजूने दोन मोठे बोके त्याच्यावर गुरगुरताहेत. डावे - उजवे, वर – खाली, आहे – नाही, तो – ती, बेरीज – वजाबाकी, फायदा – तोटा, व्यवस्था – अव्यवस्था, चांगले – वाईट, पाप – पुण्य, त्या दोन बोक्यांनी नुसता उच्छाद मांडला आहे. तराजू मोडून पडला आहे एकीकडे.

कोठूनसे गर्दीतून एकदम तो सावळा, सुंदर चेहरा पुढे आला, अस्फुट नयनातून त्याला न्याहाळत म्हणाला, ही घे अद्वैताची काठी, तुझ्या दोन्ही बाजूला जी द्वैताची मांजरे तुझ्यावर गुरगुरताहेत

ना, त्यांना ह्या काठीचा एकेक तडाखा दे चांगला, पाठीत रट्टा बसला कि पळून जातील. शांत होतील. मग दोरावर चालणे, तोल सावरणे, किती सोपे होईल, छान, भवसागर तरुन जाशील.

डोंबारयाची लेक दोरीच्या पलीकडच्या टोकाला पोहोचली होती. लोक टाळ्या वाजवत होते.

...........

हे सगळे काय चालले आहे? त्याने ठरवले, भारतात मित्राला दूरध्वनी केला आणि विचारले, ‘क्वम गतं? केन नीतं?’ ह्याचा अर्थ काय, ह्याचा कशाशी महत्वाचा असा काही संबंध आहे का, कोणी हे कोणाला म्हटले आहे का पूर्वी. मित्राने थोड्या वेळात उत्तर पाठवले, ह्या संस्कृत शब्दांचा अर्थ आहे, ‘कुठे गेले, कोणी नेले’. हे केनोपनिषद ह्यातील वाक्य आहे. बाकी त्याला काही सांगता आले नाही.

जितके साधे शब्द, तितके दुर्बोध. जे गूढ होते ते आता जास्त गहिरे, गडद झाले. शिवाय तो चेहरा, स्पष्ट आठवत होता, तो कोणाचा चेहरा होता? आता त्या शब्दांचा वास्तविक अर्थ समजून घेण्यसाठी त्याची धडपड सुरु झाली. तो बेचैन झाला ते गूढ उकलण्यासाठी.

अभियांत्रिकीचा अभ्यास सांभाळून, उरलेला सारा वेळ तो संगणकावरील माहितीच्या जंजाळात, ते शब्द आणि तो चेहरा शोधू लागला. संस्कृत साहित्य, संस्कृत लेखक, कवी, तत्वज्ञ, ह्यांची ओळख करून घेऊ लागला. बौद्ध आणि तिबेटी ग्रंथ चाळले आणि त्यावरील इंग्रजी टीका वाचली. आशा होती, कुठे तरी मार्ग सापडेल, संदर्भ मिळेल. पण समुद्रावरील वाळूत, वाळूचे चार विविक्षित कण शोधण्यासारखे होते ते.

पण हाकेला कोण ओ देईल आणि मदत कोठून येईल आणि प्रतिसाद कोण देईल हे विधात्यालाही सांगता येत नाही, हे खरे.

तो आईशी नेहमीप्रमाणे रविवारी गप्पा मारत होता. आई म्हणाली, ताई काश्मीरला जाते आहे, दल सरोवर, दल सरोवरातल्या निवासी नौका, मुघल बागा, पहलगाम, वैष्णोदेवी आणि आद्य शंकराचार्य मठ असा रोजचा, बघण्याचा कार्यक्रम आहे, शाली आणि गालीचा घेऊन येणार आहे, तुला काय पाहिजे का.

तेंव्हा नंतर त्याला एकदम आठवले, अरे अजून ह्या आद्य शंकराचार्य आणि त्यांच्या ग्रंथांबद्दल आपल्याला फारशी माहिती नाही. लगेच त्याने त्या परवलीच्या शब्दांनी नवीन शोध सुरु केला. आद्य शंकराचार्य आणि त्यांच्या कार्य बद्दल माहिती मिळाली. पण

निर्णायक असे काहीच हाती आले नाही. ते शब्द इतके साधे होते, त्यांचा ठाव ठिकाण सापडणे अवघड होते. असे शोधता शोधता एक रेखाचित्र एका संकेत स्थळावर अचानक समोर आले, दिसले. एका क्षणात त्याने ओळखला, तो चिरपरिचित चेहरा. सौम्यपणे संमोहित करणारा तो चेहरा त्याला मधून मधून दिसत असे. ते आद्य शंकराचार्य होते तर. ही एक अतर्क्य, अविश्वसनीय, आश्चर्यकारक गोष्ट होती. १२०० वर्षापूर्वी संपूर्ण भारत आपल्या ज्ञानाने उजळून आणि वाद-विवादाने ढवळून काढणारे, वेद परंपरेचे उद्गाते, महान आचार्य. तो अगदी आनंद विभोर होऊन विस्मयाने रोमांचित झाला, आचार्यांनी त्याला एका अचिंत्य अनुभवाची ओळख करून दिली होती, त्याच्या आनंद निधानाची किल्ली त्यांच्याकडे होती. दोन दिवस त्याचे पाय जमिनीवर नव्हते.

अजूनही त्या शब्दांचा संदर्भ आणि वास्तविक अर्थ आचार्यांच्या ग्रंथात कोठेही सापडत नव्हता. पण आता गंतव्य माहित होते, जरी चाचपडणे थांबले नाही. शिवाय सर्वात मोठा प्रश्न उरलाच, हे सगळे त्याच्याच बाबतीत का आणि कसे घडत होते. त्याच्या मनाचे तर खेळ नव्हते हे? पण नाही. त्याला आतून खात्री होती, ते आचार्यच होते.

हा चमत्कार होता का, त्याचा चमत्कारावर विश्वास नव्हता, पण अनुभव नाकारण्या इतका तो उद्धट नव्हता.

आशुतोषच्या निरामय, निःसंग, आनंदी स्वभावाला खंबीर धारणेची जोड लाभली. त्याला जी आत्मिक शोधाची ओढ लागली होती, तिला आचार्यांमुळे मोठा आधार मिळाला. क्षितीज विस्तारले. काळाची चौकट तकलादू आणि खिळखिळी झाली. त्याची आर्त, व्याकूळ, कोमल वृत्ती लपली, कारण ती आता खोलात दृढ रुजली होती. हे एक अजब रसायन होते. तसेच त्याचे विचार आता जास्त सूक्ष्म आणि अचूक झाले. त्यांचा नेमकेपणा वाढला. संतांचे साहित्य अनुभवावर आधारित असल्याने सोपे आणि बिनचूक आणि तरीही थोडक्यात आणि सुटसुटीत का असते ते त्याला उमगले. तेच PhD चे प्रबंध गोलगोल आणि लांबलांब असून दुर्बोध का असतात तेही त्याला कळले. माहितीच्या तंत्रज्ञानातील 'माहिती' जर सापेक्ष असेल तर 'वस्तुस्थिती' सुद्धा सापेक्ष च असणार. आद्य शंकराचार्यांनी हेच तर सांगितले होते. फक्त १२०० वर्ष पूर्वी !!! त्याचा त्यांच्या बद्दलचा आदर वाढला.

त्याच्या आयुष्याचा मार्ग दुपदरी झाला, एक अभियांत्रिकीचा अभ्यास आणि दुसरा त्या शब्दांचा मागोवा. त्याचे जगणे झाले उत्कट, भरभरून आणि भारलेले.

..............

आणखी अशी दोन वर्षे झाली. आशुतोष अभियांत्रिकीमधील सर्वोच्च पदवी मिळवून त्याच विद्यापीठात मानद अध्यापक झाला. मागे वळून बघताना तो खूप समाधानी होता. एक निर्धन, एकाकी मुलगा म्हणून तो अमेरिकेत आला होता. आज तो सन्मान्य, सधन, सक्षम नागरिक म्हणून वावरत होता. त्याला अनेक सहकारी आणि चाहते मित्र होते. सर्व जगात ते पसरले होते. त्याचे सगळे जग बघून झाले होते. कामानिमित्त देश विदेश यात्रा सतत चालू होत्या. भारतातही जाणे – येणे होई आणि आई आणि बाबा तर दर वर्षी एकदा तरी त्याच्या घरी अमेरिकेत येऊन, राहून जात. त्याच्या लग्नाचा विषय सारखाच निघत असे, पण त्याला फारशी इच्छा नव्हती. ताई त्याला दिवाळीला म्हणाली सुद्धा, "आशुतोष, असे एकटे, भकास का जगतोस, लग्न कर, आयुष्यात चांगला रस घे, आमच्यासाठी एव्हढे करतोस, स्वतःसाठी कधी जगणार आहेस. तुला काय झाले आहे." मागच्या अपघातापासून त्याना फार काळजी वाटे आशुतोषची. आई बाबांच्या थकलेल्या डोळ्यांना त्याच्या सुखी संसाराची आस लागली होती. त्याची काळजी घेणारे हक्काचे माणूस आले तर त्यांना फार बरे वाटणार होते.

**********

आशुतोषच्या प्रश्नांची उत्तरे शोधताना प्रश्नच विश्व रूप झाले. शेवटी तो थकला, आईच्या हाकेने डोळे पाणावले, आशुतोषने घरी, भारतात परत जाण्याचे ठरवले. अमेरिकेचा कायमचा निरोप घेऊन, आपल्या कर्मभूमीकडे शेवटचे बघत, सुखद आठवणी मनात साठवून, तो विमानात बसला.

प्रवास ठीक झाला, विमान थांबले, आता बाबांना दूरध्वनी करु असे म्हणत त्याने विमानाची शिडी उतरली. पाय जमिनीला टेकताच शरीर रोमांचित झाले, अंगावर काटा आला, मनातील भाव अंतर्यामी दाटून उचंबळून आले, मन उंच, उंच उसळले बाणासारखे आणि आकाशाला स्पर्श करून आकाश रूप झाले. हातातले समान कधीच गळून पडले आणि तो खाली कोसळला.

ती विमाने, गाड्या, माणसे, इमारती, आकाश धरती, सगळे परत एकदा शून्यात हरवले. तो स्वतःच जणू एक शुन्य झाला. शून्य वर्तुळाचा मध्यबिंदू झाला. पहाटेचे दव पडताना पाकळीलाच फक्त ऐकू येईल अशा अस्फुट स्वरात ते शब्द त्याची जाणीव रूप झाले. ‘क्वम गतं? केन नीतं?’. आनंदाच्या महापुरात आशुतोष अंतर्बाह्य वाहून गेला. किणकिणरया असंख्य घंटांचा मंजुळ नाद पार करून, वर्तुळाला पुसून टाकून, शून्याला भेदून, अखंड, अनाहत, विश्वरूप ओमकाराशी एकरूप झाला.

तीन दिवसांनी आशुतोष जागा झाला तो दूरच्या काकड आरतीच्या स्वरांनी. जणू चिरंजीवी आत्मा मायेच्या घरट्यात परत आश्रयाला आला. तेंव्हा सर्व प्रथम त्याच्या मनात विचार आला, खरेच, माझे ते जुने जग कोठे गेले, कोणी नेले. 'क्वम गतं? केन नीतं?'.

परत एकदा रहाटगाडगे सुरु झाले. प्रश्न संपले नाहीत. पण आईशी संवाद करता करता आईने समजावले, जगरहाटी अशीच आहे, काळ – काम – वेगाने करकचून बांधलेली आहे, कार्य – कारण भावाच्या पलीकडे कोणी जाऊ शकत नाही. आनंदाच्या झऱ्याचे पाणी आपण पिऊ शकतो, पण स्वतःच आनंदाचा झरा होऊ शकत नाही. आशुतोषला कळले तरी वळले नाही.

**********

अजूनही जरी अंतःप्रवाह आनंदपूर्ण साक्षात्काराचा होता, तरी त्या आनंद निधानाची किल्ली त्याच्याकडे नव्हती आणि हाच त्याच्या आंतरिक वेदनेचा सारांश होता. पण त्याला समजले होते, काही भौतिक कार्याची नियतीला त्याच्याकडून अपेक्षा आहे, ते पूर्ण होत नाही तो पर्यंत ती किल्ली त्याच्या हातात येणे नाही.

पण त्याने नव्या जोमाने शोध सुरु ठेवला, अंतर्मनाचा, नव्या विश्वाचा, आचार्यांच्या विश्वाचा. त्याचे जुने आभासात्मक, मृगजळ

असलेले जग गेले, त्यानेच त्याच्याकडे पाठ फिरवली होती. कदाचित नवीन जगातील तो बिनीचा शिलेदार होता. त्याला स्पष्ट दिसत होते,

उजाडले आहे,

पण सूर्य कोठे आहे !!!

# एक मुलाखत

*(माणसाचे मन म्हणजे एक मेळावा आहे, इच्छा, आकांक्षा, भाव - भावना ह्यांचा, आणि त्यांच्या आकर्षण - घर्षणातून वस्तुस्थिती आकाराला येतें, घडत जाते. त्या सर्व प्रक्रियेचा तिरका छेद म्हणजे हि मुलाखत, जी कोणी दिली नाही, जी कोणी घेतली नाही.)*

---

(१. = मुलाखत घेणारा, २, ३ आणि ४ = मुलाखत देणारे, प्रेक्षक, नातेवाईक, आगांतुक, विक्रेता, संयोजक, छोटी मुलगी आणि तिचे वडील)

१. मित्रानो, नमस्कार !!!

आज १७ जानेवारी २०१७. मागच्या वर्षी ह्याच महिन्यात आपण भेटलो होतो, एका मुलाखतीच्या निमित्ताने. आपल्यापैकी दोन यशस्वी लघु उद्योजकांची मुलाखत मी तुम्हाला सादर केली होती. एकावर एक फुकट असल्याने लोकांना जरा बरे वाटले.... चांगला प्रतिसाद मिळाला.... चहापान आणि वडा पाव च्या counter वर अप्रतिम गर्दी झाली होती. त्या मुलाखतींवर पुष्कळ प्रतिक्रिया आल्या. बऱ्याच जणांनी चहाच्या प्लास्टिकच्या पेल्याच्या आकाराबद्दल नाराजी दर्शवली होती. पण सर्वांची एक

मुख्य तक्रार होती. 'आम्ही सुद्धा चांगली मुलाखत देऊ शकतो. आम्हाला का बोलावण्यात आले नाही?' आणि आपला हा अनुभव / प्रतिसाद लक्षात घेऊन संयोजकांनी एक नवीन, धाडसी प्रयोग करण्याची जबाबदारी माझ्यावर टाकली.

ज्ञातीतील तीन अयशस्वी माणसांची मुलाखत घेण्याचे काम माझ्यावर सोपवण्यात आले आहे. त्यातील एक जण इथे येण्यातही अपयशी ठरले आहेत. तेंव्हा बाकीच्या दोघांची मुलाखत उरकून टाकू या. आणि चहापानाकडे वळू या.

१. हं, तर तुमचे नाव काय?

२. मी ...

१. पण म्हणा नावात काय आहे, ज्ञातीतच तुम्हाला कोणी ओळखत नाही, त्यात परत आपली ज्ञातीची लोक संख्या ती काय, अनेक पोट जाती पैकी आपण एक, आणि आपण सर्व मिळून सुद्धा समाजाच्या जेम तेम १ - २ टक्के. तेंव्हा तुम्ही समाजात एक अनोळखी, अपयशी सद्गृहस्थ आहात, हे ठरले.

२. अहो पण, मी अपयशी नाही. तेच सांगण्यासाठी मी इथे आलो आहे. मी डोंबिवलीत राहतो. माझा स्वतःचा डोंबिवलीत 1BHK flat आहे. मुलगी सचिवालयात कनिष्ट लिपिक आहे, जावई engineer आहे, मुलगा बँकेत नोकरीला आहे.

३. हो, आणि मी सुद्धा double professional आहे. माझा स्वतःचा व्यवसाय आहे आणि ...

१. काय फालतू करणे देता आहात हो तुम्ही. स्वतःच्या मनाला विचारा. साधा corporator तुम्हाला ओळखत नाही. plumber ला तीन वेळा phone करावा लागतो. तेंव्हा तो तुमच्यावर मेहेरबानी करतो. भाजीवाल्याशी मराठीत बोलायची हिम्मत नाही. तुम्ही रिक्षावाल्याशी भांडू शकत नाही. lokal मध्ये गुंडाशी चर्चा करण्या पलीकडे तुमची मजल जात नाही. हे काय तुमच्या यशाचे झेंडे आहेत कि काय???

सामाजिक बांधिलकी काही आहे का नाही. तुम्ही एक सामान्य माणूस आहात. अपयशी आहात. म्हणून तर आम्ही तुम्हाला इथे मुलाखती साठी बोलावले आहे.

मला सांगा, तुमच्या अपयशाचे रहस्य काय आहे? म्हणजे बघा, तुम्हाला काय व्हायचे होते आणि तुम्ही काय झालात.

२. चिडता कशाला ! हो हे खरे आहे, मला साहित्यिक व्हायचे होते ....

१. पण तुम्ही accountant झालात. बरोबर. कारण मराठी साहित्यिक होऊन पोट भरेल आणि पैसा मिळेल ह्याची खात्री नाही. बरोबर?

२. खरे आहे. प्रसिद्ध साहित्य समीक्षक ये. ना. ची. ह्यांनी एका ठिकाणी लिहून ठेवले आहे -'अनुभव शिवाय यमक जुळवणे म्हणजे छापखान्यात खिळे जुळवणे वाटते. शब्द कळले तरी अर्थ उमगेल अशी वेदना नाही.' मग सोडून दिले सगळेच.

१. हे ये. ना. ची. कोण आणि ते मला कसे माहित नाहीत. ते कधीपासून एव्हढे प्रसिद्ध झाले. माझे वाचन इतके अफाट आहे, भविष्य पासून ते paid news पर्यंत सगळे काही वाचतो मी. मला सांगा, हे येनाची कोण आहेत?

२. येसवंत (Yesowant - h नाही.) नारायण चीनमुळगंद.

१. त्यांची काही पुस्तके / समीक्षणे, newspaper column सांगा.

२. नाही, त्यांचा प्रकाशित लिखाण काही नाही. त्याची एक tragedy च झाली. त्यांनी बरीच परीक्षणे लिहून तयार केली. प्रकाशक कडे पाठवणार त्याच दिवशी त्यांच्या लग्नाचा २५ वा वाढ दिवस होता. भेळ आणि आईस्क्रीम चा बेत होता. आणि काय योगायोग कि दुर्दैव बघा, नेमकी आदल्या दिवशीच रद्दी विकून आलो होतो. चिंटू आणि चिंटूच्या आईला आयत्या वेळीस भेळी साठी कागद सापडेना, मग काय सगळी परीक्षणे वापरली. एक अ-मोल ठेवा नष्ट झाला.

मी वाचली आहेत ना त्यांची परीक्षणे. पु. ल., नेमाडे, दळवी, श. ना. नवरे, व. पु. काळे, कुसुमाग्रज.

१. काय, काय, पु. ल. बद्दल काय म्हटले आहे त्यांनी.

२. अख्खा पु.ल. वाचला. पण पु.ल. च्या लिखाणात अभिजात साहित्यातला भारदस्त पणा कोठे दिसला नाही. व. पु. काळे - त्यांच्या कडे दलित साहित्यिकांची पोट तिडीक नाही. कुसुमाग्रज .... नवोदित साहित्यिकाचा अबोध संदिग्धपणा नाही.

प्रेक्षक : अहो, हे म्हणजे कादंबरी हा शब्द कोष का नाही असे विचारण्यासारखे आहे, साहित्य म्हणजे अक्षरांची गोळा बेरीज आहे कि शब्द आणि अर्थाचा ताळेबंद आहे? शेवटी accountant !!!

१. हो का !!! तुम्हाला त्यांच्या बद्दल बरीच माहित दिसते. चांगले मित्र दिसतात तुमचे. सगळी personal माहिती सुद्धा आहे, कोण, कुठचे, कुठे राहतात हे येनाची.

मला एकच चिठ्ठी दोन वेळा आली आहे, ती वाचतो. 'चिंटू च्या मम्मी च्या पप्पांचा flat आहे, लक्षात आहे ना?' काय चावटपणा आहे हा, इथे विषय काय चालला आहे आणि ...

२. हो, bed room चे leakage तीनदा काढले तरी गेले नाही आणि kitchen ओटा वर कळकट कडप्पा होता, तो मी, मी बदलून चांगला granite टाकला. लक्षात आहे ना.

१. अहो हे काय चालले आहे तुमचे, तुम्ही ओळखता?

२. येनाची (h नाही.), हे टोपण नाव आहे, माझे, आणि चिंटू माझा धाकटा मुलगा.

१. अच्छा म्हणजे, तुम्ही साहित्यिकाचे, समीक्षक होता होता, आम्ही वाचलो.

मित्रानो, ह्या प्रेमळ संवादा पासून जरा दूर जाऊ या आणि आपले दुसरे पाहुणे आलेत त्यांच्याशी थोड्या मन मोकळ्या गप्पा गोष्टी करू या. हं, तर आपण काय करता.

३. मी income tax, sales tax consultant आहे. हे माझे business card.

१. अरे वा, तुम्ही ca आहात?

३. अर्धा ca. माझी स्वतःची practice आहे. गिरगावात.

१. पण अर्धा ca, म्हणजे?

३. अहो सोप्पे आहे. ca inter pass. परिस्थितीने नाही जमले. ४ - ५ attempt दिले. शेवटी स्वतःच सुरु केली practice.

ITO आणि sales tax इन्स्पेक्टर समोर तुमच्या degree चा काही उपयोग नाही. dashing पाहिजे. देणं घेणं नीट ठरवता आले पाहिजे.

१. आता मागे वळून बघताना तुम्हाला काही खंत वाटते का, ca final करू शकला नाहीत, एक पूर्ण व्यावसायिक होण्यात अपयशी झालात म्हणून.

३. नाही, आजीबात नाही. मी ca होणे हे माझ्या वडिलांचे स्वप्न होते, मला तर यशस्वी शेतकरी व्हायचे होते. मला B. Sc. Agri. ला जायचे होते. कोकणात आमची पिढीजाद अडीच एकर जागा आहे. पण वडील म्हणाले, नको, शेती करून कोणी मोठे झाले आहे? आंब्याची एक पेटी येते तेव्हडी बस्स.

१. किती जणात सामायिक आहे?

३. ४ जणात, त्यात परत भाऊबंदकी.

१. मग स्वतः जमीन घेऊन आंबा, काजू लागवड करायची.

३. वडील म्हणाले, B. Sc. Agri. ला मुली सांगून येत नाहीत. शिवाय जमीन खरेदीला bank कर्ज देत नाही. आयुष्य म्हणजे एक income tax case झाली आहे, अपील केले तरी नुकसान आपलेच, अपील नाही केले तरी नुकसान आपलेच.

१. जाऊ द्या हो. माय बाप सरकारची कृपा आहे.

३. हो ना, एकही शस्त्र न उचलता आमची पूर्ण पिढी गारद केली ह्या सरकारने.

१. खरे आहे, परिस्थिती पुढे आपले काही चालत नाही, ह्यालाच अपयश म्हणतात, नाही का.

२ आणि ३.आपले नशीब, आणखी काय.

१. बरोबर आहे. तुम्ही हेच म्हणणार. आपले अपयश दुसऱ्याच्या माथी मारायचे. स्वतः कमी पडलो, आपले प्रयत्न कमी पडले, असे का मान्य करत नाही? मुळात प्रयत्न तरी केले होते का? तुमचे स्वप्न, तुमचे यश - अपयश हा कधी तुमच्या जीवन मरणाचा प्रश्न झाला होता का?

२ आणि ३.नाही. खरे आहे. पण आम्ही आमचा वकूब वेळीच ओळखला. आमची धाव कुंपणा पर्यंत. तक्रारीला जागा नाही.

१. लक्षात येत आहे का तुमच्या, पण त्या मुळेच तुम्ही ठार अपयशी झाला नाहीत. हे त्यातल्या त्यात एक समाधान आहे. पण सांगा, निदान तुमच्या निवडलेल्या व्यवसायात तरी तुम्ही काही यश कमावले, काही स्थान मिळाले.

एक स्त्री - अहो तुम्ही का म्हणून आमच्या चित्ठ्या वाचून दाखवत नाही आहात?

१. त्यांचा आपल्या कार्यक्रमाशी काही संबंध नाही.

ती स्त्री - नाही कसा, १०१ रुपये देऊन आलो आहोत आम्ही, बाकीच्यान सारखे फुकट नाही. चिठ्ठी वाचा म्हणजे सगळा उलगडा होईल.

१. चीत्ठी - "तू कशाला घाबरतो? सांग जगाला, भाउजीनी फसवले हो फसवले. आंब्याची सगळी झाडे वठली, असे सांगून आमची जमीन नावावर करून घेतली. पण आमचा मधु सांगतो, २०० पेट्र्या येतात वाशी मार्केटात, वर्षाला. आम्हाला एक पेटी पाठवायला जड होते हो."

दुसरी स्त्री - आम्ही काही फसवले नाही हो, आंब्याच्या मोसमात सगळे येऊन लुटून नेतात, भावजी, त्यांची मुलगी, तिच्या सासरची मंडळी, मुलाचे मित्र, वन्संच्या office मधले retired म्हातारे - कोतारे. कोणाचे कोण कोण, आहो, इथे कष्टाला मी एकटीच असते हो.

(संयोजकांनी वेळीच धोका ओळखून जाहिरातींसाठी break घेण्याची सूचना केली.)

१. अरे वा, आपले तिसरे पाहुणे नियोजित वेळी नाही तरी नियोजित ठिकाणी पोहोचण्यात यशस्वी झाले आहेत. स्वागत आहे. कार्यक्रम मध्यंतरापर्यंत येऊन ठेपला आहे. जाहिरातींसाठी

break घेण्याची वेळ झाली आहे, तेंव्हा ह्या जाहिराती बघा आणि ऐका.

जाहिरात करणारा विक्रेता पुढे आला, त्याने एक मोठा cut - out पुढे आणला आणि जाहिरात करण्यास सुरुवात केली.

SITEES !!! 'THREE IDIOTS' FAME SITEES !!!

आधुनिक, हलक्या, सुखकारक, टिकाऊ SITEES !!!

तीन प्रकारात उपलब्ध - आमीर, शाहरुख आणि सलमान.

आमीर - आकर्षक, रंग बदलणाऱ्या, SITEES, राजकारणी लोकांसाठी उपयुक्त.

शाहरुख - चित्र विचित्र अस्थिर, SITEES, सासू - सासरे, अनावश्यक पाहुणे ह्यांसाठी.

सलमान - ओबड-धोबड, दणकट, SITEES, निरुपयोगी शहाण्या किंवा उपयोगी मूर्ख माणसांसाठी.

आमीर आणि शाहरुख, एकदम दोन घेतल्या तर सलमान फुकट.

आमीर, शाहरुख आणि सलमान तीन एकदम घेतल्या तर PK फुकट.

तीन आकारमानात उपलब्ध, X, XL आणि XLL. कोणत्याही पार्श्वभागासाठी सोयीस्कर.

SITEES !!! 'THREE IDIOTS' FAME SITEES !!!

प्रेक्शक ह्या PK काय आहेत?

वीक्रेता PK - जुन्या टाकाऊ sitees, CLEARANCE SALE.

प्रेक्षक tape recorder सकट?

विक्रेता नाही.

प्रेक्षक tape recorder शिवाय? ........ बाप रे ! नको नको.

**********

१. break नंतर आपले स्वागत. आपण आपल्या पाहुण्यांच्या अपयशाच्या कारणांची चर्चा करतो आहोत. दुसऱ्याच्या अपयशाचे analysis करताना एक त्रयस्थ म्हणून सगळ्या गोष्टी कशा स्वच्छ दिसतात नाही? मला तुम्हाला असे विचारायचे आहे, तुमचे निर्णय तुमच्या वतीने दुसरेच लोक घेत होते का, तुमचे वडील असोत, तुमचे कुटुंब असो, ....

४. किंवा तुमचे मित्र असोत.

१. बरोबर. त्यांनी ठरवले, तुम्ही मान डोलावली, तुम्हाला काय जमेल, काय जमणार नाही, ह्याचा अंदाज त्यांनी घेतला, तो अंदाज चुकला, हे तुमच्या अपयशाचे एक महत्वाचे कारण असू शकते.

३. आता अपयशी ठरल्या नंतर बोलण्यात काय अर्थ आहे?

२. खरे म्हणजे, आम्हाला स्वतःलाच काय हवे आहे, काय करायचे आहे, हे माहित नव्हते. एक ठाम विचार नव्हता. वारा येईल तशी पाठ फिरवायची, survival, हेच महत्वाचे होते. प्रवाह पतीताला कोणत्या दिशेने वाहायचे, स्वातंत्र्य नसते.

१. म्हणजे जुन्या पिढीच्या भाषेत, एक ध्येय नव्हते, स्वतःचा Agenda नव्हता. तात्कालिक विषयांवर चर्चा होत राहिली. पण ठोस विषयच पुढे आले नाहीत. असे काहीसे झाले का?

३. प्रवाहाच्या दिशेने जाताना सुद्धा किनाऱ्यावर विविक्षित ठिकाणीच जायचे असेल तर प्रवाहाला कापत जावे लागते, तेव्हढी शक्ती असणे जरूर आहे. time and tide wait for none.

2. आम्ही लाटेवर स्वार होण्यासाठी ready नव्हतो, त्यासाठी लागणारे कौशल्य आमच्याकडे नव्हते. office मध्ये Y २ K ची

लाट आली, तेंव्हा आम्ही संगणकाकडे संशयाने बघत बसलो. आम्ही विद्यार्थी राहिलो नाही.

१. बरोबर. काळाबरोबर चालण्यासाठी सतत शिकत राहण्याशिवाय पर्याय नाही. शिक्षण आणि कौशल्य ह्याचा अभाव. लघु लिपिक संगणकामुळे घरी बसले, त्यांना संगणकाला आत्मसात करणे अगदि सोपे होते. पण attitude आडवा आला.

३. यश आसरा शोधत होते तेंव्हा आम्ही वाह्यातपणे दरवाजा बंद केला. जेंव्हा MNCs स्थानिक माणसाचा आधार मागत होत्या तेंव्हा आम्ही भागीदारकी न मागता, स्थानिक अधिकारांचा लढा पुकारला. पुन्हा. चुकीचा attitude.

१. attitude. mindset. अपयश समोर उभे दिसत असताना आम्ही बदललो नाही, इतके का आपण आडमुठे - माथेफिरू आहोत?

२. आपले जगावेगळे विचार आणि अफलातून सामाजिक बांधिलकी.

१. तुम्ही सांगा, सामाजिक बांधिलकी म्हणून तुम्ही रोज काही करता?

३. मी रोज नेमाने कबुतरांना दाणे / जोंधळे घालतो. भूतदया म्हणा, आपली वैश्विक जबाबदारी म्हणा. बरे वाटते !!!

१. हो, आणि तो खाटिक ही रोज नेमाने कबुतरांना पकडून, hotel ना विकतो. कबुतरांचा उपद्रव कमी व्हावा म्हणून. सामाजिक बांधिलकी कशी काम करते आहे, सुंदर. पण विषय भलतीकडे चालला आहे. प्रश्न आहे attitude चा.

२. चुकीच्या attitude मुळे होते काय कि आपण ज्या शिडीने वर जायचे तिला चुकीच्या भिंतीवर लावतो, वर चढून जातो आणि पाहतो तर काय, तुरुंगाच्या बाहेर पडायच्या ऐवजी पोलिसाच्या घरात उतरलो आहोत. आणि मग रडतो.

३. हा सगळ सापशिडीचा खेळ आहे.

१. मग काय, हे फक्त नशिबाचे दान कसे पडते त्यावरच सगळे अवलंबून आहे?

आगांतुक (हा थोडा प्यायलेला आहे.) : बराच वेळ मी ऐकून घेतो आहे, मला थोडे सांगायचे आहे, मी, मी सर्वात अपयशी माणूस आहे.

१. नाही, नक्कीच असाल, पण तुमची मुलाखत पुढच्या वर्षी घेऊ या.

आगांतुक : नाही, का म्हणून, तुम्ही माझे ऐकल्याशिवाय मी इथून जाणार नाही.

(थोडी बाचाबाची, गडबड, गोंधळ. संयोजक शांतता प्रस्थापित करायचा प्रयत्न करतात, पण आगांतुक माणसाचा स्वतः वर ताबा नसल्याने आणि तो हट्टाला पेटल्याने, संयोजक त्याला १० मिनिटाचा अवधी द्यायला तयार होतात.)

१. सांगा, आज अचानक तुम्हाला हा साक्षात्कार कसा झाला कि तुम्ही घोर अपयशी आहात.

आगांतुक : त्याचे काय झाले, आज सकाळी उठलो तर छान, सुंदर सकाळ झाली होती. प्रसन्न वाटत होते. चहा झाला. ही म्हणाली आज पाडवा आहे, लवकर आंघोळ करून घ्या. आता वर्षाचा पहिला दिवस. म्हटले, काही ठोस निर्णय घेऊ आज, मग लगेच जाहीर केले breakfast च्या table वर, आज पासून मी सोडली.

१. हे सांगण्यासाठी तुम्ही एव्हढी मारामारी केलीत.

आगांतुक (दुर्लक्ष करून) : ही फक्त हसली. मुलगा म्हणाला, शोभेची दारू ना? नातीने आठवण करून दिली, आजोबा मला तुम्ही promise केले आहे, खूप फटाके फोडणार. मग मी चक्क scotch ची बाटली bedroom मधून drawing room च्या दर्शनी कपाटात आणून ठेवली आणि हिला सांगितले. बघ,

आजपासून मी रोज हिच्याकडे असे बघणार, पण हात लावणार नाही. मी कशी पीत नाही हे तुला रोज दिसेल.

पण दुपारी जेवायच्या वेळेस कपाट उघडले तर बाटली रिकामी. अपमान, घोर अपमान केला हिने scotch चा आणि माझा. scotch चक्क ओतून टाकली wash basin मध्ये. ४० वर्षाच्या संसार नंतर सुद्धा एव्हढा अविश्वास. मी तडक बाहेर पडलो, येऊन इथे झाडाखाली सावलीत बसलो. तुम्हाला सांगतो, हे नक्की बोधीसत्वाचे झाड आहे, मला एक नवीन fresh सत्य कळले आताच. माझ्या अपयशाचे कारण. म्हटले, तुमच्याशी share करावे.

१. हो का ? मग काय आमचा नाईलाज आहे, करू या share.

आगंतुक : कोणतीही गोष्ट ठरवली कि मी त्यात हमखास fail होतो. ती गोष्ट घडत नाही. न ठरवता घडते, पण ठरवले कि नक्की घडत नाही.

१. अहो, काय timepass करताय, बंद करा, तुमची वेळ संपली.

आगांतुक : आताच तर मी सुरुवात केली आणि लगेच वेळ संपेल कशी. तर, मी एक उदाहरण देतो, समजा मी ठरवले चहा

प्यायल्या शिवाय वर्तमान पत्राला हात लावायचा नाही, तर त्या दिवशी हटकून दुध नासणार नाहीतर वर्तमान पत्र येणार नाही.

तुम्हाला सांगतो, एक जण माझ्या मनात लपून बसला आहे. तो माझ्यावर लक्ष ठेवून असतो, २४ तास, मी मनाशी काही ठरवले तर लगेच त्याला कळते. आणि तो ती गोष्ट होऊन देत नाही. माझ्या मनातले सगळे त्याला समजते. त्यामुळे मला माझ्या खाजगी गोष्टी, माझ्या मनापासून लपवून ठेवाव्या लागतात.

१. असे, आणि हे तुम्ही कसे करता?

आगांतुक : अहो, आपल्याला ज्या गोष्टी लपवायच्या आहेत, त्या मनात आणायच्याच नाहीत.

१. असे करता येत असते तर !!! आणि हे तुम्ही कसे करता?

आगांतुक : त्याच्या साठी मी एक घरगुती युक्ती शोधली आहे. जप करायचा. जपामुळे मनात येणारे विचार थांबवता येतात. तुम्हाला ती गोष्ट मनात येते आहे असे वाटले कि जप सुरु करायचा. जसे, || ओम नमो भगवते वासुदेवाय || आणि कृष्णाचे विश्व रूप डोळ्यासमोर आणायचे, आकाश दर्शनापासून सुरुवात करायची. निरनिराळ्या आकाश गंगा - तेजस्वी आणि अविरत उर्जेचा महा कल्लोळ, तारे - नवीन जन्म घेणारे आणि अस्तंगत होणारे, त्यांच्या पाठीमागे फरपटत जाणारे ग्रह, जोडग्रह आणि उपग्रह, विश्वाच्या

निर्मितीचे कोडे, लाखो प्रकाश वर्षे पसारा असलेल्या आकाशगंगा ज्यात हरवून जातात अशी कृष्ण विवरे आणि त्या कृष्ण विवराना समीकरणा मध्ये बांधणारे गणिती, जेव्हढे सूक्ष्म तेव्हढेच विराट, तरीही एकजीव, ते सारे विश्व रूपच नाही का. ते विश्व रूप फिकट होते आहे असे वाटले कि पुन्हा || ओम नमो भगवते वासुदेवाय || म्हणजे, जप हा ठेका आणि विश्व रूप हे संगीत. असे ऐकता, बघता वेळ आणि काळ निघून जातो आणि आपल्या लपवलेल्या गोष्टींचा त्याला सुगावा लागत नाही. जमायला थोडा वेळ लागेल, माझा अनुभव आहे , पण जमेल. जमायला काय हरकत आहे.

प्रेक्षक : प्रभूची लीला अगाध आहे. एका दारूड्याकडून सत्याचे उच्चारण होते आहे.

आगांतुक : दारुडा कोणाला म्हणता हो, पण जाऊ द्या, माफ केले, मुद्दा आहे अपयशाचा.

३. तुम्ही आणि अपयशी? हे सभागृह तुमचे, तुम्ही नामांकित वकील, घरी चार गाड्या, नोकर चाकर, मुलगा उद्योजक, सून principal. सगळे तर मिळाले आहे नशिबाने. आणखी काय पाहिजे?

आगांतुक : तेच तर अपयश आहे हो, जे काय मिळाले ते नशिबाने, स्वतःच्या प्रयत्नाला कधी यश मिळाले नाही. मी जी गोष्ट

अंगावर घेतली ती फसली, बुडाली. पण तीच गोष्ट कालांतराने अपोआप घडली तेंव्हा मला credit मिळाले फुकटचे. मी सांगतो, तो माझ्या मनातला हितशत्रू माझ्या यशाच्या आड येत असतो नेहमी. माझी प्रयत्न वाया जातात आणि मी आयुष्यभर अपयशाचा शिक्का आणि असमाधान, खंत घेऊन वावरलो. आणि आता तर आत्मविश्वास ही गमावून बसलो. मी थकलो, मी त्याच्या समोर हरलो.

मला व्हायचे होते शास्त्रज्ञ, आणि झालो फडतूस वकील. संपले.

३. तुम्ही अपयशी म्हणवता तर मग तुमची वकिली कशी काय चालली?

आगांतुक : त्यात माझा वाटा काही नाही. अशीलाची बाजू सत्याची होती आणि म्हणून ते जिंकले. 'मी तो हमाल भार वाही.' मी ठरवले आणि ती केस जिंकलो असे कधी झाले नाही. मला आताशा काही ठरवायची सुद्धा भीती वाटते. त्याला कळले तर.

एक गृहस्थ : sorry, ह्यांनी तुमच्या कार्यक्रमात काही व्यत्यय आणला का. ह्यांना कोठे काही बोलायचे कळत नाही. ह्यांची मानसिक स्थिती जरा नाजूक आहे. ह्यांना भास होत असतात.

एक छोटी मुलगी : आजोबा तुम्ही कोठे हरवलात, आम्ही किती शोधतो आहे तुम्हाला, आपल्याला फटके उडवायला जायचे आहे ना, चला बरे.

आगांतुक : बरे आहे मंडळी, जातो. काळजी घ्या. चूक भूल द्यावी घ्यावी, लोभ असावा हि विनंती.

(आगंतुक, छोटी मुलगी, गृहस्थ निघून जातात.)

४. मी काही बोलू का? व्यावहारिक यश आणि अपयश बाजूला ठेवा थोडा वेळ, कामावरील निष्ठा त्याग, मैत्री, प्रेम, महत्वाचे. 'चालण्यातच आहे चालण्याची सांगता.'

१. म्हणजे, मुक्कामाला कधीच न पोहोचणारे प्रवासी. Young Man, what is your unsuccessful story? Let us hear it out, loud and clear, from horse's mouth.

2. बरे वाटले, सलग दोन वाक्ये इंग्रजीत म्हटलीत, पत्रकार काय किंवा समीक्षक इंग्रजीत बोलू शकला कि त्याचा भाव दुप्पट होतो.

३. ज्याला काहीच येत नाही, पण इंग्रजीत फाड फाड बोलू शकतो, तो पत्रकार होतो. आणि अरसिक बुद्धिवान माणूस, समीक्षक होतो.

१. आपण मराठी / स्पष्टवक्ते आहोत, पण आपली trade secrets सगळयांना न कळली तर बरे होईल. असो, तरुण माणसा वेळ थोडा आणि सोंगे फार आहेत. पुढे बोल. तू आलास बरे झाले, मन मोकळे कर.

४. माझी ती काय कथा असणार !!! मी १० वी नापास. वडील शिंपी. आई त्यातच काही बाही करत राहाची. बटण, काजे, रफू, जुने पुराणे कपडे खरेदी विक्री, करायची. बहिण धाकटी, सगळयांची लाडकी, शेंडेफळ. मला बाबांनी कपड्याच्या दुकानात लावले, किती तरी वेळा. पण माझा जीवाचा अगदी कोंडमारा होई, salesman ची नोकरी करताना. एक दोन वर्षे काढली दुकानात, बाबांकडे बघून.

मग मला भेटला मिनू. सिंहगड वर. पहिल्या भेटीतच जणू जीवाचे मित्र झालो. दर रविवारी सिंहगडावर, जायचो. सगळा खर्च मिनू करायचा. माझ्याजवळ पैसे नाहीत ही सबब त्याने कधी accept च केली नाही. मला तर पिंजऱ्यातून बाहेर पडायला निमित्तच हवे असायचे. त्याच्या मुळे मला गिरीभ्रमणाची आवड लागली. मग आम्ही दोघांनी उत्तरकाशी येथे जाऊन गिर्यारोहणाचा ३० दिवसांचा course केला. पैशाची लागेल ती मदत केली त्याने. फक्त मलाच नाही तर माझ्या पूर्ण कुटुंबाला. त्यानंतर आम्ही

गिर्यारोहणाचे पुढचे दोन advanced course पूर्ण केले आणि आम्हाला आता हिमालयातल्या मोहिमांच स्वप्ने पडू लागली.

घराची परिस्थिती फारशी बदलली नव्हती. पण मी वर्षातून एकदा guide म्हणून काम करून बाबांना हातभार लावत असे.

गिर्यारोहणात आमचे mentor होते बापूकाका. कडक शिस्तीचे. gazeteer, maps आणि climbing routes ह्यात प्राथमिक planning त्यांचेच होते. आमची प्रगती बघून त्याने आम्हाला एक अशक्यप्राय स्वप्न दिले, everest चे. त्यासाठी त्यांनी roadmap पण दिला.

जगायला एक जबरदस्त कारण दिले.

प्रथम गंगोत्री सर करायचे. नंतर केदार डोम, नंतर श्री कैलाश, असा high altitude आणि snow / ice मधला अनुभव घ्यायचं. मग कामेत २५,००० फुट उंच सर करायचे. आणि नंतर everest चे आव्हान स्वीकारायचे.

१. मग पुढे काय झाले?

४. आम्ही ठरवले होते तसे दर वर्षी एक मोहीम केली. गंगोत्री climb केले, केदार डोम सर केले. श्री कैलाश शेवटच्या camp नंतर, summit attempt, हवामान बिघडल्यामुळे सोडून द्यावा लागला. पण आम्हाला सर्वांगीण अनुभव मिळाला, जे ध्येय

बापुकाकानी आमच्या पुढे ठेवले होते. तीन मोहिमा केल्याने आमचा आत्मविश्वास वाढला. आम्हाला लोक ओळखू लागले, आदर आणि मान सन्मान मिळाला. माझ्या आयुष्याचे जणू परीस स्पर्श होऊन सोने झाले.

मोहिमेवर असताना निसर्गाने मला त्या निर्जन प्रदेशाचे निरिच्छ राजेपण दिले. मी आतून स्वच्छंद, स्वतंत्र, स्वाधीन झालो, समाधानी झालो. मी माझी गरिबी विसरलो. माझ्या यशात माझे कुटुंबही सामील झाले आणि कशाची उणीव जाणवली नाही.

३. मग कामेत चे काय झाले, सर केले का .

४. दुर्दैव आड आले.

४. कामेत च्या पूर्व तयारीसाठी मिनू नंदाखाट च्या मोहिमेवर दुसऱ्या group बरोबर गेला होता. तिथे climb करताना traverse वर avalanche मध्ये सापडला. त्या पाठोपाठ माझा climbing partner विजय कालिंदी ३ वर guide म्हणून गेला होता तो परत आलाच नाही. तोही रात्री झोपेतच avalanche मध्ये सापडला आणि वाहून गेला.

त्या धक्क्यातून मी कधी सावरलो च नाही. अचानक घराच्या जबाबदाऱ्या, बहिणीचे लग्न, आईचे आजारपण अंगावर आले. मी

कोसळलो. सगळ्यांना सोडून हिमालयात जाणे अपराधीपणाचे वाटू लागले. सगळे संपले होते.

१. फार वाईट झाले. तुमच्या प्रामाणिक प्रयत्नांना मर्यादित यश आले.

२. गरिबी वाईट असते.

३. त्या पेक्षा वाईट असतात नात्यांच्या बेड्या. आणि प्रेमाच्या रेशीम गाठी.

४. नाही, तो सर्वस्वी माझा एकट्याचा निर्णय होता. माझे आई - वडील - बहिण, त्यांनी तर मला सावरले. आणि गिर्यारोहण सोडले तरी तो निसर्ग माझ्या मध्ये खोल रुजला आहे. एका क्षणात, एका आठवणी सरशी, मी भूतकाळात हरवतो. वर्तमान काळ पुसला जातो आणि मी हिमालयात कोणत्या तरी धारेवर चढत असतो, कधी कोठल्या ओढ्यात पाय बुडवून पलीकडची वाट धरतो, कधी शेकोटीपाशी पायमोजे वाळवत बसलेला असतो. तोच आनंदाचा कवडसा काळाची दरी ओलांडून इथे येतो.

मी माझ्या मित्रांच्या विरहाच दुःख आत्मसात केले आहे.

२. तुम्ही अगदी साहित्यिक - कवी असल्यासारके बोलता आहात.

४. निसर्गातल्या एकांतात मला फक्त हेच ऐकू आले, ऐकू येत होते. मी काही भर टाकू शकलो नाही.      पण ऐकले, तास आणि तास ऐकत राहिलो.

१. बरे, आता काय करत असता तुम्ही.

४. आजही मी लक्ष्मि रोड वरच्या कपड्याच्या दुकानात salesman ची नोकरी करतो. आणि स्मरण म्हणून लहान मुलांच्या साठी treks आयोजित करतो, जवळ पास सह्याद्रीत. मी एकटाच असतो. पुढे मागे, जमलेच तर, बापूकाका Junior होण्याची इच्छा आहे.

१. तुमच्या कडे बघून मी confuse झालो आहे, यश, पैसा, सत्ता, रूढ प्रेम, किती गौण आहे, आंतरिक समाधान - आपल्या वाटेचे कष्ट करून उरल्याचे समाधान, मोलाचे आहे.

Here is a man, who salutes his own passing away parade, so calmly that you can hear his heart beat, which is the drum beat of the parade.

2. कारण काही असले तरी तुम्ही तुमचे ध्येय गाठू शकला नाहीत, म्हणजे तुम्ही पण अपयशीच आहात.

४. होय, मी अपयशीच आहे आणि त्याचे कारण म्हणजे मी जन्मतः आणि स्वभावाने अनुयायी आहे, leader नाही. मिनू गेला,

विजय गेला, पण मी त्यांची जागा भरून काढू शकलो नसतो. सेनापती गेला, सैन्याने माघार घेतली, ते हरले. मी हरलो.

३. जाऊ द्या, आपण सगळे अपयशी ठरलो, अपयश हे यशाची पहिली पायरी आहे असे म्हणून सोडून देऊ या.

२. पण तुम्ही, व्यावसायिक मुलाखतकार आहात, प्रथित यश पत्रकार आहात, एक नावाजलेले TV anchor आहात. मान्यता प्राप्त columnist आहात, तुमच्या यशाचे रहस्य काय?

१. होय, व्यावहारिक यश खूप मिळाले. पैसाही मिळाला. पत्रकारांना जे perks मिळतात ते सगळे मला भरपूर मिळाले. खाणे आणि पिणे सुद्धा, महागड्या gifts, foreign trips, प्रसिद्धी, मान - सन्मान, मिळाले. सत्तेची ऊब मिळाली, सत्तेची झळ कधी लागली नाही.

२. You achieved a lot, in such a young age and within a short span of time. We envy you.

१. Wait, Hold your horses, there was a cost to it, there are no free lunches. Higher the rewards, highest is the cost.

१. माझ्या career ची सुरुवात cost ने झाली आणि अजून मी किमत मोजतोच आहे. दोन वर्षे struggle करत होतो, पण

नोकरी नाही. शेवटी राजकीय नेत्यांचा ghost writer व्हावे लागले, नेता जेव्हढा जास्त अडाणी आणि भ्रष्ट, तेव्हढे पैसे जास्त. एकदा स्वातंत्र्य विकले कि ते परत मिळत नाही. क्षणाचा गुलाम, आयुष्याचा गुलाम.

Main Stream Media च्या flop show मधील अपयशी कलाकार आहोत आम्ही. Social Media चे फटके खातो तरी मन मारून, मान खाली घालून, मालकाचा political agenda पुढे सरकवावा लागतो, त्याचे व्यावहारिक आणि राजकीय गणित सांभाळावे लागते. पत्रकारांनी सामाजिक बांधिलकी सोडली, म्हणून आम्हाला presstitutes म्हणून हिणवण्यात येते. पत्रकाराचे हे सर्वात मोठे अपयश आहे.

स्वगत : (मी ही फालतू जबाबदारी घेतलीच का, CM ची प्रेस conference cover केली असती तर बरे झाले असते.)

(एक कर्कश बेल वाजत राहते. hall चा नोकर वेळ संपल्याची सूचना देऊन, वाट न पाहता खुर्च्या आवरायला घेतो.)

लोकहो, नमस्कार, आपली वेळ संपली. परत कधी तरी भेटू. आभारी आहे. नमस्कार. (driver गाडी काढ.)

संयोजक : यश इतके फसवे असू शकते, जरा ओरखडा उठला तर आतली अपयशाची जखम भळ भळ वाहू लागते. पण तरी ते

हवे हवेसे वाटते. चालणारयाला बळ देते. त्या शिवाय जीवन व्यर्थ वाटते. यशाइतके दुसरे काही प्रिय नाही.

आजचा 'सर्वात अपयशी' पुरस्कार मी आता जाहीर करतो.

*************

# ल्युसी 2.0

(ल्युसी ह्या इंग्रजी चित्रपटाचा हा पुढचा भाग. ल्युसी २.०. त्यावर आधारित सत्य कथा.)

---

मी इन्स्पेक्टर ला निरोप पाठवला, I AM EVERYWHERE, तोच अज्ञातावर आपटून माझ्याकडे साभार, उत्तरासकट परत आला.

मेणाची बाहुली समुद्राची खोली बघायला गेली, आणि समुद्रात सामावली न गेल्याने समुद्राने तिला किनाऱ्यावर परत पाठवावे, तशी चैतन्याची एक लाट आली आणि मला मूर्त आणि मर्त्य माणसांच्या कोलाहलात सोडून गेली, जाता जाता हा निरोप देऊन.

'LUCY DEAR,

YOUR BRAIN IS NOT THE CREATIVE OWNER OF THE UNIVERSE ; THERE IS MIND AND THE BEYOND. YOUR MIND IS THE KEY, WIPE IT CLEAN SO THAT YOU CAN WRITE

ON IT AFRESH THE LETTERS OF JOY AND HAPPINESS AND BLISS.

YOU ARE LIKE A CHILD WITH SOME EXTRAORDINARY GIFTS. BEING HUMAN AND ALIVE FOR A CAUSE IS ONE OF THEM.'

मी परत आल्याचे बघून Professor Newman ह्यांना खूप आश्चर्य वाटले आणि आनंद झाला. "Professor, मी काळाच्या पाठीमागे जात जात विश्वाच्या निर्मितीच्या क्षणापर्यंत गेले आणि तो निर्मितीचा क्षण साक्षी भावाने अनुभवला. त्यापलीकडे जायचे होते पण माझी शरीराशी जोडलेली नाळ तुटली नव्हती. त्यामुळे मी खेचले गेली आणि पुन्हा शरीरात प्रतिष्टीत झाले."

मी खूप गोंधळून गेले होते. Professor Newman ह्यांना आणखी काही स्पष्टीकरण न देता मी त्यांचा निरोप घेतला.

************

मनात विचारांची गर्दी झाली होती. अनेक उर्मी एकाच वेळी दाटून आल्या. मी पूर्णपणे मुक्त झाल्याचा आनंद होता. मी गुन्हेगारीच्या विश्वातून जिंकून बाहेर आले, त्याचा आनंद होता. मी बिजली प्रमाणे लखलखले, तळपले, गुन्हेगारीच्या विश्वावर आदळले, आणि अदृश्य झाले. मी जणू एका दुष्ट स्वप्नातून बाहेर

आले, दुष्ट चक्रातून निसटले. माझ्यातील विराट शक्तीचा अनुभव मला आला. माझ्यावरचा अन्याय हे एक निमित्त होते. पण माझ्यातील शक्तीचा आविष्कार आणि मुक्तीचा आनंद स्वयंभू होता.

तरीही एक विचार मनाला स्पर्शून गेला. (माझ्या प्रमाणे) एखादी श्रेणी अनंतापर्यंत जाणारी असावी पण अनंत नसावी, तिला काय नाव द्यावे, तिची गोळाबेरीज काय होते आणि तिच्या मर्यादा काय असतात, तिने स्वतःला काय म्हणावे. काय करावे.

तेव्हढ्यात जाणवले, आई माझी आठवण करत होती. माझ्या सुरक्षेची तिला चिंता असावी, मी लगेच फिलाडेल्फियाला घरी पोहोचले, दारावरची घंटा वाजवली. मला सुखरूप बघून आई हरखून गेली. आम्ही मग किती वेळ जुन्या आठवणीत रमलो. माझ्या बालपणाच्या, वडिलांच्या, मित्र मैत्रिणींच्या. आम्ही मनसोक्त फिरलो, window shopping केले. आईसाठी एक सुंदर dress आणि hat घेतली.

मग मी माझ्या room partner ला भेटायला गेली. मी दिलेली औषधे तिला लागू पडली आणि ती आता दुखण्यातून बाहेर येते आहे हे बघून मला बरे वाटले. पण तिच्या प्रश्नांच्या भडीमाराला मी जास्त उत्तरे आणि खुलासे न देता बाहेर पडले.

गेल्या काही दिवसातील वेगवान घडामोडीनंतर एक निवांत क्षण समोर आला. त्या क्षणाचा आनंद घेत, शांतपणे कॉफी पिताना मला एक प्रश्न पडला, "पुढे काय?". यक्षप्रश्न. ह्या प्रश्नाचे कोणतेही उत्तर १०० टक्के बरोबर च असणार पण ते अपूर्ण हि असणार हे ही जाणवले. (१००% = पूर्णत्व हा भास आहे, हे एव्हाना मला उमगले होते.) प्रश्नाचा आवाका विश्वापेक्षा मोठा होता, एकक्षण वाटले माझ्या ज्ञानाचा हा पराभव तर नाही ना? पण मी हारणार नव्हते, सोडणार नव्हते. आणि नियतीने टाकलेले "पुढे काय?" हे सर्वात गूढ कोडे सोडवायचे असा मी निर्धार केला. पण मी वेळ मागून घ्यायचे ठरवले, त्या प्रश्नाबरोबर मी तह केला, एक वर्ष मी माझे जीवन माझ्या आवडी प्रमाणे जगावे आणि एक वर्ष नंतर इथेच पुन्हा स्वतः स्वतःला भेटावे. आणि ठरवावे.

मी एक निष्ठावान आणि श्रद्धावान अनुयायी, ख्रिस्ताची भक्त होते, दर रविवारी चर्च मध्ये जात असे. चर्च मध्ये पोहोचले आणि लक्ख, सोनेरी सकाळच्या उन्हात चर्च चे आवार जणू दैवी वाटले. प्रसन्न होऊन आत शिरले.

प्रार्थना संपली. मी येशूच्या पवित्र आठवणीत नतमस्तक झाले. तेव्हढ्यात समोरून हाक आली आणि सांगण्यात आले, "भारतात जा." पण समोर तर कोणीच नव्हते. मला वाटले भास

झाला. काही करण्यासारखे, शिकण्यासारखे जगात काही उरले असेल ह्यावर माझा आता विश्वास नव्हता. शिवाय भारतासारख्या विक्षिप्त मागासलेल्या देशात काय होते !!!

मी ट्यूब ने घरी निघाले. मला नक्की आठवते, ह्या विविक्षित वेळेला ट्यूब ने घरी जाताना एका विविक्षित ठिकाणी दर वेळी ट्यूब क्षणभर पूर्ण थांबायची. का ते कधी कोणाला समजले नाही. अगदी ट्यूब च्या चालकाला सुद्धा ते कधी उमगले नाही. ना station ना signal, पण तरीही ट्यूब तिथे आपोआप नेमाने थांबायची. आजही ती तशीच थांबली. एक आजीबाई सावकाश तरंगत खाली उतरल्या आणि नाहीशा झाल्या. पण जाण्यापूर्वी मला म्हणाल्या, "ल्युसी पोरी, विचार कर, हे सगळे तुझ्याच बाबतीत का घडले."

इतके वर्षांनी प्रथमच त्या आजीबाई मला 'जाणवल्या'. माझ्या संवेदना अति सूक्ष्म आणि तरल झाल्याचा हा पुरावा होता. पण म्हणजे मी एकटी नव्हते, माझ्या सारखे बरेच कोणी कोणी असावेत. त्यांच्या इच्छेनुसारच माझा त्यांच्याशी संवाद होत होता. शिवाय माझी त्यांना पूर्ण माहिती होती, मला मात्र ते अज्ञात होते.

***********

घरी एक पत्र येऊन पडले होते. जागतिक drugs विरोधी परिषद भरणार होती, न्यूयॉर्क येथे आणि मला अगत्याचे बोलावणे

होते. तळटीपेत प्राध्यापकांचा आवर्जून उल्लेख होता. मी माझ्या पद्धतीने कामाला लागले. तीस दिवसात जगातील drugs चा सर्व ठाव ठिकाण, माणसांची नावे गावे पत्ते, कारखाने, विक्रीची केंद्रे, शेते, आणि त्यावर हल्ला कसा करायचा त्याची योजना - सगळे तयार झाले. गुपचूप सर्व ठिकाणे मी स्वतः प्रत्यक्ष पाहून घेतली. मी योजना परिषदे पुढे मांडले. परिषदेत सरकारी अधिकारी सुद्धा होते. सर्वानुमते मलाच त्या mission चे सर्व अधिकार आणि जबाबदारी देण्यात आली. हे एक UNO चे Mission 'त्रिशूळ' असे ठरले. (आणि ते अपयशी होणार ह्याची सर्वांना खात्री होती.)

हे माझे माझ्या आवडी प्रमाणे जगणे नव्हते. पण मला समोर दिसत होती, अगतिक, हताश माणसे (जशी मी ही काही दिवसांपूर्वी होते.) ; drugs ची शिकार झालेली, स्वतःच्या इच्छे विरुद्ध वागणारी ; जणू जिवंत पणीच मरण यातना भोगणारी ; शारीरिक, मानसिक छळ सोसणारी, मृत्यूची भिक मागणारी. मदतीसाठी टाहो फोडणारी. आणि त्यांना दुःख विकून स्वतः चे सुख ओरबाडणारी माणसे.

माझा निर्णय झाला.

अफगाणिस्थान, पाकिस्तान, दक्षिण अमेरिका, आफ्रिका, मध्य भारत. मोहिमेची धडाक्याने सुरुवात झाली. शेते पेटवण्यात

आली. कारखाने उध्वस्त करण्यात आले. विक्रीची केंद्रे नष्ट करण्यात आली. मी जातीने हजर राहून, विरोध अक्षरशः मोडून काढला. शेकडो टन drugs आणि कच्चा माल जाळून टाकण्यात आला. सहा महिने ही मोहीम मी चालवली. यशस्वी केली. पण मोहिमेचा उत्तरार्ध जास्त कठीण होता.

drugs च्या व्यसनाधीन माणसाना व्यसन मुक्त करणे. मायेने, युक्तीने, निर्धाराने आणि ज्ञानाच्या मदतीने ह्या माणसांना नवी दिशा देण्यासाठी, त्या मार्गावर विश्वासाने हात धरून चालवण्यासाठी, नव्या वेगळया माणसांची जरूर होती. प्रेमाची जरूर होती. माझ्या आवाक्या बाहेरचे काम होते हे.

तिथे माझी ओळख झाली एका भारतीय माणसाची. गोड, सदा हसतमुख, न थकता, न कंटाळता तास अन तास, दिवस अन दिवस काम करणारा. डॉक्टर आशिष.

माझ्या सारख्या अति मानवी शक्ती नसूनही तो ते पाचही खंडात पसरलेले, अवघड काम आनंदाने करत होता. व्यसनाधीन लोकांचे अगणित camps, जगात असंख्य ठिकाणी पसरलेले, तो सांभाळत होता. त्याच्या विश्वास आणि प्रेमासाठी, त्याच्या सारखीच असलेली त्यागी माणसे त्याच्या भोवती जमा झाली. आणि ते सगळे एक दिलाने, प्रेमाने हे काम करत होती.

प्रेमाने. जे माझ्याजवळ नाही. ह्याची मला जाणीव झाली, खंत वाटली.

करपलेले मन, कडू तोंड, भयाण वास्तव आणि भूतकाळ, घेऊन मी वावरत होते.

मोहीम यशस्वी केल्यावर माझा मोठा सत्कार करण्यात आला. मला पाहण्यासाठी, माझ्याशी हात मिळवण्यासाठी इतकी गर्दी झाली. त्यांच्या अश्रुनी माझे हात ओले चिंब झाले. मी मात्र वाट पहिली माझ्या स्वतःच्या अश्रूच्या दोन थेंबांची.

***********

डॉक्टर आशिष नी एकदा बोलता बोलता मला त्यांच्या धाकट्या बहिणीविषयी सांगितले. तिला तरुणपणी केरळ मधील त्यांच्या गावातून पळवण्यात आले होते. त्याने आशेने विचारले, मी काही मदत करू शकते का. एका भल्या माणसासाठी एव्हढे तर मी नक्की करू शकते ना.

मी डॉक्टर आशिष कडून तिचा, आनंदीचा, फोटो मागून घेतला. ती एक भोळी तरुण शिक्षिका होती. तिच्या गावातील शाळेत तिला काही सुधारणा करायच्या होत्या. त्या साठी ती जिल्हा निहाय शिक्षण खात्यात हेलपाटे घालत होती. कोणी दाद देत नव्हते. म्हणून ती वरच्या अधिकाऱ्याला भेटायला गेली. त्याने

तिला पैसे घेऊन यायला सांगितले. (तेंव्हा भारतात - केरळ मध्ये काळया इंग्रजांचे राज्य होते. आणि अशा गोष्टी सर्रास घडत, डॉक्टर आशिष ने सांगितले.) तिने तिचे लग्नासाठी साठवलेले थोडेसे पैसे देऊ केले. तेंव्हा तिलाच अटक करण्यात आली, लाच दिली म्हणून. तुरुंगात शिक्षण मंत्र्यांनी तिच्यावर अत्याचार केले. तुरुंगातून सुटका होण्यासाठी तिच्या कडे आणखी पैसे मागितले गेले. तिने जवळचे दागिने विकून पैसे दिले. तेंव्हा तुरुंग मंत्र्यांनी तिच्यावर अत्याचार केले. आणि नंतर शेवटी पोलिसांनी तिला दूर जंगलात सोडून दिले. ती घरी आली तेंव्हा कोलमडून गेली होती. सगळे घर म्हणजे स्मशान झाले. आठ दिवसांनी पोलीस परत आले. तिचा जबाब घ्यायचा म्हणून जिल्ह्याच्या पोलीस स्टेशनात बोलावले. त्या नंतर ती परत आली नाही. कोणाला दिसली नाही.

मी त्या काळात पाठीमागे गेले. आणि तिचा उलट मागोवा घेत आजच्या काळापर्यंत आले. पोलीस स्टेशनात परत तिच्यावर अत्याचार करण्यात आले. नंतर तिला एका दलालाला विकण्यात आले. तिला ट्रक मधून शहरातील एका वेश्या वस्तीत नेण्यात आले. ती घटना मी पहिली. दर २-३ वर्षांनी तिला विकण्यात आले. आता ती लंडन येथे एका श्रीमंत अरब माणसाच्या जनान खान्यात कैद होती.

प्रथम त्या अरब माणसाला गाठले. तो तेलाच्या विक्रीच्या करार करण्या साठी रियाध इथे होता. त्याचे सुरक्षा कर्मचारी, हॉटेलचे सुरक्षा कर्मचारी, मी कोण ते माहित नसल्याने थोडा वेळ विरोध करत राहिले. माझा नाईलाज झाला. त्यांना ठार करावे लागले. त्या अरब माणसाला त्याचा गुन्हा सांगितला. त्याच्या मनात डोकावल्यावर लगेच लक्षात आले, हा माजलेला, निर्ढावलेला नीच आहे. त्याच्या सर्व संपत्तीची यादी केली. त्या त्या देशातील सरकारच्या खजिन्यात ती जमा करण्याचे आदेश त्याच्या कडूनच दिले. तेल विहिरीला आग लावली. आणि त्याला निर्धन कफल्लक अवस्थेत लंडनच्या रस्त्यावर सोडून दिले. सर्व बंदिस्त स्त्रियांना मुक्त केले. आनंदीला डॉक्टर आशिष कडे पोहोचते केले. मोहीम निम्मी पूर्ण झाली.

आता उरलेली मोहीम सुरु झाली. प्रथम त्या अरब माणसाला गोळी घातली. मग माझ्या पद्धतीने मी भारतीय मंत्र्यांची आणि नंतरच्या सर्व माणसांची नावे व पत्ते शोधून काढले. वेश्यागृहातील दादा, मालक, गुंड, ज्यांनी ज्यांनी आनंदीला छळले त्यांची यादी केली. प्रत्येक गुन्हेगाराला एक शिक्षा मात्र सारखी ठरवली. ती म्हणजे त्या प्रत्येकाची सर्व संपत्ती, मालमत्ता, पैसा-अडका, जमीन-जुमला, दाग-दागिने, सर्व काही सरकार जमा केले. FOLLOW THE MONEY TRAIL. आणि नंतर मंत्री आणि पोलीस ह्यांना

ठार मारले. बाकीच्यांना एक हात, एक पाय तोडून सोडून दिले. मी निर्दयी होते का? माहित नाही, पण माझी दया बुद्धी, ही जणू शल्य विशारदाच्या हातातील सुरी होती.

कोठून तरी ह्या मोहिमेची वर्तमान पत्रांना माहिती मिळाली.

बहुतेक वर्तमानपत्रे आणि दूर दर्शन वाहिन्यांनी सावधपणे टीका केली. बहुतेक सर्व विकली गेलेली आणि भ्रष्ट होती. नितीमत्ता सोडून आळशीपणे स्वार्थ साधण्यात मग्न होती. बरेच दिवस टीका ऐकून घेतली. आणि मग एका मान्यवर पत्रकाराला बोलावले. तो इतका घाबरला होता, माझ्यासमोर बसताच विजार ओली पिवळी करून, पुन्हा पुन्हा क्षमा मागत पळाला. माझा प्रतिशोध पूर्ण झाला.

आनंदी ला सावरायला खुप वेळ लागणार होता. तिच्यासारख्या इतर स्त्रियांना सुद्धा वेळ पाहिजे होता. मला जीवनातले एक सत्य उमजले. कोणाचे दुःख दूर करता येते. पण कोणाच्या चेहेऱ्यावर हसू आणि आनंद आणणे फार अवघड आहे. कारण ती फक्त दैवी देणगी आहे. माणसाचे प्रयत्न तोकडे पडतात अशा वेळी.

डॉक्टर आशिष माझा जिवलग मित्र झाला. डॉक्टर आशिष शतशः कृतज्ञ होता. त्याने इतक्या वेळेला आभार मानले. मला

इतका आदर आणि स्नेह दिला. पण कधीच नाही म्हणाला, " I love you. "

आनंदी आणि तिच्या मैत्रिणीनी जगातील शोषित, पीडित महिलांसाठी काम करण्याचे ठरवले. प्रथम त्यांनी याझीदी स्त्रियांचा प्रश्न हातात घेतला.

*********

सिंजर मधील याझीदी स्त्रियांची बिकट परिस्थिती पाहून मला च मदतीची हाक देण्यात आली. माझ्या सर्व शक्ती आणि युक्तीनिशी मी सिंजरचा वेढा उठवला, मी राका आणि लालीश इथे जायच्या आधीच इस्लामी अतिरेक्यांना माझ्या बद्दल कळले. त्यांनी डॉक्टर आशिष आणि आनंदी ह्यांना धमकी दिली, ल्युसिला आमच्या ताब्यात द्या नाहीतर तुमचे camps उध्वस्त करू. काही camps वर अंदाधुंद गोळीबार झाला त्यात किती रुग्ण जखमी झाले, मेले. कोणताच पर्याय नव्हता. मी त्यांच्या कडे जावे आणि त्यांनी camps चा वेढा उठवावा असे ठरले.

DRUGS, HUMAN TRAFFICING AND TERROR. (तिसरी मोहीम अर्धवट सोडून द्यावी लागली.) ह्या तीनही मोहिमेत मानव जातीचा अतिशय कुरूप आणि बीभत्स चेहेरा पाहून मी निराश झाले. जगण्यासारखे पुढे काय होते? मला

तरी कोण होते, माझे असे काय होते, आणि माझ्यासारख्या निरिच्छ माणसाने कोणत्या आधारावर जगावे ???

शिवाय मृत्यू बद्दल कुतूहल होते.

WAS IT A PASSAGE TO 'NOWHERE', I MUST EXPLORE.

पुढे काय ह्या प्रश्नाचे हे उत्तर असेल का म्हणून मी गेले.

प्रोफेसर न्यूमन ह्यांना शेवटचा निरोप पाठवला, "HAPPY TO CEASE TO EXIST - लूसी."

**********

माझे शरीर गोळ्यांनी छिन्नविछिन्न झालेले मला दिसत होते. मातीत पडले होते, फरपटत ओढून नेले जात होते. मला रडावेसे वाटत होते पण रडू फुटत नव्हते. माझे मन सर्व आठवणी सह आणि सर्व शक्तींसह जागे होते. मी त्या आजींसारखे एक अशरीरी निराकार अस्तित्व झाले होते??? सगळीकडे उन्हाचे कवडसे पडावे आणि ते सतत हलत राहावेत असे वातावरण होते. किंवा एखाद्या तळ्यात सूर्याचे प्रतिबिंब पडावे, त्याची किरणे परावर्तीत झाल्याने सर्व तळे हेच एक तरंगणारे, हालणारे, प्रकाशमान सजीव अस्तित्व व्हावे, असे काहीसे असंबद्ध वातावरण होते. मानवी भाव भावना

आणि त्यांची अतिरेकी ओढाताण नसल्याने वातावरण शांत, गूढ आणि नितळ होते.

एक सुजाण, सौम्य प्रकृतीचे, शुभ्र दाढी रुळणारे, तेजःपुंज व्यक्तिमत्व मला सामोरे येऊन म्हणाले, "मैत्रेयी, तू एक बहादूर मुलगी आहेस. बेटा, निराश नको होऊ. जग सत्य-शिव-सुंदर आहे. त्याची सावली काळी आणि अंधारी आहे. भारतात जा. जे तुला अपघाताने मिळाले आहे, तेच पुन्हा प्रयत्नाने स्वतःमध्ये स्थिर कर. तुझ्या प्रश्नाची उकल तिथेच होईल. दया आणि सेवा ह्याचेच दुसरे नाव शक्ती आणि पूजा. लक्षात ठेव."

मला हलकासा चैतन्यमय स्पर्श झाला, प्रेमळ आशिर्वाद जणू. ते होते, अग्नीचे उपासक. (त्यांना कसे कळले असेल कि मला डॉक्टर आशिष एकांतात नेहमी मैत्रेयी असेच संबोधत असे.)

मग मला भेटला संजीव. म्हणाला, "तू योग्य तेच केलेस, भारतात पहिले जागतिक महायुद्ध झाले. (महाभारत). तेंव्हा काय कमी हानी झाली. (त्यांनी पटकन एका ग्रंथातून एक नोंद उचलून वाचून दाखवली.) कौरवांच्या कडचे २६,४६,२७० आणि पांडवांच्या कडचे १६,८३,९९० असे एकूण ४३,३०,२६० एव्हढे सैन्य मारले गेले. आणि कितीतरी लाख हत्ती, घोडे आणि जनावरे सुद्धा मारली गेली. फक्त १८ दिवसात. पण जुलमी अन्यायकारी

सत्ता नष्ट झाल्या, केल्या पाहिजेत. तू तर निमित्त मात्र, कर्तुं, अकर्तुम, अन्यथा कर्तुं, तो एक वासुदेव आहे. तेंव्हा वीराने मृत्यूला आणि पर्यायाने हिंसा - विध्वंसाला घाबरून जाऊ नये. योग्य तेच करावे आणि परिणामांची चिंता करू नये. स्त्रीचा सन्मान सर्वतोपरी आहे." आणि संजीव - महाभारतच तो एकमेव साक्षीदार, मला आशीर्वाद देऊन निघून गेला.

मग एक वयस्कर कारकून वजा अधिकारी लगबगीने आला, म्हणाला, मैत्रेयी तयार हो तुला जायचे आहे. आणि माझ्या कपाळावर त्याच्या डौलदार मोर पिसाने काही लिहून निघून गेला. मी किचित शुद्ध हरपून डोळे मिटले.

जाग आली तो मी आईच्या गर्भात होते.

माझी गुणसूत्रे लिहून झाली होती. मला जैविक बाप नव्हता. मी एक स्त्री असणार होते. ती स्त्री अ-भोगी असणार होती. ती कधीच आई होऊ शकणार नव्हती. तिला पैसा, सत्ता, रूप, - ह्यातील काहीच मिळणार नव्हते. ती तिच्या आईसारखीच साधारण स्त्री असणार होती. तरीही ती वेगळी होती, कारण ती एक विद्यार्थी होणार आणि आयुष्य भर फक्त शिकणार होती.

माझी आई एक दुःखी, कष्टी स्त्री होती. तिचे नाव होते जानकी - जन्म दुःखीनी. मी तिचे पहिले मुल होते. पण त्याचा तिला तेव्हढा

आनंद नव्हता. कारण पैशाची चण चण, नोकरीत साहेबाचा त्रास, नवऱ्याने टाकलेली म्हणून समाजाचा तिरस्कार. ती वरचेवर निराशेच्या आजारा मुळे खोलीत सुस्त पडून राहायची. माझी फार आबाळ व्हायची. उपासमार सुद्धा.

मी माझ्या मेंदूची वाढ न होताना 'बघत' होते. त्याला पुरेसा अन्न पुरवठा आईकडून होत नव्हता. असेच चालत राहिले तर मी अपंग किंवा मतीमंद जन्मले असते. केव्हढा विरोधाभास.

माझा / आईचा पहिला महिना होता. मी आईशी बोलायचे ठरवले. पण त्यासाठी ती जागी तर असायला हवी होती. ग्लानी मुळे ती सतत झोपी जायची. मग मी एक सूचना, स्वप्न - भास म्हणून तिच्या मनात खोलवर पाठवली जी तिला जाग येताच आठवेल आणि पुन्हा पुन्हा आठवेल. "डॉक्टर आशिष, मैत्रेयीला तुमची जरूर आहे. लवकर या." आणि आशिषचा भ्रमण ध्वनी - त्रिशूळ - ० १०८ ३२९ १०८.

त्या स्वप्नाचा तिला अर्थ कळला नाही. पण सततच्या स्मरणिकेच्या त्रासाला ती कंटाळली आणि शेवटी तिने तो निरोप पाठवला. लगेच दुसऱ्या दिवशी ३ डॉक्टरांची एक टीम तिच्या घरी पोहोचली. पहिला प्रश्न त्यांनी विचारला, तुम्ही मैत्रेयीला कसे ओळखता. आणखी खूप प्रश्न त्यांनी तिला विचारले. तिला काही

उत्तर देता आले नाही. पण त्यांनी तिला तपासले, औषधे दिली. आणि जाताना एक २५,००० $ चेक खर्चासाठी देऊन गेले. पैशाची सोय झाली. त्यामुळे ती स्वतंत्र झाली. त्याने जानकीचे तर आयुष्यच बदलून गेले. आता ती जीवनात रस घेऊन आत्मविश्वासाने जगू लागली. तिने मुलगी झाली तर आपल्या मुलीचे नाव मैत्रेयी ठेवायचे असे ठरवूनच टाकले.

**********

मैत्रेयी चा जन्म व्यवस्थित झाला. ती अव्यंग आणि निरोगी जन्मली. तिच्या बारशाला फारसे कोणी नव्हते. पण एक साधू अचानक हरिद्वारहून आले आणि तिला आशीर्वाद देऊन गेले. त्यांनी तिच्या मस्तकावर हात ठेवला, तिच्या जिभेला स्पर्श केला, कानात मंत्र सांगितला आणि आईला श्रीफळ दिले. ते साधू मग आईला म्हणाले, तुमची मुलगी खूप मोठी योगिनी होईल, तिच्या आठव्या वाढ दिवशी मी परत येईन, तिला न्यायला. अशी ती वाढली आईच्या मायेत आणि त्या साधूच्या छायेत. 'मार्तंड जे तापहीन'. तेज हीच त्यांची ओळख तिच्या मनात भरून राहिली होती.

मैत्रेयीची कृश अंगकाठी, तांबूस तजेलदार अंगकांती. गोल, गोरापान चेहरा, दाट कुरळे विपुल केस, सरळ नाक, छोटी जिवणी.

पण उदासीन शून्य मनस्क डोळे, आणि दृष्टीत कसली तरी हुरहूर. जणू आनंदाच्या इंद्र धनुष्याची वाट शोधते आहे. जणू विश्वाच्या पसाऱ्यात स्वतःला हरवलेली अनामिका. हिवाळ्यातल्या निरभ्र आकाशाप्रमाणे ती निःस्तब्ध, निश्चल, शांत, पण प्रकाशमय आणि अगम्य, भासत राही. सतत वाचन किंवा मनन करताना दिसे. तिच्या विचारांचा थांग पत्ता कधी कोणाला लागला नाही. अगदी तिने सांगितले तरी ते कोणाला फारसे कळत नसे. तिला मैत्रिणी नव्हत्या. जुजबी ओळखीशिवाय तिच्या बद्दल जास्त काही माहिती मिळत नसे. ती एकटी एकटी च असे. खाण्यापिण्याची पण फार आवड नव्हती. शाळेत तिचे गुण चार चौघींसारखे दुसऱ्या दर्जाचे असायचे. पण तिला कधीच कोठली गोष्ट अडत नसे. वर्गात जे गणित कोणालाच जमणार नाही ते ती सहजपणे सोडवून मोकळी होई, जणू तो तिचा जन्म सिद्ध हक्क होता. सगळे जण गूढ आणि असंबद्ध म्हणून तिच्याकडे दुर्लक्ष करायचे. तिच्या संपर्कात येताच एक गोष्ट पटकन जाणवायची. ती म्हणजे, सहसा तिच्या मनाविरुद्ध काही कधी घडत नसे.

एकदा ग्रंथालयात तिला जे पुस्तक पाहिजे होते तेच तिची मैत्रीण घेऊन गेली होती. तिने मैत्रिणीला ते मागितले पण तिने नकार दिला. पण नंतर दिवसभर ती मैत्रीण इतकी अस्वथ झाली, तिची चिडचिड झाली. तिला शिक्षक खूप ओरडले, गृहपाठ केला नाही

म्हणून शिक्षा केली. खेळताना ती धडपडली आणि खरचटले. मधल्या सुट्टीत डबा खायला उघडला तर डब्यात तिची नावडती कारल्याची कडू भाजी. आणि राहून राहून तिला मनात विचार येई कि मी मैत्रेयीला पुस्तक दिले नाही म्हणूनच असे सगळे होते आहे, जाऊ द्या मी नंतर वाचीन, तिला आज पुस्तक देऊन टाकू आणि लवकर परत करायला सांगू. अशी तिच्या मनातली रस्सी-खेच दिवस भर चालली आणि शेवटी घरी जायच्या आधी तिने ते पुस्तक स्वतःहून मैत्रेयीला दिले. तिच्या मनावरचे मोठे ओझे उतरले. शाळा सुटून बाहेर येते तो तिचे बाबा तिला घ्यायला आले होते. त्याने ती इतकी आनंदून गेली कि ती ते पुस्तक आणि मैत्रेयी आणि सगळे मनातील खळबळ विसरली.

मैत्रेयी घरी आली आणि नेहमी प्रमाणे पुस्तक उघडून वाचायला बसली.

पण तो दिवस साधा नव्हता. तिचा आठवा वाढ दिवस होता. आणि त्या दिवशी गुरु पौर्णिमा होती. आईने प्रसादाचा गोड शिरा केला होता. नैवेद्य दाखवला आणि बाहेर अलख निरंजन ची हाक आली. तेच ते साधू उभे होते. "माई भिक्षा वाढ." आई भिक्षा आणायला आत गेली. तेंव्हा ते साधू मैत्रेयीला म्हणले, "मैत्रेयी, हलक्या पावलांनी आणि निरिच्छ मनाने वावरावे. आपल्यामुळे

स्थळ-काळ-घटना ह्यांना बाक येत कामा नये. लक्षात असू दे. आणि आपल्याला हरिद्वार ला जायचे आहे."

आईने विरोध केला. पण त्या साधुनी हरिद्वारच्या आश्रमाचा पत्ता दिला. रोज रात्री फोन करेन ह्या अटीवर तिने जायला परवानगी दिली. आणि मैत्रेयीच्या नवीन आयुष्याची सुरुवात झाली.

************

हरिद्वारचा प्रवास छान मजेत झाला. मैत्रेयी जणू वाऱ्यावर स्वार झाली होती. समोरचे प्रवासी, येणारे जाणारे विक्रेते, सगळ्यांशी चालता बोलताना न्याहाळताना तिचा वेळ कसा उडून गेला. त्यांचे थट्टा विनोद, त्यांचे प्रश्न, प्रश्नाची उकल करण्या साठीचे प्रयत्न, त्यांची सुख - दुःख, समाधान, त्यांचे पूर्व ग्रह, समज गैरसमज, विचार आणि अविचार, त्यांची जीवनाबद्दलची ओढ आणि धडपड. त्यांचा जीवन प्रवाह मागच्या जन्मातून ह्या जन्मात अखंड वाहताना पाहून तिला त्यांचा हेवा वाटला. ते प्रवाहाबरोबर होते, ती किनाऱ्यावर उभी होती.

प्रवासात भेटलेला तो व्यंग चित्रकार तिला आठवला. त्याने बसल्या बसल्या बौलिवूड च्या तीन अभिनेत्यांची व्यंग चित्रे काढली. तिने पटकन उत्स्फुर्तपणे त्याला नावे सुचवली.

"चौकोलेटच्या वेष्टनात कपडे धुवायचा साबण."

"साबणाच्या वेष्टनात कडू, महागडे चौकोलेट."

"झाकण हरवलेली, संपत आलेली टुथ पेस्ट."

आणि ते दोघे इतके खळखळून, मन मुरादपणे हसले. त्या आठवणीने सुद्धा तिला हसू आले. मग त्याने तिचे सुद्धा एक व्यंग चित्र काढले - सुंदर वेणी घातलेला Tom Boy.

***********

आश्रमातील जीवन तसे खडतर आणि श्रमाचे होते. तिची दैनंदिनी अवघड होती.

रोज चार वाजता उठायचे. उठल्यावर प्रथम देवघरात वंदन, नंतर दोन तास जप - ध्यान. मग योगासने आणि हलका व्यायाम. नंतर आंघोळ आणि नाश्ता. आठ ते बारा पर्यंत संस्कृत शिकायचे, व्याकरण, साहित्य आणि संस्कृत ऐकण्याचा - बोलण्याचा सराव. त्यात पाणिनीची अष्टाध्यायी पासून ते योग वासिष्ठ, वेद, उपनिषद आणि पुराणे, रामायण, महाभारत सारखे इतिहास ग्रंथ. कालिदास आणि आद्य शंकराचार्यांची टीका, सौंदर्य लहरी ते वैराग्य शतक.

मग भोजन. दोन ते पाच जुन्या संस्कृत विज्ञान आणि गणित, ग्रंथांचा अभ्यास. त्यात खगोल शास्त्र ते ज्योतिष शास्त्र, आयुर्वेद ते रत्नांची पारख, धातू शास्त्र ते विमान संरचना, अध्यात्म ते कर्मकांड, तत्वज्ञान आणि न्याय मीमांसा, मंदिराचे वास्तुशास्त्र ते रसायन शास्त्र

- किती किती विषय आढळत आणि त्याच विषयावरील आधुनिक पाश्चात्य विज्ञानाची मांडणी आणि तौलनिक अभ्यास.

पाच नंतर बोटीतून गंगा नदीत फिरायला जायचे, कधी कधी बाजारहाट, दूरदर्शनवर बातम्या आणि चालू घडामोडी, हा वेळ तिचा वैयक्तिक होता. बऱ्याच वेळा ती गंगेच्या काठी बसून निसर्गात हरवून जाई. नाहीतर तिथल्या लोकांचे, घाटावर येणारे जाणारे, स्थानिक रहिवासी, कामगार, पुरुष स्त्रिया मुले, ह्यांना बघण्यात ह्यांच्याशी बोलण्यात वेळ घालवत असे. कधी कधी ती त्यांची चित्रे काढत बसे. जीवनाबद्दलचे तिचे कुतूहल कधीच संपत नसे. लोक तिला लहान अनाथ मुलगी समजून तिची काळजी घेत, तिच्यावर माया करत आणि तिला सांभाळायचा प्रयत्न करत, त्याने तिला मोठी मजा वाटे. त्यांची आपुलकी आणि अहेतुक प्रेम हे तिच्या साठी एक कोडे होते. संपूर्ण भारतीय जीवन शैली म्हणजेच एक कोडे होते. आणि सणासुदीला तर त्यांचा उत्सव आणि उत्साह म्हणजे जीवनावरचे इतके सहज सोपे आणि सुंदर भाष्य होते.

गंगा आरतीनंतर जेवण. मग रात्री आठ ते दहा, आचार्यांबरोबर रोजच्या अभ्यासावर चर्चा, प्रश्न उत्तरे, टीका आणि संवाद.

त्या नंतर पुन्हा जप ध्यान.

११ वाजता झोप.

*********

दर दोन तीन महिन्यांनी कधी आई हरिद्वारला येऊन १० - १५ दिवस आश्रमात मैत्रेयी बरोबर राहत असे. कधी मैत्रेयी आईकडे जाऊन ५ - ७ दिवस राहून येत असे. माय लेकीचे छान जमत असे आणि दोघी एकमेकीकडे जायला आतुर असत. मैत्रेयी ला आईकडून डोक्याला तेल लावून वेणी घालून घ्यायला फार आवडे. तो वेळ फक्त त्या दोघींचा च असे.

************

आश्रमात नवीन जीवनाची सुरुवात करताना त्या साधुनी मैत्रेयीला बोलावले, जवळ बसवले, तिच्या डोक्यावर आशीर्वादाचा हात ठेवून सांगितले,

"मुली, मला माहित आहे, तू मागच्या जीवनात खूप सोसले, अनुभवले, तुला ते सगळे आठवते आहे हेही मला माहित आहे. अपघाताने तुला काही सिद्धी प्राप्त झाल्या आणि त्यांचा तू स्वतःसाठी आणि दुसऱ्यांसाठी बरा - वाईट उपयोग केलास. आधीच भरकतणारा पतंग परत वादळात सापडावा तशी गत झाली. आता आयुष्याची नव्याने सुरुवात कर.

सिद्धी किंवा शक्ती म्हणजे नदीच्या पात्रातल्या दगड गोट्याप्रमाणे आहेत. प्रवाहात त्यांचा अडथळा च जास्त.

त्यांच्याकडे दुर्लक्ष करून पुढे निघावे. शरीर आणि विशेषतः मेंदू वर नियंत्रण करून जगणे म्हणजे तर्क, बुद्धीचा पांगुळगाडा घेऊन फिरण्यासारखे आहे. चौखूर उधळणारे मन मेंदूच्या करवी आणखी गोंधळ घालते. मन - ज्याची शरीरावर सत्ता चालते, त्या मनावर स्वार होऊन जगणे, म्हणजे गरूडाप्रमाणे आकाशात स्वेच्छेने संचार करणे. प्रतिभा शक्तीने अनंतात विहार करणे. त्या मनाच्या पलीकडे जाऊन ' जे नाही आणि आहे ' त्याचा अनुभव घेणे हे मानवी जीवनाचे अंतिम ध्येय आहे.

नियंत्रण नव्हे, निर्मितीमध्ये आनंद आहे.

नावाड्याचे नावेवर पूर्ण नियंत्रण तेंव्हाच होईल जेंव्हा त्याचे समुद्रावर पूर्ण नियंत्रण असेल, नाहीतर त्याची नाव समुद्राच्या लहरीवर लाटा नेतील तिकडे जाईल. म्हणून मनावर आधी नियंत्रण कर आणि मग त्याच्या पलीकडे जा.

शून्य ज्यात अनंत असा काळ सुद्धा विलीन होतो त्याचा अनुभव घे, DO NOT TRY TO BE EVERYWHERE, BE NOWHERE. मन प्रथम निर्विकार, मग निर्विचार, करण्याचा प्रयत्न कर. आणि शेवटी निरंतर निराकारात विसर्जित करण्याचा प्रयत्न कर. "

***********

लुसिला हे अगदी नवीन होते. भारतीय अध्यात्म आणि योग, संस्कृत साहित्य आणि विज्ञान आणि दैनंदिन जीवनाशी त्यांची घातलेली सांगड. हे केवळ अद्भुत होते. ह्यालाच माया म्हणत असतील तर ती इतकी मोहक आणि सुंदर होती कि कोणीच तिला सोडून जायचा विचार सुद्धा करणार नाही. पण हेच भारतीयांचे वैशिष्ट होते. ते मायेच्या च मदतीने मायेच्या पलीकडे गेले. आणि मायेच्या पेक्षा शतशः पटीने नित्य नूतन, उन्मेष शाली, सुन्दर, महा प्रतापी अशा शिवाशी एकरूप झाले. अनादी, अनंत, अविनाशी, ज्ञान रूप, शक्ती रूप, आनंद रूप झाले. 'पुढे काय' ह्या प्रश्नाचे उत्तर 'नेती, नेती' असे देऊन जीवन मुक्त झाले.

ल्युसिला हिंदू जीवन शैलीत जीवनाचा राज मार्ग सापडला.

**********

हरिद्वारच्या बाहेर जगात खूप उलथापालथ झाली होती. जग चवथ्या महायुद्धाच्या उंबरठ्याशी पोहोचले होते. ह्या वेळी विनाशाचे दूत झाले होते चीन. माहितीचे तंत्र ज्ञान आणि एकतर्फी व्यापार, ह्यांचा अनिर्बंध आणि अनैतिक उपयोग करून, चीन ची एकाधिकारशाही जगावर लादण्याचा डाव उघड झाला. तसे बाकीची सरकारे हादरली, घाबरली आणि सगळीकडे एकच गोंधळ माजला. It was a global war fought in the

accounts books between the debtors and a single creditor. Debtors had gone bankrupt and the Creditor had just declared his intention to take over and move in.

***********

मैत्रेयीचा अभ्यास संपत आला. तिच्या आश्रमातील जीवनला दोन तप झाली. भारतीय समाज - जो तिने फक्त वाचला होता, त्याप्रमाणे अतिशय प्रगत, उन्नत आणि मनस्वी होता, जो BIG BANG च्या पलीकडे जाऊन परत आला आणि ज्याने तिथे जायचा राजमार्ग (राजयोग) बनवला - त्या समाजाला प्रत्यक्ष भेटण्याची वेळ आली. मैत्रेयीच्या गुरुनी तिला सन्यास दीक्षा दिली आणि सन्यास धर्माप्रमाणे तिने आता संपूर्ण भारत भ्रमण करावे अशी इच्छा प्रदर्शित केली. त्यांची इच्छा आज्ञा समजून मैत्रेयीने प्रवासाला सुरुवात केली - प्रथम काश्मीर मध्ये जाऊन शारदा लिपी शिकावी, मग गंगोत्री, यमनोत्री, केदारनाथ, बदरीनाथ आणि पुढे तिबेट पर्यंत जाऊन मागे फिरावे असे ठरवले. तिबेट मध्ये जे जुने पुराणे प्राचीन ग्रंथ आहेत ते वाचावे, त्या पोथ्यांमधून बुद्धाला समजून घ्यावे असाही तिचा मानस होता.

आता तिला संचय कोणत्याही स्वरुपात वर्ज्य होता. पैशाला स्पर्शही करता येणार नव्हता. कोठल्याही मोहात न अडकता तीन दिवसापेक्षा जास्त कोठेही राहता येणार नव्हते. भिक्षा मागून म्हणजे समाजाच्या दयेवर अवलंबून जगायचे होते, ईश्वराच्या इच्छेच्या आधीन - शरणागत होऊन जगायचे होते. 'माम एकम शरणं व्रज.'

*************

मी जेंव्हा आश्रमाच्या बाहेर पडले तेंव्हा माझ्या मनात तीन गोष्टी प्रकर्षाने समोर आल्या. १. जर रामायण, महाभारत हा इतिहास आहे तर त्याच्या खाणा खुणा भारतात सर्वत्र विखुरल्या असतील आणि मला भारत भ्रमणात जसे जमेल तसे त्या शोधल्या पाहिजेत. जर तो इतिहास आहे तर भारतीय संस्कृती सर्वात प्राचीन, आजच्या विज्ञानापेक्षा प्रगत आणि सुसंस्कृत आहे. तर मग आजही अध्यात्म आणि मोक्ष हीच मानवी जीवनाची अंतिम ध्येय असली पाहिजेत. पाश्चात्य सभ्यता आणि पाश्चात्य जीवनशैली हि भारताकडून घेतलेली उसनवारी आहे किंवा भारतीय मुल्यांची अपूर्ण आणि मूर्ख नक्कल आहे.

२. मी जे शिकले, त्यापैकी किती आत्मसात केले, त्याची धकाधकीच्या रोजच्या जीवनात क्षणोक्षणी परीक्षा होऊन गुण / अवगुण कळतील. एखादी गणिका सुद्धा "अवगुण चित ना धरो."

म्हणून मला नापास सुद्धा करू शकेल. It is a practical exam after theory paper.

3. हा जो भारतीय समाज आहे तो म्हणजे सहस्त्र धारांनी कोसळणारा, उसळणारा आणि परत एकत्र येऊन वाहणारा चैतन्याचा प्रवाह आहे. सुख आणि दुःख ह्याच्या अगणित छटांनी भरलेला कलीडोसकॉप आहे. Big Bang च्या पलीकडून (मृत्यूला) वाकुल्या दाखवणारे अवलिया फक्त इथेच राहतात. मला ते सारे अनुभवले पाहिजे, जवळून बघितले पाहिजे, मला त्यांच्यापैकी एक होऊन त्यांच्या रंगात रंगले पाहिजे. एक मानव म्हणून मला त्यांच्या ऋणाची अंशतः तरी परतफेड केली पाहिजे.

मी अज्ञातात पाउल तर टाकले. मागे वळून बघताना ते कोरियन अतिरेकी, भ्रष्ट आणि दुष्ट, अत्याचारी काळे इंग्रज, त्या दुःखी याझिडी स्त्रिया. ते दुर्दैवी व्यसनाधीन जीव. आता सारे एका खूप मोठ्या कोलाहलाचे क्षीण पडसाद वाटतात.

ल्युसी मार्गस्थ आहे, पण अजून बुध्द नाही.

***********

हरिद्वार हून निघाल्यानंतर पहिल्या काही दिवसात एक विलक्षण अनुभव आला आणि माझे मनोधारणा पूर्ण बदलली. मी आगगाडीतून जात होते. माझे सह प्रवासी मारवाडी व्यापारी होते.

मला - एका भगव्याधारी स्त्रीला पाहून त्यांना खूप संताप आला. असे भोंदू साधू संन्यासी म्हणजे समाजातील बांडगुळ आहेत. ह्यांना कष्ट करून कमावून खायचे नाही. तर लोकांना फसवून आयते खायचे - प्यायचे आणि भांग ओढून मजा मारायची असते. संपूर्ण प्रवासात ते स्वतः सतत खात पीत होते आणि मला दुषणे देत होते. मी दोन दिवस अन्नाचा एक कण न मिळाल्याने अशक्त आणि ग्लानीत निपचित पडून ऐकत होते. माझे station आले, मी उतरले. एका झाडाखाली सावलीला टेकून बसले. ते सुद्धा उतरले. सामान उतरवून हमालाशी हुज्जत घालत होते. तेव्हढ्यात एक स्थानिक मारवाडी धावत पळत घाबराघुबरा होऊन कोणाला तरी शोधत होता. प्रवाश्यांच्या तोंडाकडे बघून चौकशी करत पुढे जात होता. दुरून मला बघताच धावत येऊन माझे पाय पकडले. त्याने बरोबरच्या नोकराला हाक मारली. नोकराने जेवणाचे ताट समोर ठेवले. तो मारवाडी माझी काकुळतीने विनवणी करत होता कि मी ते अन्न ग्रहण करावे नाहीतर त्याला फार दुःख होईल, पाप लागेल आणि त्याचे जन्माचे नुकसान होईल. मी त्याला शांत केले, आश्वासन दिले कि मी ते खाईन पण त्याला कसे कळले कि मी उपाशी आहे. तो म्हणाला, आज पहाटे मला स्वप्नात साक्षात श्री रामजी नी सांगितले कि माझी भक्त उपाशी आहे. तिच्या साठी जेवण घेऊन जा. आणि तुमचा चेहेरा दिसला. सगळीकडे शोधले,

देवळे, धर्मशाळा, मठ, बस आणि आग गाडीचे स्थानके. किती गाड्या आल्या आणि गेल्या. सकाळी सात पासून शोधतो आहे. आता सापडलात. माई तुम्ही जेवला नाहीत तर मी देवळात कसा जाऊ आणि रामलल्ला ला कसे तोंड दाखवू.

भगवंताचे माझ्यावरचे प्रेम बघून मला रडू आले. आणि भक्तिभावाने त्याला पण अश्रू आवरता आले नाहीत.

ते दृश्य बघून माझे सह प्रवासी कुतूहलाने नंतर त्याला भेटले आणि मग पश्चातापाने त्यांनी माझी वारंवार क्षमा मागितली.

एकविसाव्या शतकातील एका विविक्षित व्यक्तीला, शंभर शतकांपूर्वी होऊन गेलेल्या एका माणसाने नेमकी मदत, तेही न सांगता, न मागता आणि तिसऱ्या माणसाकडून, करावी, ह्या पाठीमागील वैज्ञानिक सत्य कधी उलगडेल का. त्या दिवसापासून माझा संशय फिटला. कायमचा. श्रद्धा दृढ झाली. आणि भगवंतावर भार टाकून मी निश्चिंत झाले.

*************

संघर्षाची पहिली ठिणगी तिबेट मध्ये पडली. प्राचीन ब्राह्मी लिपीतील पोथ्या वाचण्याची परवानगी मला नाकारण्यात आली. चीनच्या जुलमी सरकारने मला तिबेटी महंत आणि भिख्खुना भेट नाकारली. माझ्यासारख्या संन्याशाला तिबेट सोडून जाण्यास

सांगितले. ते एक निमित्त झाले आणि मग मी चीनचा सर्वांगीण अभ्यास सुरु केला. त्यांच्या मंडारीन लिपी पासून ते त्यांच्या जागतिक नीती पर्यंत ते त्यांच्या संगणक आणि शस्त्रास्त्र ज्ञानाच्या चोरी पर्यंत.

चीनपासून जगाला असलेला धोका लक्षात घेऊन मी एक योजना बनवली. चोराच्या घरात चोरी. एक संगणक विषाणू तयार केला. त्याला गणितातील अनंतापर्यंत जाणाऱ्या श्रेणीच्या आत लपवला. त्याला मंडारीन लिपीशी जोडले. वरतून संशोधनाचा रंग दिला. एका छोट्याशा विद्यापीठात माझ्या नावाने तो सादर केला. थोड्याशा चौकशी नंतर ते संशोधन एक नक्कल आहे हे सिद्ध झाले आणि विद्यापीठाने ते नष्ट करण्यास सांगितले. जशी ती कळ दाबली तसे तो संशोधनपर निबंध चीनच्या बाकीच्या विद्यापीठात पाठवला गेला, तिथून चीनच्या व्यापारी संस्थाना पाठवला गेला. सरकारी कार्यालयात पाठवला गेला. लोकांच्या तक्रारी बरोबर तो चीनच्या अध्यक्षांच्या कार्यालयातील मुख्य संगणकात पोहोचला. चीनच्या संगणक तज्ञांनी त्याचा अभ्यास करून तीन दिवसात निष्कर्ष काढला कि हा एक भारतीय निरुपद्रवी विषाणू असून तो नष्ट करावा. परत एकदा नष्ट करण्याची कळ दाबताच मूळ विषाणूने संगणकातील सर्व माहिती आणि सर्व आज्ञावली नष्ट केल्या. सगळीकडे चीन मध्ये हाहाकार माजला. चीन अठराव्या शतकात

ढकलला गेला, चीनचा व्यापार आणि व्यापारी देवाण घेवाणीची व्यवहाराची पुस्तके कोरी झाली. सर्व भ्रमण ध्वनी बंद पडले. चीनची शस्त्रात्रे भंगार बनली. तीन दिवसात चीन गरीब गोगलगाय झाला. त्याची मक्तेदारी आणि मुजोरी संपली.

***********

हे एक छोटे अवांतर वळण सोडले तर माझी भ्रमण गाथा एक तप चालू होती. मला कधीही कशाचीही कमतरता भासली नाही. जवळ एक पै सुद्धा नसताना पूर्ण प्रवास घडला. अनेक वेळा भूक अनावर होऊन बेशुद्ध पडायची वेळ आली तेंव्हा कोठूनतरी मदत आली. जेंव्हा भगवंताशी भांडले, रुसले, रागावले तेंव्हा निरनिराळ्या रुपात येऊन त्याने समजूत काढली आणि ऊन ऊन भाताची पेज नाहीतर डाळ खिचडी दिली. कधी कोणाच्या लग्नातले लाडू पण खाल्ले आणि कधी कोणाच्या श्राद्धातल्या भाताच्या पिंडी नदीतून माझ्यासाठी वाहत मजपर्यंत आल्या. पण सर्वदूर सगळीकडे अध्यात्माचा प्रवाह आणि प्रभाव अखंड जाणवला. अध्यात्मिक अनुभव तर खूप आले. ते सगळे सांगण्यास बंदी आहे. पण मी तृप्त आहे. आनंदी आहे.

माझी आता निरोपाचे वेळ जवळ आली आहे. निरोप घेण्यापूर्वी प्रोफेसर न्यूमन ह्यांना काही गोष्टी अगत्याने कळवाव्या असे वाटले म्हणून शेवटचा निरोप पाठवला,

"Dear Professor Dr. Newman,

This is the reincarnation of Lucy, called Maitreyi, from Hindustan.

We have been discussing and debating about the Fifth Force in the Universe. After studying old Hindu texts and my mystic exchanges and experiences here, I have come to the conclusion that Mind is that Fifth Force, coordinating amongst all the Forces. It acts as a bridge between the matter and Energy and partakes the characteristics of both. Of course, you will test this hypothesis scientifically, and publish the results. I shall not be there by that time, as Maitreyi would soon cease to exist, but will contact you probably in my next reincarnation.

Thank you for being my guide and for everything that you did for me.

Yours truly,

Lucy / Maitreyi"

***********

लुसि अजूनही मार्गस्थ आहे, अपूर्ण आहे, मातृत्व शिवाय. अजूनही शुद्ध प्रेम आणि प्रेमाच्या पूर्णत्व नंतर येणारे मंगलमय मातृत्वाची तिला आस आहे.

|| असतो मा सद गमय || तमसो मा ज्योतिर्गमय || मृत्योर्मा अमृतम गमय ||

अशी प्रार्थना करून तिने गंगेत देह सोडून दिला.

***********

सुजाता पाटील. भीमा शंकर च्या पायथ्याशी असलेल्या खांडस गावात एका सामान्य गरीब घरात जन्माला आली. शालेय शिक्षण कर्जतमध्ये झाले आणि तिथेच थांबले. आजी / आई भीमा शंकरच्या डोंगरात औषधी वनस्पती गोळा करून कर्जतला विकायच्या आणि पोट भरायच्या. सुजाता हुशार चुणचुणीत मुलगी होती. तिने आई आणि आजी कडून औषधी वनस्पतींची सर्व माहिती करून घेतली. तरुण आणि मेहेनती सुजाता आई बरोबर सकाळ पासून रात्री पर्यंत जंगलात वनस्पती गोळा करायची आणि

रविवारी आठवडे बाजाराला कर्जतला जाऊन त्यांची विक्री करायची. पैसे कमावून आईला चांगली मदत करू लागली. तिची कर्जतच्या वैद्य बुवांशी ओळख झाली. छोटीशी सुजाता मोठ्या धिटाईने वैद्य बुवांकडून त्या वनस्पतींची, त्यांच्या गुणधर्मांची आणि त्यांच्या मुळे बऱ्या होणाऱ्या निरनिराळया आजारांची माहिती करून घेत असे.

सुजाता अगदी लहान म्हणजे २ / ३ वर्षांची असल्यापासून चुलीवर भाताचे भांडे ठेवायची आणि गरम गरम उतरवायची, भाकरी हातावर थापायची आणि चुलीवर भाजायची. शाळा सुटली, तोपर्यंत ती दहा जणांचा स्वयंपाक करायला शिकली. आणि चांगली सुगरण बनली.

सुजाता चा गळा गोड होता, आवाज धारदार पण खणखणीत होता. ती चांगली गायची, भजने, काकड आरती. गावात कोणी भजनी मंडळी आली तर त्यांच्या कडून नवनवीन भजने आणि चाली कानावर पडायच्या आणि त्या ती लगेच शिकून घेई. तिला गायला मनापासून आवडे आणि त्यात ती भान हरपून गाई. जंगलात उघड्या आकाशाखाली गाता गाता कधी शब्द मागे पडावे, सूरही हरवून जावे, पण त्या सुरावटी च्या इंद्र धनुशावरून मनाने

आकाशाला स्पर्श करावा, आणि मग अंतरीचे आकाश व बाहेरचे आकाश एकरूप व्हावे.

जंगलात औषधी गोळा करताना तिला संपूर्ण वातावरणाचे व्यवधान ठेवावे लागे. हात आणि पाय चालवताना, किडा मुंगी, सरपटणारे, उडणारे, उड्या मारणारे, दाबा धरून हल्ला करणारे, किवा समोरून चाल करणारे. सगळ्यांच्या हालचालींची नोंद घेतानाच आपले काम करायचे हि सवय झाली. जणू ३६० अंशातून फिरत राहणारा संवेदनाशील camera. त्यातून सुजाता अष्टावधानी आणि सावध झाली.

**********

अशी दहा वर्षे झाली. सुजाता आता वैद्य बुवांच्या आयुर्वेदिक औषधी तयार करण्याच्या कामात पूर्ण वेळ - अगदी २४ X ७ - गुंतली. ती आता वैद्य बुवांचा उजवा हात झाली. औषधी साठी लागणारा कच्चा माल जंगलातून गोळा करायचा, त्याची वर्गवारी करायची, त्यावर पुढील प्रक्रिया - उन्हात वाळवणे, बारीक दळणे, त्यांची नीट साठवण करणे, चूर्ण बनवणे, ठरवलेल्या प्रमाणात ते निरनिराळे पदार्थ एकमेकात मिसळणे, काढे तयार करणे, किती किती प्रकारची कामे ; आणि शेवटी वैद्य बुवा सांगतील तसे पुड्या बांधून रोग्यांना देणे. आजाराचे निदान झाले कि कोणती औषधे

कशी द्यायची हे तिला पाठ झाले होते. एव्हढेच काय वैद्य बुवा नी तिला नाडीपरीक्षा सुद्धा शिकवली होती. ते नसतील तेंव्हा ती रोग्याची तपासणी करून, त्याची नाडी परीक्षा करून रोगाचे निदान सुद्धा करत असे. तेंव्हा तिला वैद्य बुवांचा मुलगा - अनंत, जो फक्त २ - ३ वर्षांनीच तिच्या पेक्षा मोठा होता, पण डॉक्टर आणि वैद्य अशा दोनही परीक्षा उत्तीर्ण झाला होता, तो तिला सूचना देत असे. अगदी पहिल्या दिवसापासून दोघांचे चांगले जमत असे. त्यांच्या अबोल प्रेमाला वैद्य बुवांची संमती होती. आणि वेळ येताच त्यांनी पुढाकार घेऊन त्यांचे लग्न लावून दिले. सुजाताचा संसार सुरु झाला. ती अन्नपूर्णा होतीच, आता लक्ष्मी झाली.

प्रेमाची तृप्ती दिसू लागली, तिची संसार वेल फुलली, वाढली आणि तिला यथावकाश एक मुलगा आणि एक मुलगी झाली. त्यांच्या बरोबर आणि अनंत च्या सहवासात १०-१२ वर्षे कशी निघून गेली तिला कळले नाही.

*********

गुरु पौर्णिमा दिवस होता. अजून पूर्ण उजाडले नव्हते. सुजाता ला का कोणास ठाऊक, हा दिवस न चुकता लक्षात राहत असे, अगदी लहानपणापासून. तिला त्याचे कारण कधी कळले नाही. पण ह्या दिवशी भल्या पहाटे लवकर उठून ती आपोआप

महादेवाच्या मंदिरात जाई, अभिषेक करून पिंडी समोर बसून महादेवाचे ध्यान करत असे. भीमा शंकराच्या देवळात एक चिमुरडी मुलगी तीन तास सहजच ध्यान करते, हे एक इतरांना आणि तिचे तिला सुद्धा आश्चर्य च होते.

तिचा हा नेम २५ वर्षात कधी चुकला नाही. आजही सकाळी गावातील शंकराच्या देवळात गेली. प्रदक्षिणा अर्धी होतानाच तिचे मन आत ओढले जाऊन बाह्य जग डोळया समोरून अदृश्य होऊ लागले. कसातरी अभिषेक करून ती ध्यानाला बसली. बाह्य जगाचा विसर पडला, स्वतःच्या शरीराची जाणीव नेणीवेत बुडाली, महादेवाच्या विराट अस्तित्वात मन वाहून गेले, ते कधी उमा -महेश रुपात दिसत. कधी अर्ध नारी नटेश्वर सुंदर नृत्य करताना दिसे, कधी स्मशानात वावरणारा विश्वनाथ दिसे, कधी भयाण रौद्र तांडव नृत्य करताना दिसे. तिचे मन त्या नृत्याच्या लयीत विरघळून, विरून गेले. किती तास झाले तरी ती निस्पंद, निश्चल बसून राहिली. ध्यान उतरले नाही. बाह्य जगाची - अगदी स्वतःच्या शरीराची संज्ञा सुद्धा हरपली होती, ती परत येईना, अनंत तिला शोधत तिथपर्यंत आला, त्याने हाका मारल्या, तिला गदागदा हलवले, पण ती जणू पद्मासनात मृतवत राहिली. श्वास इतका मंद चालू होता. म्हणून जिवंत समजावे. दिवस संपला, मुले रडून रडून झोपली, वैद्य बुवा शांत होते पण वाट पाहून थकले. अनंताला आणि त्याच्या

medical शिक्षणाला काहीही उत्तर देता येत नव्हते. ती coma त नव्हती, ती झोपेत नव्हती. तिला जागे कसे करायचे. तिच्या अंतर्यामात डोकावून तिच्या पर्यंत हाक पोहचवणारे कोण होते.

अलख निरंजन !!! एक साधू देवळात शिरले, त्यांनी मोठ्याने घंटा वाजवली आणि नमस्कार करून गाभाऱ्यातून बाहेर आले. एखाद्या जवळच्या ओळखीच्या माणसाला हाक मारावी तशी त्यांनी सुजाताला हाक मारली. पण ते तिला मैत्रेयी म्हणून हाक मारत होते. तिचा काहीच प्रतिसाद नाही असे बघून मग त्यांनी तिच्या कानात काही मंत्र पुटपुटले. तिच्या मस्तकावर हात ठेऊन तीला आशीर्वाद दिला. त्या बरोबर तिच्या शरीराची किंचित हालचाल सुरु झाली. मग साधू बुवांनी || ओम नमः शिवाय || मंत्राचा गजर करायला सांगितले. त्यानंतर हळूहळू सुजाता भानावर आली.

**********

तिने शंकराला आणि आपल्या गुरुना नमस्कार केला. अनंताला आपल्या गुरूची ओळख करून दिली. तिच्या गतजन्मीच्या स्मृतींची तिला जाणीव झाली. तीच मैत्रेयी आणि तीच लुसी होती. तिने अनंताला पूर्व जन्मातील डॉक्टर आशिष म्हणून ओळखले. तो सर्व पूर्व इतिहास तिने अनंताला सांगितला.

आता तीचे मन संसारात रमणे शक्य नव्हते. तिची मातृत्वाची इच्छा देवाने पूर्ण केली होती. तिला डॉक्टर आशिष चे प्रेम भरभरून मिळाले. आता जायची वेळ आली होती.

साधू बुवांनी तिला आशीर्वाद दिला, "समाजाभिमुख हो."

बाकीच्यांचा निरोप घेण्यासाठी ती घरी गेली. वैद्य बुवांच्या आणि आईच्या साठी, मुलांसाठी ती आणखी एक आठवडा घरी राहिली. अनंताला आणि मुलांना समजावणे अवघड गेले. शेवटी त्यांच्या लग्नाच्या प्रत्येक वाढ दिवशी त्यांनी भेटावे ह्या अटीवर तिची सुटका तिने करून घेतली. कुल स्वमिनीचे आणि भीमा शंकराचे आशीर्वाद घेऊन ती संन्यासिनी बाहेर पडली. जगन्मातेची इच्छा म्हणा किंवा गुरूचा आदेश म्हणा, समाज कार्य करण्यासाठी, परत एकदा "माम एकम शरणं व्रज". तो चालवणार आहे, त्याने हात धरला आहे, मग काळजी कसली.

*********

सुजाता बाहेर पडली आणि रेल्वे स्थानकावर आली. काय करावे, कोठे जावे, कोठून सुरुवात करावी अशा विचारात होती. तेव्हढ्यात एक स्त्री तिला खुण करत म्हणाली, माझ्यामागे ये. तोच संकेत समजून सुजाता तिच्याबरोबर चालू लागली. त्या दयाळू स्त्रीने तिचे गुवाहातीचे तिकीट काढून दिले आणि मी पाणी पिऊन

येते, माझे बोचके सांभाळ, म्हणून पाणपोई कडे गेली. गाडी सुटली तरी ती स्त्री परत आली नाही कि कोठे दिसली नाही. सुजाता ने नंतर बोचके उघडले तर त्यात अंगावरच्या कपड्यांचा एक जोड, थोडेसे खाणे, आणि एक पत्ता मिळाला. तीन दिवसांनी सुजाता तिथे पोहोचली. तो पत्ता म्हणजे एक पडके घर होते. बाजूला एक मंदिर, एक शाळा आणि आदिवासी / वनवासी मजूर वस्ती होती.

सुजाता दुसऱ्या दिवशी देवीच्या दर्शनाला गेली आणि मंदिरात देवीच्या पुढच्या आदेशाची वाट पाहत बसली. तिला कोणताही आदेश, सूचना किंवा आतला आवाज ऐकू आला नाही. संध्याकाळी आरती नंतर तिला पुजाऱ्याने बाहेर हाकलले आणि कंटाळून ती घरी आली. दिवसातील बारीक सारीक प्रसंग आणि घटना, लोकांच्या बोलाचाली आणि संवाद - क्षण अन क्षण तिने तपशीलवार आठवला. पण कोठूनही दरवाजा उघडला नाही. त्या स्त्रीने तिकीट काढून दिले आणि आपण तिच्या पाठीमागे आलो ह्यात आपला वेडेपणा तर झाला नाही ना. ह्या विचारात शेवटी थकून तिला झोप लागली.

पहाटे तिला एक सुंदर स्वप्न पडले. स्वप्नात तीच ती स्त्री येऊन तिला म्हणते कशी, अग आपण मैत्रिणी जिवाभावाच्या,

जन्मोजन्मीच्या, तुझ्यासाठीच तर मी एव्हढी दूर तुझ्या गावी तुला न्यायला आले. तू माझ्या माणसाना मदत करशील ना.

सुजाताला खडबडून जाग आली. तिच्या गुरुनी सुद्धा तिला हेच सांगितले नव्हते का ; 'समाजाभिमुख हो.'

**********

सुजाताने पुन्हा एकदा पद भ्रमण सुरु केले. प्रत्येक गावात जायचे, देवळात वस्ती करायची. सकाळी आरती, मग आल्यागेल्यांशी गप्पा, चर्चा, दुपारी भिक्षा, मग प्रवचन, संध्याकाळी कीर्तन, रात्री ध्यान. लोकांना समजून घेणे आणि समजावणे. लोक शिक्षण, लोक जागृती. आणि त्यातून क्रांती. दुर्बलाला सबल करणारी, सबलाला समंजस, समंजसाला सुशिक्षित आणि सुशिक्षिताला सक्रीय करणारी क्रांती. आपला प्रेरणादायी इतिहास आणि पूर्वी आपल्या पूर्वजांनी धर्मासाठी केलेले बलिदान, ह्यातून धर्मांतरा विरुद्ध एक चळवळ उभी राहू लागली. धर्मान्तारच्या प्रलोभनांना कडवा विरोध आणि जबरदस्तीच्या धर्मांतराला सशक्त प्रतिकार तिने सुरु केला. प्रतीष्टीताना सामाजिक दृष्टी दिली. कर्मचाऱ्यांना कौशल्य आणि माहिती साठी जगाशी संपर्क दिला. व्यापाऱ्यांना समृद्धीचा नवा मंत्र दिला. उत्पादन आणि त्यातील विज्ञान ह्याची ओळख करून

घेण्यास संधी उपलब्ध करून दिली. आणि समाजात श्रमाला मानाचे स्थान मिळवून दिले.

तिच्या कीर्तन, प्रवचनांना अलोट गर्दी होऊ लागली. मीरेची भजने, तुलसीदास आणि कबीराचे दोहे, नामदेव तुकारामचे अभंग, रामदासांचे श्लोक, एकनाथांचे भारुड, तिच्या गोड सुरेल आणि भक्तिपूर्ण आवाजात इतके लोकप्रिय झाले. तिच्या प्रवचनातून पुराणातील गूढ कथांना आजचे शास्त्रीय संदर्भ मिळाल्याने जाणकार लोक आवर्जून उपस्थित राहून आपल्या शंका कुशंका तिला सांगू लागले. तिच्याशी चर्चा करून कुट प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न करू लागले. तरुणांनी पुराणातल्या कथांना भाकडकथा म्हणणे सोडून दिले. अर्थात तिच्यावर पाठीमागून वार करण्याचे प्रयत्न झाले, तिच्या खुनाचे सुद्धा प्रयत्न झाले. पण ह्या गोष्टी तिला नवीन नव्हत्या. त्यांचा प्रतिकार कसा करायचा हेही तिला चांगलेच माहित होते, अवगत होते.

एव्हढ्या गडबडीतही दररात्री तिचे भगवंताशी असलेले संधान कधी चुकले नाही. की त्याची ओढ आणि तळमळ कमी झाली नाही.

धर्मांतरा विरुद्धची चळवळ तीव्र होत गेली. सामाजिक क्रांती जशी यशस्वी होत गेली तसे तिची सामाजिक आणि राजकीय

मान्यता वाढत गेली. 'जागतिक धार्मिक शोषण आणि अतिक्रमण' ह्या विषयावर अमेरिकेत भरणाऱ्या जागतिक परिषदेसाठी हिंदू वनवासी जनांची प्रतिनिधी म्हणून तिला आमंत्रण आले. तिने ते स्वीकारले आणि आपल्या प्रबंधाची तयारी सुरु केली. त्या प्रबंधाची रूपरेषा सर्वानुमते साधारण अशी ठरवण्यात आली. त्याचा हा सारांश :

सारांश

"हिंदू धर्म हा सनातन धर्म आहे. तो प्रत्यक्ष अनुभवावर आधारित आहे. विश्वाच्या आणि आपल्या अस्तित्वाचे शास्त्र म्हणजे अध्यात्म आणि अध्यात्मावर आधारित हिंदू धर्म हा शास्त्रोक्त धर्म आहे."

"हा असा धर्म आहे जेथे "तुम्ही देव पाहिलाय का?" ह्या प्रश्नाला खणखणीत उत्तर मिळते. "होय, मी देव पाहिलाय, अगदी तू मला पाहतो आहेस तसा, किंबहुना त्यापेक्षा स्पष्ट, आणि तुझी इच्छा असेल तर तुला सुद्धा पाहता येईल."

"हिंदू धर्म कोणाला पापी समजत नाही तर उलट सांगतो "तुम्ही अमृताचे पुत्र आहात." आणि जरी तुमच्या हातून काही दुष्कृत्य घडले तर त्यातून बाहेर पडण्याचा मार्ग दाखवतो."

"हिंदू धर्मात कोणत्याही प्रकारची सक्ती नाही. आहार, पोशाख, दाढी - केशरचना, ह्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे. अगदी

प्रार्थनेची सुद्धा सक्ती नाही. देवाचे अस्तित्व मान्य करण्याची सुद्धा सक्ती नाही."

"हिंदू धर्म कर्म सिद्धांत आणि पुनर्जन्म ह्याच्या पुढे जाऊन प्रयत्नवादाला प्रोत्साहन देतो. कर्म सिद्धांत हेच सांगतो कि तुमचे कर्म तुमचे नशीब घडवते आणि म्हणून तुमच्या आजच्या कर्मानेच तुमचा उद्याचा भविष्यकाळ ठरेल. एव्हढेच नाही तर कर्म करण्याची शास्त्रोक्त पद्धत सुद्धा सांगतो. पण त्याच वेळेस पुढच्या जन्मातील खोटी स्वप्ने आणि आश्वासने देत नाही."

"हिंदू धर्म कर्मठ कर्मकांड मान्य करत नाही, पण त्याचा निषेध ही करत नाही तर त्याला अध्यात्मातील एक प्राथमिक गौण पायरी समजतो आणि त्याच्या पलीकडे जायला सांगतो."

"हिंदू धर्म फक्त नैतिक आचार - विचार ह्यांची नियमावली नाही, तर तो शक्ती ची उपासना आणि तिचा अनुभव ह्यावर आधारित आहे. सर्व विश्वाला चालवणारी शक्ती - तिला नाव कोणतेही द्या, त्या शक्तीचे प्रकटीकरण, तिच्याशी एकरूपता, ह्यावर आधारित जीवन शैली म्हणजे हिंदू धर्म."

"त्या शक्तीची तीन रूपे म्हणजे ज्ञान भक्ती आणि कर्म."

"हिंदू धर्मात पंथ आणि उप-पंथ ह्याच्या मान्यतेसाठी कोणाचा छळ होत नाही. किंवा एखाद्या सत्याच्या स्थापनेविरुद्ध

सत्याग्रहींवर अत्याचार होत नाही. इथे वाद विवाद ह्यांची एक मोठी गौरवपूर्ण परंपरा आहे."

"हिंदू धर्म वैयक्तिक स्वातंत्र्याची गळचेपी करत नाही तर त्याला संरक्षण देतो."

"हिंदू धर्म विज्ञानाला चालना देतो, संगीताला महत्वाचे स्थान देतो, कलेला उत्तेजना देतो, प्रयोग आणि परिवर्तनाला जीवनाचा एक भाग समजतो. कोणाला आणि कशालाही बहिष्कृत करत नाही तर सबळ आणि उदात्त करतो."

"हिंदू धर्माला राजकीय महत्वाकांक्षा नाही. कोणीही हिंदू धर्माचा सत्तांतरासाठी, राज्य किंवा प्रदेश बळकावण्यासाठी, किंवा कोणत्या समाजाला गुलाम बनवण्यासाठी, उपयोग करू शकत नाही."

"माणसाची आणि पर्यायाने समाजाची आध्यात्मिक उन्नती करणे हाच हिंदू धर्माचा एकमेव उद्देश आहे. हा एकच धर्म असा आहे जो सांगतो कि आध्यात्मिक उन्नती मुळे आर्थिक आणि सामाजिक उन्नती आपोआप येते. पण आध्यात्मिक उन्नती शिवाय झालेली प्रगती टिकत नाही. आध्यात्मिक उन्नती मध्ये च उत्क्रांतीची बीजे रोवली जातात. आध्यात्मिक उन्नती शिवाय उत्क्रांती होणे नाही."

"हिंदू धर्म जाणतो कि अध्यात्मिक मुक्ती हा एक प्रवास आहे आणि तो अध्यात्मिक शक्तीच्या मदतीने आणि सहकार्याने च शक्य आहे. अध्यात्मिक मुक्ती ही फक्त अनुभवण्याची गोष्ट आहे, Singularity हे त्याचे विज्ञानातील नाव आहे. हिंदू धर्माने हा प्रवास पूर्ण केलेला आहे आणि पाठीमागून येणाऱ्या प्रवाशांसाठी ह्या प्रवासाचा राजमार्ग आखून ठेवला आहे."

"हा राजमार्ग साकार भक्तीचा आहे. मूर्तीपूजेचा आहे. निराकार हि फक्त अनुभवण्याची गोष्ट आहे आणि सुरुवातीपासून हा अनुभव प्रत्येकाला घेता येईल असे नाही. जर सुरुवातच झाली नाही तर प्रवासच थांबतो हा मानवजातीचा इतिहास आहे."

"बिंदू ची व्याख्या केली तरी तो दिसत नाही, तो आखता येत नाही, त्याची फक्त कल्पना केली जाऊ शकते. पण त्याला टींब म्हंटले तर कागदावर आखून आणि एकाला एक जोडून रेषा होते आणि निरनिराळे आकार निर्माण होतात, त्यावर भूमिती ची प्रमेये मांडता येतात. तेंव्हा हिंदू धर्म प्रवासाच्या सुरुवातीला निराकाराचा हट्ट धरत नाही. साकारातून निराकाराकडे असा हा प्रवास शेवटी मुक्तीकडे घेऊन जातो. मूर्तीपूजा ही हिंदू धर्माची मानवजातीला दिलेली देणगी आहे. ही प्रवासातील शिदोरी आहे, हिंदू धर्म ह्या

प्रवासातील खाच खळगे जाणतो, त्याने हा प्रवास कित्येकदा कित्येक वाटांनी पूर्ण केलेला आहे."

"ह्या अतिशय खडतर प्रवासात तुम्हाला मदतीचा हात देण्यासाठी कधी कधी जो धावून येतो, ज्याने हा प्रवास पूर्ण केलेला असतो, तो पाठीमागे येतो केवळ तुमच्यासाठी, त्याला अवतार म्हणतात. तो तुमचे चिखलात रुतलेले चाक बाहेर काढतो. हा इतिहास आहे, त्याचा उपहास केल्याने आपला थांबलेला प्रवास तिथेच संपतो."

"ह्या प्रवासाचा भाग म्हणून हिंदू धर्माने अनेक शास्त्रे, कला, कौशल्य तयार केली आणि पूर्णत्वाला नेली. योग, आयुर्वेद, ध्वनी, काळ (मुहूर्त शास्त्र, ज्योतिष शास्त्र), त्या बरोबरच विज्ञान जसे गणित, भाषा, स्थापत्य, वनस्पती शास्त्र, जीव जंतू शास्त्र, इत्यादी."

"हिंदू धर्म मानतो कि अध्यात्मिक ऱ्हास ही अवनतीची सुरुवात असते. प्रथम धर्म बुडतो आणि नंतर समाज रसातळाला जातो. हा सुद्धा मानव जातीचा इतिहास आहे. म्हणून हिंदू धर्म, धर्मांतराचा तीव्र निषेध करतो. मोह, आमिष आणि प्रलोभने, किंवा जुलूम व जबरदस्ती करून धर्मांतर करण्याचा तीव्र निषेध करतो. गैरफायदा किंवा स्वार्थ ह्यासाठी केलेल्या धर्मांतराचा निषेध करतो. धर्मांतर हे सामाजिक अवनतीचे एक लक्षण आहे. धर्मांतर हे राजकीय महत्त्वाकांक्षेचे साधन आहे. गेल्या २००० वर्षाचा मानव

जातीचा इतिहास हा पुरावा आहे. म्हणून धर्मांतर थांबले पाहिजे, थांबवले पाहिजे."

"ह्या प्रयत्नांची पुढची पायरी म्हणजे ज्यांचे अशा प्रकारे धर्मांतर झाले आहे आणि असे जे हिंदू धर्म सोडून गेले असतील त्यांना पुन्हा हिंदू धर्मात घेतले पाहिजे. हिंदूंची घर वापसी ही सुद्धा राजकीय गरज समजून तिला राजसत्तेचा वरद हस्त मिळाला पाहिजे."

"आजपर्यंत इतिहासात सर्वात जास्त क्रूर, पाशवी, अतिशय प्रदीर्घ - अशा धार्मिक अत्याचार, छळ, आणि धार्मिक अतिक्रमण - ह्यांना हिंदू धर्माला सामोरे जावे लागले आहे. हिंदू धर्म जिवंत राहिला तर जगाला अध्यात्माची वाट सापडेल. नाहीतर माणसातील पशु माणसावर मात करेल आणि जग परत एकदा मध्य युगात जाईल."

"हिंदू धर्म आणि हिंदूंच्या पुनरुत्थानात च जगाचे भविष्य सुखरूप राहील."

" || धर्मो रक्षति रक्षितः ||"

************

ब्रह्मपुत्रेच्या पुराने मजुरांची ती वस्ती पूर्ण वाहून गेली.

आधीच अठरा विश्वे दारिद्र्य. अन्नाचा एक घास दिसला तर पुढचा कधी दिसेल माहित नाही. कपडा नाही. राहायला घर नाही.

डोके टेकायला धरती नाही. सगळीकडे पाणी नाहीतर चिखल. आजवरच्या मेहनतीला एका रात्रीत धुवून नेले निसर्गाने. कोणाचा मदतीचा हात नाही. सहानुभूतीचा शब्द नाही. आपणच रडावे धाय मोकलून. आपणच आपले अश्रू पुसावे. शून्यातून उभे राहावे, उभे करावे स्वतःला आणि भुईसपाट झाल्यावर मातीत मिसळून जावे. दर दोन तीन वर्षांनी पुरात नाहीतर आगीत आयुष्याच्या चिंध्या चिंध्या व्हाव्या. शून्याच्या पुढे गिनतीच नाही. कशाचीच शाश्वती नाही. सुरक्षा नाही. लेकरांच्या, बाय बापड्यांच्या हाल अपेष्टांना अंत नाही. धनिक उन्डगे - दांडगे, पोलीस, मवाली गुंड पुंड, ह्यांच्या सासेमिरातून वाचवावे कोणा कोणाला. कसला धर्म आणि कसले कर्म. एक क्षणाचे जिणे तिथे जो पुढचा क्षण उसनवार देईल तोच धर्म.

सुजाता चे ह्रिदय पिळवटून गेले पुराच्या आणि धर्मान्तारच्या बातम्यांनी. ती चिडली. तिने ठरवले, जाब विचारायचा. कौल लावायचा. पण महादेवाशिवाय कोण होते तिथे तिचे जाब विचारायला. ती देवळात जाऊन महादेवाच्या पिंडीसमोर बसली. दुःखाच्या तिरीमिरीत, मनातल्या मनात आक्रोश आणि संतापाने महादेवाला बोल लावू लागली. ती दमली, थकली, हताश झाली, मन आक्रसत संकोच होत, आत आत खोलात बुडाले. तेंव्हा मनाला एक कोणीतरी अंतस्थ समजावण्याचा प्रयत्न करू लागले.

दिलासा देऊन आशेने आश्वस्थ करण्याचा प्रयत्न करू लागले. असा किती वेळ गेला पण सुजाता चे समाधान झाले नाही. आज उत्तर मिळाल्याशिवाय इथून उठणार नाही, हा तिचा निर्धार होता. कितीही वाट पाहायला लागली तरी ती थांबणार होती. त्या ग्लानीत मध्येच तिला ती स्त्री भेटली. तिने तिला जवळ घेतले, कुरवाळले आणि गूढ हसली. आणि एका महाकाय आकृतीत शिरली व विसर्जित झाली. आता ती आकृती मोठी मोठी होत गेली. ती आणि तिच्या सीमारेषा धूसरपणे स्पंदन करत होत्या. त्या सीमारेषा सगळीकडून जणू अनंतापर्यंत पसरत होत्या. त्या आकृतीत जिकडे पाहावे तिकडे तेजस्वी सडा पडला होता. आणि गूढ असा प्रकाशाचा अभाव सुद्धा होता. जणू दिवस आणि रात्र शेजारी शेजारी असावेत. हळू हळू तिची जाणीव वाढली आणि तिला ती पूर्ण आकृती जाणवली. अखंड स्पंदित, अखंडपणे वृद्धींगत, अनंत, पुराण पुरुष.

"सुजाता, पहा. हे सुद्धा माझेच एक रूप आहे. विश्वरूप. अनंत. वादळातील धुराळ्या प्रमाणे काळ आणि आकाश (space) माझ्यामध्ये इतस्ततः पसरले आहेत. आणि माझ्याच तेजामुळे त्यांचे अस्तित्व जाणवते आहे. कोठे ते संक्षिप्त (finite infinity) भासतात तर कोठे विस्तृत. कोट्यावधी प्रकाश वर्षे पसरलेला हा विश्वाचा पसारा अखंड स्पंदन करतो आहे तो माझ्यातील शक्तीमुळे

आणि माझ्यात तो सामावलेला आहे. त्याचा आदी मध्य आणि अंत नाही.

माझ्यामध्ये अगणित आकाश गंगा, तारे, तारकापुंज, अगणित कृष्ण विवरे, तेजःपुंज घनदाट मेघ आणि अगणित सूर्य, ग्रह - उपग्रह, ह्यांनी भरून उरणारे. पंच महाभूतांच्या पेक्षा सूक्ष्म आणि विराट. माझ्यामध्ये ह्यांची उत्पत्ती आहे आणि माझ्यामध्येच विलय. अनंत उर्जा ने नटलेले हे रूप. एकाच वेळी उर्जेचे अनेक महासागर उसळताना दिसत आहेत. त्यांना एकाच वेळी भरती आणि ओहोटी, प्रत्येक उत्पत्ती बरोबर काळाचा जन्म होताना दिसतो आणि प्रत्येक प्रलयात काळाचा अंत होताना दिसतो. अगणित संस्कृती मुंग्यांच्या वारुळाप्रमाणे त्या त्या किनाऱ्यावर भरतीला उभ्या राहतात आणि ओहोटीला वाहून जातात. कित्येक ठिकाणी तर संस्कृतीचा उदय व्हायचा आहे. काही ठिकाणी संस्कृती पूर्ण उमलण्या आधीच ती नष्ट झालेली दिसते आहे. त्या सर्व स्थित्यंतरात मीच कारक आहे. स्थळ - काळ सापेक्ष आणि उर्जेच्या स्तरानुसार शास्त्रीय नियमांची धारणा होते आणि प्रत्येक संदर्भाबरोबर नियम बदलतात. माझ्यामध्ये सगळ्यांची धारणा होते आणि विघटन होते. सर्व घटनांचा अधिष्ठाता मीच आहे, त्या घटना माझ्यामध्येच घडतात आणि त्यांचा परिणाम हि मीच आहे. संपूर्ण विश्वाचा हा अनंत असा पसारा तुला एका दृष्टी क्षेपात दिसतो,

जाणवतो आहे, कारण तुझ्या निमित्ताने माझीच तशी इच्छा आहे. तू मला प्रिय आहेस. माझ्या इच्छेनुसार तुझ्याकडून माझे आणखी कार्य व्हायचे आहे. तू माझीच आहेस आणि मी तुझा आहे आणि योग्य वेळी आपण पुन्हा एकत्र येऊ."

आनंदाच्या लाटांनी हळूहळू तिला अलगद किनाऱ्यावर आणून सोडले. तरीही खूप वेळ ती तशीच स्तब्ध बसून महादेवाचे स्तवन करत राहिली.

|| चिदोहम चिदोहम चिदानंद रूपः शिवोहम शिवोहम ||

|| चिदानंद रूपः शिवोहम ||

|| शिवोहम ||

हळू हळू तिचा जप अजपाजप# झाला. जपात श्वास आणि श्वासात जप गुंफून एकवटला.

"मिठाची बाहुली समुद्राला जाब विचारायला समुद्रात गेली, ती परत नाही दिसली. तिच्या दुःख आणि वेदनेला समुद्राने आपलेसे केले आणि समुद्राच्या शक्तीला तिने आत्मसात केले. समुद्राशी ती एकरूप झाली."

**********

# अवतार

---

अवतार ही हिंदूंची एक सर्वात सुंदर, अद्भुत, विश्व व्यापून उरणारी, महान संकल्पना आहे. एक अविचल श्रद्धा आहे. हिंदुनी मानव जातीला दिलेला सर्वात रोमांचकारी विचार आहे. आणि ते एक प्रत्यक्ष वास्तव ही आहे.

अवतार म्हणजे काय? तर 'SINGULARITY' PERSONIFIED.

जेंव्हा हे व्यक्तीकरण कियाशील नसते तेंव्हा तिला मूर्ती म्हणतात आणि जेंव्हा हे सक्रीय, सजीव असते तेंव्हा त्याला अवतार म्हणतात.

हिंदूंचे असे म्हणणे आहे कि हे व्यक्तीकरण घडते, घडले आहे आणि पुढेही वारंवार घडणार आहे. निराकारच सगुण साकार आहे आणि साकार हेच निर्गुण निराकार आहे.

बिंदू - भूमितीतील मध्यवर्ती संकल्पना. ज्याला उंची नाही, लांबी नाही, रुंदी नाही, त्याला डोळयासमोर आणता येत नाही, जाणता येत नाही, ज्याला स्पर्श करता येत नाही, ज्याचे गुण वर्णन नकारात्मक करता येते, जे सहजासहजी आकळत नाही, अशी हि

संकल्पना. पण म्हणून भूमितीचे सिद्धांत नाकारता येत नाहीत, त्यावर आधारलेले व्यवहार खोटे ठरत नाहीत. त्या अनेक बिंदुना जोडणारी रेषा सगळयांना दिसते आणि भूमितीची प्रमेये सिद्ध करता येतात. तसेच अव्यक्त Singularity चे थेट आकलन होणे शक्य नाही, पण ह्या व्यक्तीकरणामुळे त्याचा प्रत्यय येतो. त्यामुळे जगण्यास आधार मिळतो, जीवनाला दिशा मिळते. आणि कधी कधी हे व्यक्तीकरण एखाद्या स्पर्श रेषेप्रमाणे वर्तुळाच्या परिघावरील बिंदुला परिघा बाहेरचा अनुभव मिळवून देते.

बिंदूचे अस्तित्व मान्य केल्यावर रेषेचे किंवा त्या रेषांनी बनलेल्या त्रिकोणाचे, चौकानाचे किंवा वर्तुळाचे अस्तित्व नाकारणे ही एक अतार्किक आणि असमंजस गोष्ट आहे. किंवा त्यातील एकाच आकाराचे अस्तित्व स्वीकारणे आणि बाकीच्या आकाराना नाकारणे हि सुद्धा एक अतार्किक आणि असमंजस गोष्ट आहे.

ज्या समाजाना हे कळले नाही त्यांना जीवनाची भूमिती मांडता आली नाही, त्यांना कोणत्याच 'आकाराची' गणिते सोडवता आली नाहीत. त्यांना कोणत्याच रेषेवर पुढे जायला जमले नाही. त्यांना ना त्रिमितीत जगता आले ना त्रिमितीच्या बाहेर जाता आले.

**********

आज दुसऱ्यांच्या चुकीच्या प्रभावाने आमची हि श्रद्धा डळमळीत झाली आहे आणि आम्ही गोंधळून गेलो आहोत. अशा वेळी जो अवतार एखाद्या स्पर्श रेषे प्रमाणे आम्हाला वर्तुळाच्या बाहेरील वाट दाखवून गेला त्याचा अभ्यास होणे जरूर आहे. तो आम्हाला आमची श्रद्धा परत मिळवण्यास मदत करेल. आमच्या भूमितीतील सिद्धांताची नवीन सिद्धता मांडण्यास मदत करेल. हे काम इतके अभिनव, क्रांतिकारी आणि आव्हानात्मक असेल, कि ते बाकीच्या समाजाना सुद्धा पथ दर्शी असेल.

डोळ्यांवरची खोट्या विज्ञान निष्ठेची झापडे फेकून दिली तर कळेल कालचे तत्वज्ञान आजचे गणित / विज्ञान आहे आणि आजचे गणित / विज्ञान उद्याचे तत्वज्ञान असेल.

**********

श्री रामकृष्ण परमहंस हे एक अवतार होऊन गेले. (१७-०२-१८३६ ते १६-०८-१८८६.) त्यांचे पूर्ण चरित्र त्यातील बारीक सारीक घटना सुद्धा लिहून ठेवलेल्या आहेत. त्यांचे बोलणे चालणे, दैनंदिन व्यवहार, त्यांची असाधारण साधना, त्यांच्या संबंधी घडलेले चमत्कार, त्यांनी स्वतः विषयी, इतरांविषयी सांगितलेल्या अद्भुत गोष्टी, त्यांनी दिलेले आणि प्रत्यक्ष जगलेले वेदांत तत्वज्ञान - ह्याचा सखोल अभ्यास केला तर अवतार म्हणजे काय ते

कळायला मदत होईल. श्री रामकृष्णांचे आयुष्य समजले तर 'singularity personified' म्हणजे काय ते कळेल.

१. काशीपुर येथील बगीच्यात गळयाच्या रोगाने आजारी असता एक दिवस ते जवळच्या मंडळींकडे पाहून म्हणाले "ह्या वेळी कुठे एखादा आवळा मिळेल का? तोंडाला चव म्हणून कशी ती नाही. जर एखादा आवळा चघळायला मिळेल तर किती छान होईल?" ते दिवस आवळयाचे नव्हते. म्हणून ह्या वेळी आवळा कसचा मिळतो असे वाटून सर्व जण निराशेने स्वस्थ बसले. पण श्री नाग महाशय ह्यांना खात्री होती कि ज्या अर्थी श्री रामकृष्णाना आवळे खायची इच्छा झाली आहे त्या अर्थी कोठे ना कोठे तरी आवळे असणारच, आणि तसे ते श्री नाग महाशयांना सापडले. आवळे नसते तर त्यांना तशी इछाच झाली नसती. इच्छा होणे आणि ती पूर्ण न होणे म्हणजे 'singularity' ला नाकारणे, 'Big Bang' ला नाकारणे, ह्या विश्वाचे अस्तित्व नाकारणे. हे विश्व, विश्व मन (अवतार) आणि त्यांना धारण करणारी शक्ती - तीनही एकरूपच आहेत. ह्या एकरूपतेचे शास्त्रीय नाव आहे 'singularity'.

अशा 'क्षुल्लक' घटना / गोष्टी, त्यांच्या, त्यांच्या अंतरंग शिष्यांच्या, स्वामी विवेकानंदांच्या आयुष्यात इतक्या वेळा

बिनचूकपणे घडल्या आहेत कि त्या योगायोगाने घडल्या असे म्हणणे धाडसाचे ठरेल. (statistics मध्ये) जर १०० पैकी १०० वेळा सांगून छाप किंवा काटा पडला तर त्याला probability म्हणत नाहीत.

2. सन्याशाने संचय करू नये. ह्या नियमाप्रमाणे श्री रामकृष्णांना संचय वर्ज्य होता. एकदा ठरले कि मग चुकून सुद्धा संचय होण्याची शक्यता नाही. त्यांची स्थिती अशी होती कि बटव्यात घालून पाने वागवण्याची सोय नाही, कि शौचाला गेल्यास हाताला लावायला म्हणून तेथून माती सुद्धा आणायची सोय नाही. अंगावरील वस्त्रास कुठे एखाद्या टोकाला सुद्धा एखादी लहानशी गाठ मारायची सोय नाही. कारण गाठ म्हटले कि संचयाची कल्पना आलीच. कुठे गाठ मारल्यास त्यांचा श्वास गुदमरून जाई व हात पाय वाकडे तिकडे होऊन जात.

महेंद्रने एकदा रामलाल जवळ पाच रुपये दिले. तो गेल्यावर रामलालने ते श्री रामकृष्णाना सांगितले. "हे पैसे तो कोणासाठी देऊन गेला?" "आपल्यासाठी." प्रथम त्यांना वाटले "बरे झाले, दुधाचे पैसे द्यायचे आहेत, तेव्हढे तरी देऊन टाकू." "पण काय? रात्री जरा कुठे डोळा लागतो न लागतो तोच झोपेतून धडपडत उठलो. छातीवर जणू एखादे मांजर ओरबाडत आहे !!! तसाच

रामलाल कडे गेलो आणि त्याला विचारले 'आरे, ते पैसे तुझ्या चुलतीसाठी तर नाही दिले? तो म्हणाला, नाही. तरी ते पैसे त्याने परत दिले तेंव्हा वाचलो."

एकदा विश्व मनाने (अवताराने) काही ठरवले कि ते घडलेच पाहिजे. फक्त वाचिक आणि मानसिक अर्थाने नव्हे तर कायिक कृतीतून सुद्धा. प्रतिक्षिप्त क्रिये प्रमाणे. प्रत्यक्ष विश्व आणि विश्व मन आणि शक्ती ह्यांची संपूर्ण एकरूपता हे त्रिकालाबाधित सत्य आहे.

३. कांचन त्याग हा श्री रामकृष्णांच्या हाडीमासी इतका खिळला होता कि त्यांना पैशाचा स्पर्शही सहन होत नसे. स्पर्श केल्यास श्वास गुद्मरल्यासारखा होऊन त्यांच्या अंगाला विंचवाने नांगी मारल्यासारख्या वेदना होत व हात पाय वाकडे तिकडे होऊन जात. पैसा तर काय कोणत्याही धातूच्या भांड्याला सुद्धा ते स्पर्श करू शकत नसत.

एकदा स्वामी विवेकानंदानी आपल्या गुरुजींची परीक्षा घेण्याचा बेत केला. श्री रामकृष्ण जरा बाहेर जाताच त्यांच्या बिछान्याखाली एक रुपया सारून ठेवला. आणि ते वाट पाहत बसले. बिछान्यावर बसताक्षणी अंगाला काहीतरी टोचल्याप्रमाणे किंकाळी फोडून श्री रामकृष्ण बिछान्याबाहेर येऊन उभे राहिले. त्यांच्या सर्व अंगाला वेदना होत होत्या. विवेकानंदांशिवाय खरा

प्रकार कोणाला ठाऊक नव्हता. बिछाना उस्कटला तेंव्हा खालून एक रुपया खणकन बाहेर पडला आणि श्री रामकृष्णांच्या ध्यानात सर्व प्रकार आला.

त्याग हा कायावाचामने करूनच झाला पाहिजे असे ते म्हणत. त्यांचे आचरण ही तसेच होते.

४. एक दिवस रात्री आठ नऊ चे सुमारास श्री रामकृष्णांच्या टाळूतून रक्त निघू लागून ते मुखावाटे एक सारखे बाहेर पडू लागले. त्या रक्ताचा रंग अगदी काळा कुट्ट होता व ते इतके दाट होते कि काही तोंडातून बाहेर पडले व काही दातास टोकास चिकटून, वडाच्या पारम्ब्याप्रमाणे लोंबू लागले. तोंडात बोळा दाबून रक्त दाबून धरण्याचा खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ. नेमके त्या दिवशी काली मंदिरात एक चांगला साधू आला होता. हा सारा गोंधळ ऐकून तोही तेथे आला आणि रक्ताचा रंग आणि ते जेथून बाहेर निघत होते ती जागा ह्यांची परीक्षा करून म्हणाला, " भिऊ नका, रक्त बाहेर आले हि फार चांगली गोष्ट झाली. तू योग साधना करीत असतोस असे दिसते. ह्या साधनेच्या प्रभावाने सुषुमनेचे तोंड मोकळे झाले असून शरीरातील रक्त डोक्याकडे वर चालले होते. ते डोक्यात न जाता असे मध्येच तोंडातून बाहेर निघाले हे फारच चांगले झाले. ते जर डोक्यात गेले असते तर तुला जड समाधी प्राप्त

झाले असती व ती मग काही केले तरी भंगली नसती. तुझ्याकडून जगदंबेचे काही विशेष कार्य व्हावयाचे आहे म्हणूनच तिने तुला ह्या संकटातून वाचवले असे दिसते."

विश्व, विश्व मन आणि त्यांना धारण करणारी शक्ती ह्यांची सर्वकालीन एकवाक्यता असते. भविष्यातील कार्यासाठी केवळ अध्यात्मिक व मानसिक नाही तर भौतिक (कायिक) सिद्धता सुद्धा असावी लागते. हेच वारंवार दिसते.

आणि हे भविष्यातील कार्य कोणते, कसे, काय स्वरूपाचे, आणि त्यासाठी काय लागते, हे कोणी, केंव्हा, का ठरवले असेल?

आणि दुसरी एक गोष्ट म्हणजे भारतात शरीर शास्त्र, योग, अध्यात्म ह्यांचे किती सखोल व एकात्मिक ज्ञान, (कोणत्याही उपकरणा शिवाय) उपलब्ध आहे ह्याची हि किंचीतशी झलक आहे. (हे अरुण शौरी म्हणतात त्याप्रमाणे मानसिक भ्रम किंवा मनाचे खेळ नाहीत.)

५. काली मंदिराजवळ बाबू शंभू चंद्र मल्लिक ह्यांचा एक दवाखाना असे. श्री रामकृष्णांना पोट दुखीची व्यथा होती. एक दिवस ते शंभू चंद्रांकडे गेले असता त्यांचे पोट दुखू लागले. तेंव्हा शंभू चंद्र म्हणाले, "आपल्याला मी एक दोन अफूच्या गोळया देईन. परत गेल्यावर त्या खा, म्हणजे पोट दुखणे राहील." बोलण्याच्या

नादात दोघेही हि गोष्ट विसरून गेले. श्री रामकृष्ण परत जावयास निघाले आणि दहा वीस पावले गेल्यावर त्यांना गोळयांची आठवण झाली. परत येऊन पाहतात तो शंभू चंद्र निघून गेले होते. तेंव्हा एवढ्यासाठी त्यांना कशाला हाक मारायची, असा विचार करून compounder कडून अफूच्या दोन गोळया घेऊन ते परत फिरले. पण वाटेत आल्यावर त्यांना नीट चालवेनाच ! पाय रस्त्याने न जाता नाल्याच्या बाजूला ओढ घेऊ लागले. असे का होते, वाट तर चुकली नाही ना असा संशय येऊन मागे वळून पाहतात तो मागील रस्ता नीट दिसत होता. मग शंभू चंद्राच्या फाटका पर्यंत परत गेले व तिथून रस्ता नीट पाहून घेऊन परत फिरले. तरी सुद्धा तसेच. त्यांच्या पायांना रस्ता नीट सापडेनाच. चालावयास लागावे, पण पायांनी सरळ जाण्याचेच नाकारावे. असे दोन तीन वेळा झाल्यावर ते निराश होऊन रस्त्यात बसले. तो एकाएकी त्यांच्या मनात आले, शंभू तर म्हणाला होता, माझ्या जवळून गोळया घेऊन जा, पण तसे न करता व त्याला न कळविता मी त्याच्या compounder कडून गोळया घेऊन चाललो आहे. म्हणूनच आई मला येथून जाऊ देत नसावी. शंभूला विचारल्याशिवाय गोळया देणे compounder ला योग्य नाही आणि दुसऱ्याकडून घेऊन जाणे मलाही योग्य नाही. तर अशा रीतीने गोळया नेण्यात असत्य भाषण आणि चोरी हे दोनही दोष आहेत. म्हणून आई मला येथून जाऊ न देता इथेच अडवून ठेवीत

असावी. असे लक्षात येताच ते तत्काळ दवाखान्यात परत गेले. तो तेथे compounder ही नव्हता. तेंव्हा त्यांनी दारातूनच गोळयांची पुडी आत टाकून 'ह्या तुमच्या गोळया आत टाकल्या हो !!' असे मोठ्याने ओरडून आपला रस्ता धरला. आता ह्या वेळेस पाय ठीक चालत होते आणि रस्ताही नीट दिसत होता. लवकरच ते आपल्या खोलीत जाऊन पोहोचले.

मनात असत्य विचाराचा उदय ही न होणे आणि कायावाचामनेकरून, सत्याचे पालन करणे हे अवताराचे स्वभाव वैशिष्ट्य आहे. राजा राजाशी राजाबद्दल कधी खोटे बोलू शकेल काय ! Can Singularity and his manifestation ever be disagreed on anything ???

6. एकदा मथुर बाबू आणि श्री रामकृष्ण ह्यांच्यात वाद उत्पन्न झाला, मथुर बाबू म्हणाले, "ईश्वराला सुद्धा कायद्याप्रमाणे वागावे लागते. त्याने एकदा केलेला नियम रद्द करण्याचे त्याला सुद्धा सामर्थ्य नसते." श्री रामकृष्ण म्हणाले, "अरे, ज्याने कायदा केला तो आपला कायदा वाटेल तेंव्हा रद्द करील, किंवा त्याच्या जागी निराळाच कायदा सुरु करील, हि त्याच्या खुशीची गोष्ट आहे." त्याला काही हे पटेना. "लाल फुलाच्या झाडाला नेहमी लालच फुल यायचे, पांढरे कधी यायचे नाही. कारण कि त्याने तसा नियम

केला आहे." श्री रामकृष्ण म्हणाले, "अरे, त्याच्या मनात आले तर तो काय वाटेल ते करील, मग पांढऱ्या फुलाची ती काय कथा?" "दुसऱ्याच दिवशी झाउतलाकडे गेलो असता दिसले कि एका लाल जास्वंदाच्या झाडावर एकाच डहाळी ला दोन फुले असून त्यातील एक तांबडे लाल आणि दुसरे अगदी पांढरे शुभ्र आहे - तांबड्या रंगाची त्यावर छटा सुद्धा नाही. डहाळी घेऊन मथुर कडे गेलो, तू नाही म्हणत होतास ना हे बघ." डहाळी नीट न्याहाळून, पाहून चकित होऊन, तो म्हणाला, हो बाबा ! मी हरलो."

Singularity even after personification remains Singularity - all powerful, and has own logic behind any actions / events, which may not be apparent at the time but may be revealed in future.

वर वर क्षुल्लक वाटणाऱ्या घटना मधून अवतार ह्या संकल्पनेतील साधारण मनुष्य आणि त्यांच्यातील असाधारण, अमानवी गुणोत्कर्ष - शक्तीची परमावधी, दोनही दिसून येतात.

7. वेदांत शास्त्राचा असा सिद्धांत आहे कि मनुष्याचे मनच त्याचे शरीर तयार करीत असते. आणि तीव्र वासना आणि इच्छा ह्यांच्या प्रबलतेने ते आयुष्याच्या प्रत्येक क्षणी बदलत असते. श्री रामकृष्णांच्या साधना काली त्यांच्या देहामध्ये भावनांच्या

उत्कटतेने झालेले बदल हे ह्या वेदांत सिद्धांताची उत्तम उदाहरणे आहेत.

दास्य भावातून श्री महावीर हनुमानाची साधना करीत असता ते स्वतःचे पृथक अस्तित्व आणि व्यक्तिव विसरले. ह्या दिवसात आहार विहारादी सर्व कार्ये हनुमानासारखीच होत. आणि वानराप्रमाणे पाठीच्या कण्याचा शेवटचा भाग अजमासे एक इंच वाढला होता. महाविराचा भाव मनातून गेल्यानंतर तो वाढलेला भागही हळूहळू कमी होत शेवटी पहिल्यासारखा झाला.

मधुर भावाने श्री कृष्णाची साधना करीत असता स्त्रीत्वाची भावना त्यांच्या रोम रोमात भिनून गेली इतकी, कि ते आपण पुरुष आहोत हे सुद्धा विसरले. त्यांच्या शरीराची व इंद्रियांची सर्व कामे स्त्री शरीर प्रमाणे होऊ लागली. ह्या काळात, स्वाधिष्ठान चक्र असलेल्या भागाच्या सर्व रोम कुपातून दर महिन्यास ठराविक वेळी शोणित स्त्राव होत असे आणि तो स्त्रियांप्रमाणे तीन दिवस पर्यंत चालत असे. नेसलेले वस्त्र दुषित होऊ नये म्हणून ते त्या काळी कौपीन धारण करीत असत. ह्रिदय राम ह्याला साक्षीदार होता. ह्रिदय राम त्यांच्या संपूर्ण १२ वर्षाच्या साधना काळात त्यांचा पाठीराखा आणि साक्षीदार होता.

साधना किती तन्मयतेने, किती तीव्रतेने, किती एकरूपतेने, करायची असते त्याचा हा आदर्श म्हणता येईल. अशा उच्च आणि तीव्र साधनेत मृत्यू सुद्धा बेवारशी होतो. अशी साधना पाहिल्यानंतर, उलट असा प्रश्न पडेल, जर इतक्या तीव्रतेने एखाद्या गोष्टीची इच्छा करायची च असेल तर त्या गोष्टीची सुद्धा तेव्हढी पात्रता असली पाहिजे, एव्हढ्या व्याकुळतेने कोणी काम-कांचना साठी वेडा होणार नाही, कारण अशा साधनेच्या पहिल्याच पायरीवर साधकाला स्वतःच्या व्यक्तित्वाचा त्याग करावा लागतो. मग तो पैसा, धन दौलत कोणासाठी, जर 'स्वतः' अस्तित्वातच नसेल तर? पण देवाचे तसे नाही, जर तुम्ही त्याचे झालात तर हे विश्व तुमचे आंगण होईल, प्रत्येक क्षण अद्भुत आनंदाची बरसात होईल. तो एकमात्र भक्तीचे आणि त्यागाचे कारण होऊ शकतो. पण कोणी आत्महत्या ची धमकी देईल म्हणून देव दर्शन देईल असे ही नाही.

८. आणखी एक खूप मोठा फरक आहे, मनुष्य आणि अवतार ह्यामध्ये, तो म्हणजे शक्तीचा. ज्या कायिक वाचिक मानसिक तीव्रतेने श्री राम कृष्णानी १२ वर्षे साधना केली, ती तीव्रता साधारण मनुष्य ५ मिनिटं सुद्धा अनुभवू शकणार नाही. १२ वर्षे आहार, निद्रा आणि स्वतःचे पृथक अस्तित्व विसरणे आणि एकच ध्यास, तीव्र व्याकुळता, घेऊन साधना करणे, त्यातही अंतिम ध्येय

मिळविल्यानंतरही निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करून परत साधना करणे, हे त्यालाच शक्य आहे ज्याच्या जवळ अनंत शक्ती चा स्त्रोत आहे, आणि लोक कल्याण हे कारण आहे.

ह्या संबंधी रशिया मध्ये निद्रा ह्या विषयावर जे संशोधन आणि प्रयोग झाले ते तपासून बघितले तर आपले डोळे उघडतील. अवतार, मूर्तीपूजा, श्रद्धा, ऐहिक सुखं समृद्धी, समाधान, आनंद, ह्या सगळ्या गोष्टींकडे बघण्याचा दृष्टीकोनच बदलून जाईल. मन आणि मनाच्याही पलीकडे काही आहे हे पटवून देईल. भारतीय विचार धारेतून आणि भारतीय जीवन शैलीतून, भारतीय मुर्तीपुजेतून, भारतीय श्रद्धा आणि संस्कारातून, जर अवतार निर्माण होत असतील तर त्याची शक्ती विज्ञानापेक्षा किती तरी पट जास्त आहे.

9. श्री राम कृष्णांच्या दिव्य संगतीत निरंतर राहून, त्यांच्या भाव समाधीतील असीम आनंद पाहून, विषयी मथुर बाबुना एकदा असे वाटले कि हा काय प्रकार आहे तो अनुभवून पाहावा. त्यांनी श्री राम कृष्ण ह्यांच्या पाशी धरणे धरले, "बाबा, तुम्ही माझी भाव समाधी लावून दिली पाहीजे." अशा प्रसंगी श्री राम कृष्णांचे उत्तर ठरलेले असे, "अशी घाई करून काय होते? वेळ येईल तेंव्हा सर्व काही होईल. ..." बरेच समजावले तरी ते त्यांचे म्हणणे सोडीनात. त्या नंतर काही दिवसांनी मथुर बाबुना एकाएकी भाव समाधी प्राप्त

झाली. त्यांनी श्री राम कृष्णांना बोलावणे पाठवले. श्री राम कृष्ण सांगत, "जाऊन पाहतो तो जसा आधीचा मनुष्यच नव्हे. डोळे लाल दिसत होते. डोळ्यातून एक सारख्या अश्रू धारा वाहत होत्या. ईश्वराच्या गोष्टी बोलत बोलत आणि रडत अश्रुनी तो भिजून गेला होता. त्याचे छाती थर थर कापत होती. मला पाहताच पायांना घट्ट मिठी मारून म्हणाला, मी चुकलो, आज तीन दिवस झाले, असा प्रकार चालला आहे, प्रयत्न केला तरी संसाराकडे मनच लागत नाही. सारा गोंधळ होऊन गेला आहे. तुमचा भाव तुम्हालाच लखलाभ होवो. मी म्हणालो होतो मला भाव पाहिजे आणि आनंदातही आहे, पण मला तर तो सहन होत नाही. कोणाला माहित होते की हा भाव एखाद्या भूतासारखा मानगुटीवर बसेल आणि तो फिरवील तसे चोवीस तास फिरायला लागेल. मनात आले तरी काही करता येत नाही." मग त्याच्या छातीवरून काही वेळ हात फिरवल्यावर त्याचा भाव शांत झाला.

अपघाताने मिळालेले महात्म्य टिकत नाही.

अध्यात्मिक शक्ती हीच सर्व प्रकारच्या भौतिक आणि आधीभौतिक शक्तींचा मूल स्त्रोत आहे. आणि ती धारण करण्यासाठी शरीर आणि मनाची सिद्धता करावी लागते, परिश्रम, त्याग आणि तीव्र इच्छा ह्यातून.

१०. एक दिवस अद्वैत मत संबंधी बोलणे चालले असता ' जीव ब्रम्हाचे ऐक्य आहे' ही गोष्ट श्री राम कृष्णानी नरेंद्राला अनेक प्रकारांनी समजावून सांगितली. पण त्याला ती पटली नाही. तो हाजरा महाशयांकडे जाऊन अद्वैत मताचा उपहास करू लागला. "हि किती विचित्र गोष्ट आहे, काय म्हणे, घर ईश्वर, दार ईश्वर, भांडे ईश्वर, झाडे ईश्वर, तुम्ही आम्ही सर्व जण ईश्वर. असे असणे कधी तरी शक्य आहे?" ते दोघे मोठ्या मोठ्याने हसू लागले. श्री राम कृष्ण भावावस्थेत होते, हसत हसत त्यांनी त्याच्या अंगाला स्पर्श केला. आणि ते समाधी मग्न होऊन गेले. स्वामी विवेकानंद सांगत, "पण त्या अद्भुत स्पर्शाने माझे विलक्षण भावांतर होऊन गेले. मला खरोखरी असे दिसू लागले कि साऱ्या ब्रह्मांडात ईश्वरावाचून इतर काहीही नाही. घरी परत आलो तिथेही तेच. जेवायला बसलो तर ताट, वाटी, अन्न, वाढणारा, मी स्वतः जेवणारा, हे सारे ईश्वरच आहे. जेवताना, चालताना, सर्व वेळ एखाद्या भुताने पछाड्ल्याप्रमाणे त्या विचाराशिवाय दुसरा विचारच मनात येऊ नये. रस्त्यातून चालताना, गाडी पुढून येत आहे असे मी चांगले पाहतोय, पण तिच्या पुढून बाजूला होणायची प्रवृत्तीच होऊ नये. वाटावे, गाडी तरी काय ईश्वरच, तिच्यात आणि माझ्यात काय फरक? हात पाय जसे ढिले पडलेले असावे. तर कधी कितीही खाल्ले तरी तृप्ती होऊ नये, वाटावे, मी कोठे खाल्ले, जेंव्हा सर्वेश्वर

भाव कमी होई तेंव्हा वाटावे, सारे जग स्वप्न आहे, हेदुया तलाव जवळच्या रेल्वेच्या रुळावर डोके आपटावे व हे रूळ खरे कि स्वप्नातले आहेत हे पाहावे, असे चालले होते. अशा अवस्थेत किती दिवस गेल्यावर हा भाव जरा कमी होऊ लागला. जेंव्हा पहिल्यासारखा देह भानावर आलो तेंव्हा वाटले कि हाच तो अद्वैत वेदांताचा थोडासा अनुभव."

काय हि अद्भुत शक्ती, एका स्पर्शात, संपूर्ण व्यक्तित्वाला छेद देऊन, विश्वातील एक सर्वात सूक्ष्म अनुभव / प्रत्यय करून देणे. हा भारत धन्य आहे जिथे असे अवतार जन्म घेतात.

११. अवतार हि एक 'लीला' आहे, असे आपण नेहमी ऐकतो. एखाद्या नाटककाराने आपल्या नाटकात एक पात्र आपल्यावर च रंगवावे, आणि आपणच त्याची भूमिका करावी तसे आहे हे सारे. नाटककाराला लिहिण्याचे पूर्ण स्वातंत्र्य आहे, पण म्हणून आयत्या वेळी नाटकाच्या प्रयोगात त्या पात्राच्या व्यक्ती रेखेत, घटनाक्रम किंवा संहितेत बदल नाही करू शकत तो. तसेच मनुष्य म्हणून अवतार घेतल्यावर संहितेतील नियमाप्रमाणे त्याला वागावे लागते. नाटकाची संहिता नाटक सादर झाल्या नंतर च कळते. आधी नाही. श्री रामकृष्ण ह्यांच्या रूपाने जगाला भारतीय आध्यात्मिक शक्ती आणि भारतीय गौरवशाली परंपरा,

जगत्मोहिनी नानाविध नटरंगी जीवन शैली, ह्यांचा परमोत्कर्ष दिसून येतो. एकाच वेळी, मिथ्या जगत आणि सत-चित-आनंद दोहोंचा परिचय होतो. म्हणून अवतार हि एक लीला आहे, पण लोक कल्याणकारी लीला. जगाला आणि प्रस्थापिताला हलवून, हादरवून आणि बदलून टाकणारी लीला. प्रचंड शक्तिशाली विजेसारखी, वादळासारखी, भूकम्पासारखी, भूगोल बदलून टाकणारी लीला किंवा तुफानात ही शांत तेवणाऱ्या समई सारखी. महान लोक कल्याण कारी लीला.

स्वामी विवेकानंदांच्या शब्दात :

"खरोखरच लुट मांडली आहे. प्रेम म्हणा, भक्ती म्हणा, ज्ञान म्हणा, मुक्ती म्हणा, ज्याला जे हवे ते, त्याला, गौरांग वाटत सुटला आहे. काय हि अद्भुत शक्ती. ... ह्या गौरांगाला, ह्या दक्षिणेश्वर च्या गौरांगाला काय वाटेल ते करता येते."

************

## ब्राह्मण, चिंता करतो विश्वाची

*(ब्राह्मण - एक संकल्पना. एक इतिहास, एक वास्तव आणि एक स्वप्न.)*

---

नात्यांच्या सुरुवातीला आपण आपले वर्तुळ ओलांडतो तेंव्हा पहिल्यांदा भेटते ते आपले कुटुंब. ह्याही पुढे ओलांडले कि भेटते ती आपली ज्ञाती. त्या पुढे भेटतो स्थानिक समाज, मग देश, परदेश, शेवटी वसुधैव कुटुंबकम. असे आपली संस्कृती सांगते. ही अंतर्गत वर्तुळे पुसून टाकायला सांगत नाही, तर निरनिराळ्या छोट्या मोठ्या उत्सवांचे निमित्त करून, त्यांना आपल्या आयुष्याचा एक भाग बनवून, त्यांना अधोरेखित करून, मोठ्या वर्तुळा मध्ये शिरायला मदत करते.

पण ज्यांना फार घाई झालेली असते, ते तडक शेवटच्या वर्तुळाशी पोहोचतात आणि कानी कपाळी 'वसुधैव कुटुंबकम', चा घोष करतात. आतल्या वर्तुळांच्या लहान त्रिज्या न वाढवता, मोठे वर्तुळ काढण्याचा प्रयत्न करतात आणि फसतात. त्यांच्या अपयशाचे खापर दुसऱ्यावर फोडतात.

हे जीवनाला गवसणी घालणारे तत्वज्ञान आणि बरोबरीला व्यावहारिक शहाणपण - सामाजिक उत्सव, त्याला निसर्गाची / ऋतुचक्राची जोड, त्याला ग्रह-ताऱ्यांचे समर्थन, ह्याची एक प्रदीर्घ परंपरा - इतिहास, ही हिंदू संस्कृतीची मोठी शक्ती आहे. हा विचार रुजणे आणि त्यातून जुन्या नव्या विचारांचे आदान प्रदान घडणे हे अशा समारंभांचे यश आहे.

असे जर आहे तर आपण जात-पात, ब्राह्मण, मराठा, वाणी किंवा महार ह्या शब्दाला का घाबरतो? ही अंतर्गत वर्तुळे एकमेकात मिसळून एकजीव होऊ द्यात. ही जर भूमिका असेल तर हेही स्पष्ट आहे कि ज्या गोष्टींमुळे ते एकजीव होत नाहीत त्या गोष्टी टाकाऊ आणि ज्या गोष्टींमुळे ते एकजीव होतात त्या स्वीकारार्ह आहेत. उदा. जातीवर आधारित reservation नको, पण गुणवत्ता / आर्थिक क्षमता ह्यावर आधारित असावे हे स्पष्ट आहे.

मग आपला स्वार्थ आपल्यावर मात करतो का !

मग असे का घडत नाही?

कारण विश्वासार्हतेचा अभाव. तो दूर करण्यासाठी निरनिराळ्या ज्ञातिनी /समाज घटकांनी एकत्र असे समारंभ करणे हा एक मार्ग आहेच, पण दुसरे निसर्गाचे मार्ग तर काम करतातच, जसे अंतर-जातीय विवाह, शिक्षण, नोकरी - धंदा - व्यवसाय.

ह्याला वेळ लागणार, आणि तो दिला पाहीजे.

विश्वासार्हतेचा अभाव का निर्माण होतो?

आपल्या पैकी काही जण परकीय भाषेवरच्या प्रभुत्वाला अवास्तव महत्व देतात, तर काही जण त्यांच्या कौशल्याला, तर काही जण त्यांच्या ताकदीला, आणखी काही त्यांच्या साधन संपत्तीला महत्व देतात. सगळे जण हे विसरतात कि त्या सर्वांचा मध्य बिंदू एकच आहे.

त्या मध्य बिंदुला कोण सांभाळणार?

असा कोण तरी जो सर्व वर्तुळांमध्ये बीज रूपाने आहे, सगळ्या शाखा, प्रशाखा आणि पर्ण संभाराचे उगम स्थान आहे, तरी नाम मात्र बिंदू रूप आहे.

ही ब्राह्मणत्वाची संकल्पना आहे, असावी.

निःस्वार्थपणे समाजाची धुरा सांभाळणारे समाजधुरीण, अथकपणे, निरलसपणे समाजाची सेवा करणारे समाज सेवक, समाजाच्या सर्वांगीण प्रगतीची आंस ठेवून विचार करणारे विचारवंत - बुद्धिवंत. ते ब्राह्मण. समाजाला निःस्वार्थपणे मार्ग दाखवणारे, ते ब्राह्मण. समाजासाठी सर्वस्वाचा त्याग केलेले ते ब्राह्मण. वेळ प्रसंगी कठोर टीका करून समाजाचा रोष ओढवणारे ते ब्राह्मण.

अगदी प्रगत, पुढारलेल्या अमेरिकेने सुद्धा अशा व्यक्तींना Boston Brahmins असे संबोधून ब्राह्मणत्वाचा गौरव केला आहे.

पण भारतात ह्या संकल्पनेला आणखी एक परिमाण, जबाबदारी, एक बहुविध आयाम जोडलेला आहे. तो म्हणजे अध्यात्माचा. अध्यात्म हा भारताचा प्राण आहे. आणि म्हणून अध्यात्माचे जतन, संवर्धन, उपासना, चलन-वलन ही ब्राह्मणांची मुलभूत जबाबदारी / कर्तव्य आहे. जो ही जबाबदारी पेलतो, निभावतो, तो ब्राह्मण अशी ब्राह्मणत्वाची व्याख्या आहे. आद्य शंकराचार्यांचे गुरु, चान्डालापासून तो चोख मेळा पर्यंत, सर्व संत हे अधिकाराने ब्राह्मण आहेत. ब्राह्मण ही पदवी नाही, तो अधिकार आहे, जन्मगत नव्हे, तर सर्वात कठीण पुरुषार्थ करणारा अध्यात्मिक साधक.

नालंदा, तक्षशीला इथे फक्त ग्रंथांची होळी झाली नाही तर आमच्या ब्राह्मणांची कत्तल झाली. समाज त्यांचे रक्षण करु शकला नाही. आणि म्हणून समाजाचे रक्षण झाले नाही. हजार वर्षाच्या आक्रमणात आमची अध्यात्मिक शक्ती क्षीण झाली आणि आमचे 'ब्राह्मण' भिक्षुक झाले. पण आम्ही नष्ट झालो नाही. कारण

समाजाच्या सर्व थरातून, ब्राह्मण पुढे येत राहिले. अजून येत आहेत. आणि येत राहतील. भारताची आंतरिक शक्ती हीच आहे.

संकल्पना तीच पण काळाबरोबर, काळानुरूप बदलत राहिली, बदलली.

म्हणून तर आमच्या मधील सर्वात श्रेष्ठ, सर्वात अधिकारी ब्राह्मणाने सांगितले, मुंजीनंतर मी पहिली भिक्षा धनी लोहारीणीकडून घेईन आणि त्यांनी ते करून दाखवले.

हा वसा जो घेईल, हा वारसा जो पुढे चालवेल, त्याला समाज बळ देईल आणि तो समाजाला सशक्त बनवेल. अशाच एका अधिकारी व्यक्तीने ६० - ७० वर्षापूर्वी एक प्रश्न विचारला होता -

"The world is preparing for a big change. Will you help?"

जग कसे बदलत आहे आणि आपण त्याला कसा हातभार लावावा, हे ब्राह्मण सांगू शकतात, म्हणजे समाजाची तशी अपेक्षा आहे त्यांच्याकडून. कारण ह्या जागतिक बदलाची सुरुवात एका ब्राह्मणानेच केली आहे. पण त्यांनी सन्यास घेतला होता. आणि म्हणून त्यांना ब्राह्मण म्हणून संकुचित करू नका. वसुधैव कुटुंबकम च्या ही बाहेरच्या वर्तुळाचे ते मध्य बिंदू होते.

पहिला बदल अध्यात्मिक होता. कारण सर्व शक्तींचा मूल स्रोत अध्यात्मिक आहे. सूर्य मध्यान्ही आला म्हणजे सावल्या नाहीश्या होतात, तसे अध्यात्म शक्तीच्या उदया नंतर अपरिपक्व विचार, अमंगल रूढी, भयकारी आचार, संकुचितपणा मावळायला लागतात. स्वातंत्र्याचा वारा वाहायला लागतो. निर्भय पावले दमदारपणे पुढे जाऊ लागतात. लोक मानसात सत्य-शिव-सुंदर ह्याची आंस निर्माण होते. 'अणुरणीया थोकडा, तुका आकाशा एव्हढा.'

पहिला बदल सूक्ष्म होता, जणू काही मनातल्या मनात, पण त्याचे परिणाम विश्व व्यापी उलथापालथ होण्यात झाले. समुद्र मंथनाला सुरुवात झाली कि प्रथम हलाहल बाहेर येणार, हे ठरलेलेच. पहिले महायुद्ध, दुसरे मह्युद्ध, तिसरे शीतयुद्ध. ज्या साम्राज्यावर सूर्य मावळत नव्हता, ते राज्य एका छोट्याशा बेटावर सीमित होऊन आपल्या पापांची शिक्षा भोगत आहे, पुढचा रस्ता बंद आहे आणि अतिरेकी भस्मासुराला बघून बोलती बंद झाली आहे.

कम्युनिझम चा उदय होऊन अस्त झाला, जेमतेम ६०-७० वर्षाचे रोगट, निराश आयुष्य घालवून, मावळताना एक अंदाधुंद

स्मशान पाठीमागे ठेवून गेला. जो थोडा फार उरलेला दिसतो आहे, तो निखळ साम्राज्यवाद आहे.

एक शापित समृद्धी शांती आणि समाधानाचे फसवे आश्वासन घेऊन आली. पण भानामती झाल्याप्रमाणे, सुखाच्या दुष्ट चक्रात फिरत राहिली आहे, स्वतःची वाट हरवून बसली आहे.

निरनिराळे पंथ आणि संप्रदाय वाजत गाजत, गर्जत, आरोळ्या ठोकत जागतिक रंगमंचावर आले, ऐहिक आणि पारलौकिक सुखाची स्वप्ने दाखवत आले, डोळे उघडले तेंव्हा आम्हीच परलोकात होतो आणि स्वर्गीय सुखे शोधता शोधता घामाघूम झालो होतो.

आमची पापे धुवून काढण्यासाठी काही जण प्रार्थना करत आले, आम्ही गहिवरून गेलो, प्रार्थनेसाठी डोळे मिटले, परत डोळे उघडले, तेंव्हा आम्हीच धुवून निघालो होतो.

पण आता नाही. अध्यात्मिक लाटेवर स्वार होऊन जो महामानव आला त्याने आम्हाला आमची नव्याने ओळख करून दिली, तो म्हणाला, तुम्ही अमृताचे पुत्र आहात, उठा, त्या दिव्य आनंदाचे अधिकारी व्हा.

आता आम्ही फसणार नाही. आता कोणीच फसणार नाही.

दुसरा स्पष्ट कौल दिसतो आहे तो रंजल्या गांजलेल्या, दीन दुबळया, शोषित-पीडित-गरीब रयते च्या बाजूने. त्यांच्या मध्ये संचारलेली शक्ती. पिढ्या पिढ्यांचा खोल पीळ जसा सुटतो आहे, तसा त्यांना सुप्त शक्तीचा प्रत्यय येतो आहे आणि त्याची अभिव्यक्ती समाजाच्या सर्व कार्यामधून, सर्व थरातून, सर्व संस्थांमधून होते आहे. The engine called Desire is bursting with power thru all functions of the society.

तिसरा बदल जाणवतो आहे तो म्हणजे हातघाईच्या लढाईचा. चुकीच्या, अयोग्य, अन्यायकारक वृत्तींविरोधात एक निकराची लढाई सुरु झाली आहे. Nobody wants to take things lying down. पण एक गम्मत झाली आहे, प्रत्येक जण कधी ह्या बाजूने, तर कधी त्या बाजूने, असा लढाईच्या दोनही बाजूने आहे.

चवथा बदल तंत्र ज्ञानाचा. विज्ञानाचा. माहिती चे विराट जाळे - जंजाळ तुम्हा आम्हाला वेढून टाकत आहे, त्याचा. सर्वांचा त्यावर अधिकार आहे आणि त्याचा सर्वांवर. ह्या एकांगी, अनियंत्रित बदलाविरुद्ध तोल सावरण्यासाठी आंतरिक अध्यात्माचा सुद्धा विकास आणि विस्तार होतो आहे. कोट्यावधी प्रकाश वर्षे दूरवर पसरलेल्या विश्व दर्शनाने मानव अवाक् झाला आहे, त्याच वेळी एका महामानवाच्या अथक प्रयत्नांना यश येऊन,

उत्क्रांतीतील माणसाच्या पुढच्या टप्प्याची चाहूल लागते आहे. अशा वेळी एका प्रतिभावंत गणिती ची आणि त्याच्या श्रद्धेची आठवण होते. असा एक प्रतिभावंत गणिती कि ज्याच्या प्रमेयांची अजून उकल होते आहे आणि ज्याच्या प्रमेयानी जगाला थक्क केले, असा भक्त ज्याच्यासाठी त्याची इष्ट देवता ही प्राथमिक होती आणि गणित दुय्यम होते, तो काय म्हणतो पहा : "An equation for me has no meaning unless it represents a thought of God." आहे असा कोणी तत्ववेत्ता जो गणितातील समीकरणांचे तात्विक अर्थ सांगेल, गणिताला तत्वज्ञाना ची नवीन परिभाषा देईल, तत्वज्ञानाची एक नवीन गणिती शाखा काढून त्याला विज्ञानाच्या पुढे नेईल?

Big Bang आणि God Particle च्या रुक्ष, शुष्क जमान्यात, कित्येक शतकांपूर्वी ज्ञानेश्वरांनी किती सुंदर, काव्यमय वर्णन केले आहे पहा :

"कुंडलिनी श्री जगदंबा,
चैतन्य चक्रवर्तीची शोभा,
जिने विश्व बीजाचिया कोंभा,
साउली केली."

*******

आता आपण जास्त कठीण विषयाकडे वळू या. करण्यासारखे तर खूप काही आहे. सुरुवात स्वतः पासून करू या.

ब्राह्मणांकडून पहिली अपेक्षा आहे कि ते आपला वेद, उपनिषदे, पुराणे शास्त्र ग्रंथ ह्यांचा वारसा जतन, संवर्धन आणि वृद्धींगत करतील. गेल्या २५ वर्षात आपल्या समाजात किती दशग्रंथी ब्राह्मण होऊन गेले? आणि पुढच्या २५ वर्षात किती तयार होतील ह्याची आपण काय व्यवस्था केली आहे?

संस्कृत भाषेचे अध्ययन, अध्यापन आणि संशोधन करण्यात आपण किती हातभार लावला आहे. आपण आपल्या मुलांना तिसरी भाषा म्हणून French किंवा German हा पर्याय देतो, संस्कृत का नाही? Jew लोकांनी हिब्रू पुनरुज्जीवित केली आणि आज त्यांचे सर्व व्यवहार हिबृतून चालतात. आज आपल्याला सरस्वती नदीवर संशोधन, द्वारका नगरीवर संशोधन, रामसेतूवर संशोधन करण्यासाठी आर्थिक आणि मनुष्य बळ का मिळत नाही? याची पहिली जबाबदारी ब्राह्मणांवर पडते. जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ती अपुऱ्या पैशा अभावी बंद झाली आहे. किती ब्राह्मण संघांनी प्रयत्न केले ती वाचविण्यासाठी?

गेल्या १०-१५ वर्षात हिंदू संस्कृती वर, हिंदू विचार धारेवर, हिंदू मानबिंदूवर किती हल्ले झाले, Wendy Doniger सारख्या अर्ध शिक्षित लोकांनी किती गैरसमज पसरवले, हिंदू जीवन शैलीवर, हिंदू पूजा पद्धतीवर, मुर्तीपुजेवर किती असमंजस आणि अतिरेकी टीका झाली, किती ब्राह्मण संघांनी ती खोडून काढली, त्याविरुद्ध आवाज उठवला हे बघा तपासून.

आपली देवळे आपल्या संस्कृतीची प्रतीके म्हणून काम करत नाहीत तर उपजीविकेचे साधन म्हणून पैसे भाविकांकडून गोळा करतात ; पण जेंव्हा भाविकांच्या श्रद्धेला तडा जातो तेंव्हा ती श्रद्धा जपण्याचा काहीही प्रयत्न करताना दिसत नाहीत. आमची सार्वजनिक गणपती मंडळे हिंदू धर्मासाठी काय करतात हे कोणाला माहित नाही. हिंदू धर्माच्या मान बिन्दुसाठी सुद्धा ती मंडळे एकत्र येऊ शकत नाहीत. एक देऊळ एक nerve centre, एक उर्जा केंद्र बनू शकते आणि तसे ते बनले तर ब्राह्मणांना समाजात आदराचे स्थान का मिळणार नाही?

आपल्या ब्राह्मणांच्या सुद्धा किती संस्था आहेत - ३०-३५ आहेत. सगळ्यांची एकत्र गंगाजळी कित्येक कोटी आहे, सगळे एकजूट करून मोठे काम उभे राहू शकते. एक संस्कृत पाठशाला, एक वेद अध्ययन आश्रम निर्माण करून ब्राह्मण म्हणून आपले

प्राथमिक कर्तव्य आपण पार पाडू शकतो. एक अशी पाठशाला जिथे व्यक्तिमत्वाचा खरा विकास करता येईल, computer वरून संस्कृत साहित्य जगाला शिकवता येईल आणि Bose system वर वेद घोष ऐकता ऐकवता येईल. फुटबाल आणि न्यायशास्त्र, संगीत - सहावा वेद आणि मुष्टी युद्ध एकत्र येऊन जीवन समृद्ध होईल.

आपापले ego आणि आपापले राग - लोभ बाजूला ठेवून मोठे काम उभे करणे ही कसोटी आहे ब्राह्मणांपुढे. त्या साठी विधायक शक्तीची गरज आहे - शून्य ते अनंत ह्या scale वर आपण स्वतःला मोजले तर हिंदू पुनरुज्जीवन ची व्याप्ती आणि खोली लक्षात येईल.

आणि हे सगळे घडणार आहे. तुम्ही नाही तर नवीन ब्राह्मण पुढे येतील आणि घडवतील. पण हे सगळे घडणार आहे. काळाची ही गरज आहे. आज ही अपेक्षा आहे. उद्या ती उपेक्षा झाली तर दोष आपल्याकडेच असेल.

"The world is preparing for a big change. Will you help?"

*************

साहित्य म्हणजे असतं काय?

जीवनाचे अनुभव असतात, कधी खरे तर कधी खोटे वाटतील इतके खरे.

जीवनमूल्यांचे आदर्श असतात, कधी सोपे, कधी अवघड. कधी अशक्यप्राय.

जगण्याच्या चढ उतारांचे आरसे असतात. कधी अनुभवलेले. कधी न ऐकलेले.

आपल्या मनाचा, आपल्या जीवनाचा आरसा असतो साहित्य.

साहित्यात रमू या.

साहित्यात रमणारा समाज अधिक सुसंस्कृत, अधिक प्रगतीशील असतो.

प्रगती म्हणजे केवळ समृद्धी नाही!

समृद्धी म्हणजे केवळ विकास नाही!

ई साहित्य प्रतिष्ठान.
मराठी साहित्यातील एक कोवळे पान.
एक प्रसन्न अनुभव

www.esahity.in
www.esahity.com
esahity@gmail.com